१९६७
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. ३८५

# खडक कोरतात आकाश

अनंत काणेकर

REFBK 0014276
REFBK-0014276

भू प्रवास
क्र. ३६५

अनंत काणेकर



प्रकाशक
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
७३९, बुधवार, पुणें २

मुखपृष्ठ व
आंतील चित्रें
दीनानाथ दलाल

© अनंत काणेकर

किंमत चार रुपये पन्नास पैसे

प्रथम आवृत्ति १९६४

मुद्रक
मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस प्रा. लि.,
३८३ नारायण पेठ, पुणें २

# खडक कोरतात आकाश


मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 38651 वि: भू-प्रवास
क्रमांक 365 नों. दि. 28-6-65


REFBK-0014276

REFBK-0014276

# खडक कोरतो आकाश

अनंत काणेकर





# अनुक्रमणिका


१ अमेरिका ८

२ अटलांटिकपार २०

३ वॉशिंग्टन ३२

४ विल्यम्सबर्ग – न्यू ऑर्लियांस ४२

५ ॲरिझोना – ग्रॅन्ड कॅन्यन ५२

६ सॅन्फ्रॅन्सिस्को – बर्क्ले ६४

७ यूटा – सॉल्टलेक सिटी ७६

८ मिनेसोटा – मिन्यापोलीस ८८

९ आयोवा १०४

१० शिकागो १२०

११ न्यूयॉर्क – हारवर्ड – येल १३४

# : १ : अमेरिका

अमेरिका म्हटलें कीं डोळ्यापुढें उभें राहतें न्यूयॉर्क; आणि त्याची 'स्कायस्क्रेपर्स' किंवा त्यांतल्या गगनचुंबी (कीं गगनभेदी ?) इमारती. मॅनहॅटन्, ब्रुकलीन, लाँग आयलंड, क्वीन्स, स्टेटन वगैरे पांच सहा बेटें मिळून सात बेटांच्या मुंबईसारखेंच न्यूयॉर्क आहे. एकशें दोन मजल्यांची एम्पायर स्टेट किंवा पंच्याऐंशी शहाऐंशी मजल्यांची क्रायस्लर किंवा एकुणचाळीस मजल्यांची यूनो अशा आकाशाला भिडणाऱ्या बऱ्याचशा इमारती, मोठमोठ्या कचेऱ्या, हॉटेलें, प्रचंड खडक आणि तळीं असलेली दीडदोन मैल लांबीरुंदीची सेंट्रल पार्क, वगैरे मॅनहॅटन् बेटावरच आहेत. हें सबंध बेट म्हणे तांबूस काळ्या रंगाच्या, अत्यंत कठीण म्हणून प्रख्यात असलेल्या ग्रॅनाइट खडकांचें आहे. या दणकट दगडांचे प्रचंड अवशेष न्यूयॉर्कच्या रस्त्यावरून जातांना सेंट्रल पार्कमध्यें दिसतात. शेकडों मजल्यांच्या आकाश भेदून टाकणाऱ्या न्यूयॉर्कच्या इमारती म्हणजे पायांतल्या या तांबूसकाळ्या ग्रॅनाइट खडकांचींच निळ्या आकाशांत खुपसलेलीं बोटें ! वास्तव भौतिकाची ओढ आणि ध्येयवादाच्या भराऱ्या यांचें चमत्कारिक मिश्रण अमेरिकेंत दिसतें. त्याचेंच जणू हें प्रतीक आहे. डॉलर, हॉलिवुडचा हा देश, तसाच इमर्सन, थोरोचाहि हाच देश. म्हणून इथें वाटतें, *खडक कोरतात आकाश !*

**कितीतरी अमेरिका आहेत !**

अमेरिकेबद्दल लहानपणापासून पुष्कळ ऐकलें होतें, वाचलें होतें, चित्रांत पाहिलें होतें. लोकशाहीवादी अमेरिका, भांडवलदार अमेरिका, लिंकनची अमेरिका, शिकागोंतल्या डाकूंची अमेरिका, हॉलिवुडच्या चित्रपटांतील अमेरिका, विवेकानंद, ज्ञानकोशकार केतकर, लाला लजपतराय, जयप्रकाश नारायण यांना आश्रय देणारी अमेरिका, नीग्रोंना जिवंत जाळणारी अमेरिका आणि सर्व जगाला सहस्र हस्तांनीं कोटच-

वधि डॉलरांची मदत देणारी अमेरिका, अशीं अमेरिकेचीं अनेक चित्रें नेहमीं डोळ्यांसमोर तरळत असत. त्याशिवाय इमर्सन, थोरोसारख्या तत्त्ववेत्त्यांच्या लिखाणांतली अमेरिका, मार्क्ट्वेन, वॉल्ट व्हिटमन्, ड्रायझर, सिंक्लेअर लुई, हेमिंग्वे, फॉकनर, कॉल्डवेल, स्टाईनबेक, टेनेसी विल्यम्स, आर्थर मिलर यांच्यासारख्या कवि, कथाकार, नाटककार, कादंबरीकार यांच्या पुस्तकांतून मनांत मुरलेली अमेरिका, तिथल्या मिसिसिपीसारख्या महान् नद्या, ग्रँड कॅन्यनसारखीं दऱ्याखोरीं, नायगारा धवधवा, नाना प्रकारचीं हवामानें असलेला, नाना धान्यें अमूप पिकवणारा, पेट्रोल, लोखंड इत्यादींनीं संपन्न असलेला अवाढव्य भूप्रदेश हा अमेरिकेचा भूगोल, आणि ब्रिटिशांशीं वॉशिंग्टननें केलेला अमेरिकेचा स्वातंत्र्यसंग्राम, नीग्रो गुलामांच्या मुक्ततेसाठीं लिंकननें केलेलें स्वातंत्र्ययुद्ध इत्यादि अमेरिकेचा इतिहास माहीत होता.

अमेरिका प्रत्यक्ष पाहण्याची तीव्र इच्छा होती, आणि ' अमेरिकन न्यूजपेपर्स स्टडी मिशन्स इन्कॉर्पोरेटेड् ' या अमेरिकी संस्थेच्या कृपेनें ती पुरी झाली. अमेरिकी पत्रकारांची ही संस्था आहे. दर वर्षी अमेरिकेंतल्या संपादकांचे यूरोप, आफ्रिका इत्यादि खंडांतल्या निरनिराळ्या देशांचे दौरे ही संस्था काढते. रशिया, चेकोस्लोव्हाकिया, पोलंड, इजिप्त इत्यादि देशांतल्या संपादकांच्या, राजकारणी पुरुषांच्या, शिक्षणतज्ज्ञांच्या गांठीभेटी घ्यायच्या आणि आपल्या लिखाणाकरितां प्रत्यक्ष अनुभव मिळवायचा, हा या दौऱ्यांचा हेतु असतो. या संस्थेची ' स्टडी मिशन्स इंटरनॅशनल ' नांवाची एक संलग्न संस्था आहे. ही संस्था इतर देशांतल्या संपादकांना आणि लेखकांना याच हेतूनें अमेरिका दाखवण्याचें कार्य करते. भारतांतल्या आम्हां बावीस पत्रकारांना आणि लेखकांना याच संस्थेनें अमेरिकेच्या एक महिन्याच्या दौऱ्याचें आमंत्रण दिलें होतें. इथून अमेरिकेपर्यंतचा, परतीचा आणि आंतला प्रवास विमानानेंच व्हावयाचा होता. अमेरिकेंतलीं वृत्तपत्रांचीं केंद्रें, विद्यापीठें, राजकीय

क्षेत्रांतल्या व्यक्ती यांच्या गांठीभेटी व्हायच्या होत्या. या संस्थेचे अध्यक्ष मि. बायॉल आणि त्यांचे सहकारी मि. जॉन स्टॅन्डीश हे दोघे सबंध महिना आमच्याबरोबर फिरून आमच्या सर्व सुखसोयींकडे लक्ष देणार होते.

**मनांतले ठोकळे आणि जिवंत सत्य**

इतकें ऐकलेल्या, वाचलेल्या एवढ्या मोठ्या अवाढव्य देशाचें एक महिन्याच्या झंझावाती उडत्या प्रवासानें मिळवलेलें ज्ञान अगदींच उडतें, उथळ, वरवरचें आणि तुटपुंजें असणार. पण वाचून, विचार करून, कल्पना ताणून एखाद्या देशाविषयीं, तिथल्या लोकांसंबंधीं, तिथल्या जीवनासंबंधीं आपण कांहीं तरी ठोकळे मनांत उभे केलेले असतात. प्रत्यक्ष दर्शनानें ते जिवंत होऊन माणुसकीचा प्रत्यय येतो. वेगळीं दिसणारीं, वेगळें बोलणारीं, वेगळें वागणारीं असलीं तरी हींहि माणसें आमच्या माणसांसारखींच आहेत ही खात्री पटून त्यांच्याबद्दल आपुलकी वाटूं लागते. लिंकननें एवढें मोठें यादवी युद्ध करून नीग्रो गुलामांची मुक्तता केली तरी प्रत्यक्षांत अमेरिकेंतल्या नीग्रोंचा अनेक क्षेत्रांत अनेक प्रकारांनीं छळवाद होतो ही गोष्ट खरी आहे. पण अमेरिकेंतला कुणीहि सुशिक्षित किंवा सुसंस्कृत नागरिक किंवा कोणत्याहि पक्षाचें अमेरिकी सरकार किंवा अमेरिकेंतलें सर्वोच्च न्यायालय ही गोष्ट चांगली आहे, असें मुळींच म्हणत नाहीं. ही एक लाजिरवाणी गोष्ट आहे असेंच सर्वांना वाटतें; आणि आपण ज्याप्रमाणें हरिजनांवरचा हजारों वर्षांचा अन्याय दूर करण्याची पराकाष्ठा करतों आहोंत त्याप्रमाणेंच सुसंस्कृत नागरिकांच्या संघटना, अमेरिकन सरकार आणि अमेरिकन कोर्टें, नीग्रो लोकांवरील अन्याय नष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

दक्षिणेकडल्या एका राज्यांत वरिष्ठ कोर्टाचा हुकूम धाब्यावर बसवून मेरेडिथ नांवाच्या नीग्रो विद्यार्थ्याला गोऱ्या मुलांच्या वर्गांत बसूं द्यायला गांवांतले लोक आणि राज्याचा गव्हर्नर सुद्धां विरोध करूं लागला, गोरे


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
२८६५७ दि.

लोक दंगेधोपे करूं लागले तेव्हां केनेडीनें मध्यवर्ति सरकारचे दहा हजार सैनिक पाठवून त्यांच्या कडेकोट पहाऱ्यांत मेरेडिथला दररोज वर्गांत बसवून अभ्यास पार पाडावयाला साहाय्य केलें. राजकारण, कला, उद्योग, शिक्षण इत्यादि क्षेत्रांतल्या मोठमोठ्या लोकांचा कॉस्मॉस क्लब नांवाचा एक क्लब आहे. त्या क्लबनें गेल्या वर्षी नीग्रो नागरिकाला सदस्य करून घेण्याचें नाकारलें तेव्हां भारतांत अमेरिकेचे राजदूत असलेल्या प्राध्यापक गालब्रेथसारख्या माणसानें त्या क्लबच्या सदस्यत्वाचा निषेधप्रदर्शनार्थ राजीनामा दिला. या वर्षी त्या क्लबनें हा नकार विनशर्त मागें घेतला तेव्हां गालब्रेथ व त्यांच्यासारख्या इतर कांहीं सदस्यांनीं क्लबचें सदस्यत्व पुन्हां स्वीकारलें. नीग्रो प्रश्नाची हीहि दुसरी बाजू लक्षांत घेण्यासारखी आहे.

**आम्ही अमेरिकेचे नागरिक झालों !**

मेक्सिकोच्या आखाताजवळ असलेल्या न्यू ऑर्लियान्स नांवाच्या अमेरिकेंतील अगदीं दक्षिणेकडल्या शहरांत आम्ही गेलों तेव्हां आमच्याबरोबर असलेल्या 'स्टडी मिशन्स इंटरनॅशनल'च्या जॉन स्टॅन्डीशनें, तुम्ही परदेशी पाहुणे आहांत हें दाखविणारे राष्ट्रध्वजाच्या तिरंगी रंगांचे 'स्ट. मि. इ.'नें दिलेले तुमचे नांवाचे बिल्ले रस्त्यांतून फिरतांना किंवा हॉटेलांत जातांना आपापल्या कोटावर ठळकपणें लावायला विसरूं नका असें आम्हांला हळूच सुचविलें होतें. लुईसियाना या न्यू ऑर्लियान्स राजधानी असलेल्या राज्यांत नीग्रोद्वेष विशेष असल्याची ख्याति आहे. सर्वसामान्यपणें लोक चांगले असले तरी कातडीच्या रंगामुळें गैरसमज होऊन एखादा कुणी अडाणी किंवा गुंड निघाल्यास काय करायचें, असें म्हणून स्टॅन्डीशनें ही सूचना केली होती. पण आमच्या दोनचार दिवसांच्या वास्तव्यांत न्यू ऑर्लियान्समध्यें आमच्यापैकीं कुणालाही कांहीं वाईट अनुभव आला नाहीं. उलट सुखद अनुभवच बरेच आले. न्यू ऑर्लियान्सच्या मेयरनें आपल्या कचेरींत मुद्दाम भेटीसाठीं बोलावून

एक छोटासा समारंभ करून आम्हां सर्वांना न्यू ऑर्लियान्सचे सन्मान्य नागरिक करून घेतलें, आणि त्याचें प्रतीक म्हणून एक छोटीशी किल्ली एका मखमली डबींतून आम्हांला दिली !

रंगामुळें वाईट अनुभव नाहींच, पण चांगले अनुभवच आम्हांला बरेच आले. सॅन्फ्रॅन्सिस्कोंत एका मोठ्या दुकानांत शर्ट विकत घ्यायला आम्ही दोघे तिथे गेलों होतों. तिथल्या माणसानें 'तुम्ही भारतांतून आलांत का' म्हणून विचारलें. आम्ही 'होय' म्हटलें तेव्हां चीनचें आक्रमण, नेहरू–गांधी वगैरेसंबंधीं आस्थेवाईकपणें चौकशी करून तुमच्याकडून सेल्स टॅक्स घेणार नाहीं म्हणून सांगितलें ! न्यूयॉर्कमध्यें एका कापडाच्या दुकानांत मी, पु. ल. देशपांडे वगैरे गेलों होतों. पु. ल.नां कोटाचें कापड घ्यायचें होतें. त्यांना हवें होतें तें सुंदर कापड अगदीं योग्य दरांत त्या दुकानदारानें दिलेंच; पण पैसे द्यायला पु. ल. नीं आपलें पाकीट बाहेर काढलें तेव्हां बंगाल, आसाममधल्या ग्रामोद्योग भांडारांतल्या पाकिटावरलें सुंदर रंगीत नक्षीकाम पाहून तो दुकानदार म्हणाला, 'किती सुंदर आहे हो हें पाकीट ! तुम्हांला तिथं द्यावी लागते त्याच्या दुप्पट किंमत द्यायला मी तयार आहे. मी माझा पत्ता देतों–तुम्ही मला पाठवाल का असलीं दोन तीन पाकिटं ? ' त्यानें लगेच आपला पत्ता पु. ल. जवळ दिला !

**अमेरिकनांची माणुसकी**

अमेरिका हें एक अत्यंत श्रीमंत, विपुल धनधान्य–धातूंनीं भरलेलें, प्रत्येक माणसाजवळ एक दोन मोटारगाड्या असलेलें राष्ट्र आहे, अशी आपली कल्पना आहे. ती खरीहि आहे. पण या विपुलतेची अमेरिकनांना जन्मापासून इतकी संवय झाली आहे कीं, सर्वसामान्यपणें माणसाजवळ इतकें असायलाच हवें असें त्यांना वाटतें. त्यामुळें श्रीमंतीचा ताठा किंवा गर्व कुठें आढळत नाहीं. एकप्रकारचा साधेपणा आणि उदारता त्यांच्यांत सहज आलेली आहे. एखाद्या गव्हर्नराच्या आसपास किंवा दारांतहि पोलीसप्यादे, नोकरचाकर, चपरासी कुणी दिसत नाहीं. तुम्ही भेटायला

गेलांत तर उठून 'या वसा' असें गव्हर्नर म्हणतो, चहाकॉफी आणायला कुणाला तरी सांगतो, आणि गप्पागोष्टी करतो. आपल्या मोटारींतून कुणाला इकडून तिकडे नेण्यांत आपण कांहीं औदार्य किंवा विशेष सौजन्य दाखवतों आहोंत असें अमेरिकन माणसाला मुळींच वाटत नाहीं. हें एवढें केलेंच पाहिजे, आहे काय त्यांत, असें त्याला वाटतें. सॅन्फ्रॅन्सिस्को-मध्यें एक दिवशीं सकाळीं प्रातरुपाहार घेत मी वसलों होतों. त्या दिवशीं विशेष कार्यक्रमासाठीं कुठें कांहीं जायचें नव्हतें. मुंवईतल्या माझ्या एका मित्राची मुलगी फ्रिस्कोपासून वीस मैलांवर असलेल्या रिचमंड या उपनगरांत एका अमेरिकन कुटुंबांत एक वर्षभर राह्यला आल्याचें मला माहीत होतें. त्या बाजूला गेलांत तर तिला भेटा म्हणून तिच्या आईवडिलांनीं मला बजावून सांगितलें होतें. हॉटेलांत माझ्या-बरोबर वसलेल्या मित्रांशीं बोलतांना मी पुन्हां पुन्हां म्हणत होतों, 'त्या मुलीला भेटायला जायला आज भरपूर वेळ आहे, मला जायची फार इच्छा आहे; पण रिचमंडला जायचें कसें?' पलीकडल्या टेबलाजवळ वसलेल्या एका वयोवृद्ध अमेरिकनानें शांतपणें माझ्याकडे पहात म्हटलें, 'अहो रिचमंडला जायची इतकी चिंता कसली करतां? चला मी नेतों तुम्हांला रिचमंडला माझ्या मोटारींतून.'

मी चांचरत म्हणालों, 'कधीं जायचं—तुम्हांला वेळ—'

'आत्तां जाऊं या', तो म्हणाला, 'वेळाचं काय—येऊं दोन तासांत परत. आज शनिवार, मला सुट्टी आहे. माझी लग्न झालेली एक मुलगी तिथं रिचमंडलाच राहते. चला, तुमच्या निमित्तानं मीहि तिला भेटून येईन.' असें म्हणून मला तो आपल्या मोटारींतून रिचमंडला घेऊन गेला. माझ्या मित्राच्या मुलीचा पत्ता त्यानें बरोबर शोधून काढला, मला तिथें नेलें आणि मला परत वेळेवर घेऊन आला.

**उपयुक्त तें सत्य, तें चांगलें?**

नाना प्रकारच्या हवामानांचा, नाना अन्नधान्यें, फळफळावळ पिकवू

शकणारा, पेट्रोल, लोखंड, जस्त, तांबें, सोनें, रुपें इत्यादींचे भरपूर सांठे भूगर्भांत असलेला अवाढव्य प्रदेश अमेरिकनांना दैवयोगानें प्राप्त झाला; पण दैवयोगानें ते श्रीमंत झाले नाहींत. या प्रदेशांतला कणन् कण अंग मोडून, वाटेल तें काम करून, आणि रात्रंदिवस घाम गाळून त्यांनीं बाहेर काढला, आणि आपला देश सर्व जगांतला अत्यंत संपन्न, अत्यंत पुढारलेला देश करून टाकला. त्यामुळे श्रीमंतीचा ताठा त्यांच्यांत आलेला नाहीं; आणि काम कसलेंहि असो,–भांडीं धुण्याचें असो कीं बूट पुसण्याचें असो, कामाबद्दल, श्रमाबद्दल त्यांना सारखाच आदर वाटतो. याबरोबरच एक प्रकारचा व्यवहारवाद आणि उथळपणाहि त्यांच्यांत आलेला आहे. मनापासून केलेल्या श्रमांना यश आल्यामुळें जें यशस्वी तें चांगलें, जें उपयुक्त तें सत्य असलेंच पाहिजे असें त्यांना वाटतें, आणि ज्याला यश मिळत नाहीं, जें उपयुक्त होत नाहीं तें वाईट किंवा असत्य असलें पाहिजे, असा त्यांचा ग्रह होतो. सद्धेतूंनीं सत्कार्य करीत असतांहि अनेक अपयशें आलेल्या, व्यावहारिक उपयुक्तता शून्य असूनहि मनाला अलौकिक आनंद देणारे अनेक अनुभव घेतलेल्या एखाद्या माणसामध्यें जी चिंतन-शीलता, जी स्थितप्रज्ञता दिसते ती सर्वसामान्यपणें इथें दिसत नाहीं. अगदीच नाहीं असें अर्थात् मुळींच नाहीं. चीननें भारतावर विश्वास-घातकीपणानें अमानुष आक्रमण केलें, चिन्यांशीं निकरानें भारतीय लढत आहेत, तरीहि यूनो या आंतरराष्ट्रीय संघटनेंत चँगच्या फोर्मोसा सरकारऐवजीं कम्युनिस्ट चीनलाच स्थान मिळालें पाहिजे, असें भारत अजूनहि कसें काय प्रतिपादन करतो याचें अनेक मोठमोठ्या अमेरिकन संपादकांनी आमच्यापाशीं महदाश्चर्य व्यक्त केलें. चीन शत्रू ना, कम्युनिस्ट वाईट ना, मग त्यांना कुठेंहि उभे करतां कामा नये, असें त्यांचें सोपें आणि सरधोपट त्रैराशिक. तत्त्वाचा विचार केला तर नामधारी फोर्मोसा सरकारपेक्षां नव्वद टक्के चिनी प्रदेशावर सार्वभौमत्व गाजवणाऱ्या कम्युनिस्ट चीनचाच यूनोंत बसण्याचा अधिकार आहे. कुणाचा शत्रु

असलेल्या किंवा कम्युनिस्ट राजवट असलेल्या राष्ट्राला यूनोंत स्थान द्यायचें नाहीं असा मुळींच नियम नाहीं. अमेरिकेला मुळींच आवडत नसलेला आणि कम्युनिस्ट असलेला रशिया यूनोंत अमेरिकेच्या खांद्याला खांदा लावून बसूं शकतो, इतकेंच नव्हे तर सर्व प्रकारची राजनैतिक मान्यता अमेरिकेनें रशियाला दिलेली आहे. तेव्हां यूनोंत कम्युनिस्ट चीनला स्थान मिळावें, असें अजूनहि भारत म्हणतो यांत आश्चर्य कांहींच नाहीं. अर्थात् हा दृष्टिकोन समजूं शकणारे हॅरिमन, टॅल्बट, गाल्ब्रेथ, केनेडीसारखे मुत्सद्दीहि अमेरिकेंत आहेतच. भारताला शस्त्रास्त्रें देण्यांत कांहीं अर्थ नाहीं, नेफांत झालें त्याप्रमाणें चिन्यांच्या पदरांत सर्व शस्त्रास्त्रें टाकून भारतीय सैनिक पळतील, असें मूर्खपणाचें विधान सीनेटर रसेल यांनीं केलें हें जितकें खरें आहे, तितकेंच हेंहि खरें आहे, कीं अमेरिकेकडून इथल्या परिस्थितीचा अभ्यास करण्याकरितां मुद्दाम आलेले अमेरिकेचे सेनापति ॲडॅम्स किंवा राजदूत गाल्ब्रेथ यांनीं तावडतोब जाहीर केलें कीं बलाढ्य राष्ट्रांच्या सैनिकांनींहि विशिष्ट परिस्थितींत शत्रूच्या तावडींत सर्व शस्त्रास्त्रें टाकून माघार घेतलेली आहे. ॲडॅम्स तर असें म्हणाले कीं, नेफांत भारतीय सैनिक असामान्य शौर्यानें लढले, पण बिचाऱ्यां-जवळ शौर्याखेरीज इतर सामग्रीच कांहीं नव्हती.


**आमचें जुनें नि तुमचें जुनें !**

स्वतःच्या दोषांना हंसण्याची आणि आपण आहोंत तरी कोण हें तिऱ्हाइतांकडून समजावून घेण्याची विनोदबुद्धीहि अमेरिकन माणसा-जवळ आहे. आपण कितीहि बलाढ्य आणि संपन्न राष्ट्र असलों तरी आपण नवथर, अननुभवी आहोंत, आपल्या मानानें तपोवृद्ध आणि वयोवृद्ध अशीं भारतासारखीं राष्ट्रें जगांत आहेत याची पूर्ण जाणीव सर्व-सामान्य अमेरिकनाला आहे. विल्यम्सबर्ग या व्हर्जिनियाच्या अठराव्या शतकांतल्या जुन्या राजधानींतल्या कांहीं इमारती किंवा वस्तु दाखवतांना आमचें मार्गदर्शन करणारी अमेरिकन बाई गंभीरपणें सांगत होती,

'हें तीनशें वर्षांचें जुनें आहे, याला साडेतीनशें वर्षें झालीं—' इतक्यांत एकदम तिच्या लक्षांत आलें, कीं आपण भारतासारख्या एका अत्यंत प्राचीन राष्ट्रांतल्या लोकांशीं बोलतों आहोंत. ती हंसून मध्येंच म्हणाली, 'हें आमचें जुनें बरें ! तुमचें नव्हे ! तुमचें जुनें म्हणजे तीन-तीन हजार वर्षांचें, तीसतीस चाळीसचाळीस शतकांचें ! ' रस्त्यांत, हॉटेलांत, विमानांत भेटणारे किती तरी अमेरिकन स्त्री-पुरुष मुद्दाम ओळख काढून आम्हांला विचारीत, 'तुम्हांला आवडला ना आमचा देश ? आमचं गांव कसं आहे ? ' 'छान आहे ! ' असं आम्ही म्हटलं कीं त्यांना मनापासून आनंद होई. आणि अगदीं मनापासून ते म्हणत, 'आमच्या शहरांत तुम्ही परत आलं पाहिजे हं ! '

हॉटेलांत माझ्याजवळ जेवायला बसलेली एक टुणटुणीत अमेरिकन म्हातारी मला एकदां म्हणाली, 'तुम्हांला हें आवडलं, तें आवडलं, ठीक आहे. आतां आमच्या अमेरिकेंत तुम्हांला काय आवडलं नाहीं तें सांगा बघूं ? ' मी हंसून म्हणालों, "तुमचं बर्फ खाण्याचं वेड ! '

ती मनापासून हंसली. इतकी थंडी, बाहेर बर्फ पडतो आहे, अशा वेळीं सकाळीं उठल्यावरोबर तुम्ही पाणी प्यायला मागितलेंत, तरी अमेरिकेंतल्या हॉटेलचा नोकर किंवा घरांतली बाई तीनचतुर्थांश ग्लास भरपूर बर्फाचे खडे घालून मग वर पाणी भरून तुमच्या हातांत आणून देईल ! पहिल्यापहिल्यांदां आमच्यापैकीं प्रत्येक जण असलें बर्फ घातलेलें पाणी आणलें कीं पाणी म्हणजे नुसतें पाणी द्या कीं असें रागावून ओरडूं लागला. एकदोन दिवसांनीं हॉटेलच्या परिचारिका आम्हांला थट्टेनें विचारूं लागल्या, 'पाणी म्हणजे नुसतं शुद्ध पाणी ना ? ' दूध बर्फांतलें, फळें बर्फांतलीं, पाण्यांत बर्फ असें बर्फाचें फार वेड आहे अमेरिकन लोकांना; पण अंतःकरण स्नेहाळ, धगधगीत आहे.



# : २ : अटलांटिकपार

मुंबई ते न्यूयॉर्क जाणारें एअर-इंडियाचें ‘ धवलगिरी ’ बोइंग विमान ७ रात्रीं एकला सुटणार होतें. पंधरावीस मिनिटें आधीं हंसतमुख हवाईसुंदरीचा नमस्कार हंसतमुखानें स्वीकारीत आम्ही विमानांत प्रवेश केला आणि स्थिरस्थावर झालों. बरोबर एक वाजतां विमान सुटलें. पहिला टप्पा मुंबई ते लेबॅनॉनची राधधानी बेरुत होता. बेरुतच्या विमानतळावर आम्ही उतरलों तेव्हां रात्रींचे तीन वाजले होते. प्रवास पांच-साडेपांच तासांचा झाला होता. आमच्या हातावरल्या घड्याळांत सकाळचे सहा-साडेसहा झाले होते. पण आतां रात्र वाढत होती. घड्याळ मागें पडत होतें. लंडनला जाईपर्यंत साडेपांच तास घड्याळ मागें जाणार. न्यूयॉर्कला पोहोंचेपर्यंत आणखी चार-पांच तास मागें. दहा-पंधरा मिनिटांत बेरुत येईल, असें विमानाच्या ध्वनिक्षेपकावरून सांगण्यांत आलें तेव्हां खुर्चीतल्या खुर्चीत पेंगत असलेले आम्ही सर्व खडबडून जागे झालों, आणि विमानाच्या कांचेंतून बाहेर पाहूं लागलों. मिट्ट काळोख होता. खालीं समुद्र असावा. काळोखांत जहाजांच्या दिव्यांचा लाल-पिवळा पुंजका कुठें कुठें थोडा उजळलेला दिसे. कांहीं वेळानें काळोखांत बुडालेल्या डोंगराच्या माथ्यावरल्या दिव्यांच्या रांगा लुकलुकतांना दिसल्या, आणि विमानतळावर विमान खालीं आलें. अर्धा-पाऊण तास विमान थांबणार होतें. कॉफी घेण्याकरितां आम्ही विमानांतून उतरून विमानगृहाकडे जाऊं लागलों. बेरुतचें विमानगृह ऐसपैस आणि भव्य आहे. सर्वत्र दिव्यांचा झगझगाट होता. काळा कोट, स्कर्ट असा युरोपियन पोशाख केलेल्या अरब परिचारिकेनें गरम गरम कॉफी सर्व उतारूंना आणून दिली. अमेरिकेचे भारतांतील राजदूत प्राध्यापक गालब्रेथ आमच्याच विमानांतून प्रवास करीत होते. तेहि कॉफीकरितां उतरले होते. त्यांना भेटायला कुणीहि सरकारी प्रतिनिधि विमानतळावर आलेला

नव्हता. इतरांप्रमाणेंच एका छोटचाशा टेबलाकडे एकटेच बसून त्यांनीं कॉफी घेतली आणि आपली सातफूट उंची सांवरीत तिथल्या गॅलरींत ते शतपावली करूं लागले !

**आल्प्सचें सर्वोच्च शिखर**

विमान स्वित्झर्लंडजवळ येऊं लागलें तेव्हां पहांट झाली होती. पस्तीस-चाळीस हजार फूट उंचीवरून विमान जात असल्यामुळें खालीं पांढऱ्या-शुभ्र ढगांचा अमर्याद क्षीराब्धि पसरलेला दिसत होता. कांहीं वेळानें ध्वनिक्षेपकावरून सांगण्यांत आलें कीं, आपण आतां आल्प्स पर्वतराजी-वरून जातों आहोंत,—लवकरच आल्प्सचें सर्वोच्च शिखर माँ ब्लांक दिसेल. आम्ही खिडक्यांच्या कांचांतून बाहेर पाहूं लागलों. विमान थोडचा कमी उंचीवरून उडत असावें. सतराअठरा हजार फूट उंचीचें तपकिरी पिवळसर रंगाचें अधूनमधून बर्फाच्छादित असलेलें माँ ब्लांक शिखर बराच वेळ एका बाजूला दिसत होतें. मधून मधून बर्फाचा शिडकाव असलेल्या अशाच काळसर तपकिरी रंगाच्या पर्वतराजी खालीं सर्वत्र पसरलेल्या दिसत होत्या. जिनेव्हाला उतरलों तेव्हां चांगलें उजाडलें होतें, आणि विमानगृहाकडे जाऊं लागलों तेव्हां गुलाबी थंडी वाजत होती. जिनेव्हाचें विमानगृह छोटेसेंच पण टुमदार आहे. जरीकांठी पांढरा मद्रासी फेटा बांधलेले सर रामस्वामी मुदलियार तिथें बसलेले दिसले. कुठल्यातरी आंतरराष्ट्रीय परिषदेसाठीं जिनेव्हांत आले असावे. गाल्ब्रेथना भेटण्यासाठीं इथें आले असतील. पलीकडच्या टेबलाशीं सुंदर युरोपियन पोशाखांतला एक सडपातळ बांध्याचा तरतरीत आफ्रिकी तरुण एकटाच बसलेला दिसला. आमच्यापैकीं कांहींजण म्हणाले, बिचारा एकटाच बसलाय्, आपण त्याला कॉफी घ्यायला टेबलावर बोलावूं या. तो आनंदानें आमच्यांत येऊन बसला. सोमालिया या नवीनच आफ्रिकी राष्ट्राच्या पॅरिसमधल्या वकिलातींतला तो अधिकारी होता. जिनेव्हाहून पॅरिसपर्यंत तो आमच्याबरोबर येणार होता. केव्हांतरी भारतांत मी

नक्की येऊन जाणार, तो म्हणाला.

**ओळखीचें लंडन !**

जिनेव्हाहून तास-दीड तासांत पॅरिसला पोहोंचलों. विमानगृहांत जाऊन इकडेतिकडे फिरत होतों तों एक तरुण फ्रेंच गृहस्थ आम्हांलाच शोधीत तिथें आला. तो एअरइंडियाचा पॅरिसमधला प्रतीनिधि होता. आम्हां मंडळींना भेटायला तो मुद्दाम आला होता. विमानगृहाच्या प्रशस्त मद्यालयाकडे हात करून तो म्हणाला, ' कांहीं घ्या ! ' आमचा अमेरिकन व्यवस्थापक जॉन् स्टॅन्डीश मोठा मिस्किल माणूस; त्याला वाटलें उपचार म्हणून हा कांहींतरी घ्या म्हणतो आहे,—पैसे आपल्यालाच द्यावे लागणार. तो हंसतहंसत विचारतो, ' हा पाहुणचार एअर-इंडियाचा ना ? '

' अर्थात् ! ' तोहि हंसून म्हणाला. ' घ्या बुवा तुम्हांला काय हवं तें ! ' स्टॅन्डीश आम्हांला म्हणाला. कुणी लाल फ्रेंच मद्य, कुणी पांढरें, तर कुणी फ्रेंच ब्रँडी थोडी थोडी घेतली. पंचवीस वर्षांपूर्वी पॅरिसमध्यें कांहीं दिवस मी राह्यलों होतों. यावेळीं विमान खालीं येतांना आकाशांतून पॅरिसचीं घरें, रस्ते व त्यावरून मुंग्यासारख्या जाणाऱ्या मोटारी दिसल्या तेवढ्याच. पॅरिसहून तास दीड तासांत लंडनच्या विमानतळावरअलों. तळापासून विमानगृह दूर असल्यामळें वसमधून विमानगृहापर्यंत आम्हांला नेण्याची व्यवस्था होती. थंडी खूप झोंबत होती. पण आश्चर्य म्हणजे चांगला सूर्यप्रकाश होता,—लंडनची नेहमींची काळ-वंडलेली, धुकट, पावसाळी हवा नव्हती. इंग्रजांच्या पूर्वकाळच्या बऱ्या-वाईट दीर्घ संबंधामुळें इंग्लंडांत आलें कीं, थोडेंसें घरगुती वातावरणांत आल्यासारखें वाटतें खरें !

सकाळचे अकरा साडेअकरा वाजले होते. तास दीड तासच विमान लंडनला थांबणार होतें. गांवांत जाऊन येणें शक्यच नव्हतें. तेव्हां लंडन-मधल्या एक दोन मित्रांशीं टेलिफोनवरून बोलतां येतें का पहावें असा

विचार केला. तिथल्या टेलिफोनमध्यें टाकायला ब्रिटिश नाणीं जवळ नव्हतीं. कॉफी, डोनट् वगैरे प्रातरुपाहार देणाऱ्या वाईला विचारलें. तिच्याकडेहि डॉलरचीं ब्रिटिश नाणीं मिळेनात. तिथें वाकावर वसलेली एक अमेरिकन मुलगी म्हणाली, हीं घ्या ब्रिटिश नाणीं माझ्याकडे आहेत. आम्हां भारतीय मंडळींशीं मोठ्या आपुलकीनें ती बोलत होती. मुंबईतल्या कुणातरी पारशी मुलाशीं तिचें लग्न ठरलें होतें. अमेरिकेंतल्या घरच्या मंडळींना भेटून ती मुंबईला कांहीं दिवसांनीं परत येणार होती. म्हणून आम्हां सासरच्या माणसांसाठीं ती होईल तें करीत होती !

**अटलांटिक ओलांडला**

दुपारीं पाऊणच्या सुमारास विमानानें लंडन सोडलें. वेळापत्रकाप्रमाणें दुपारीं ३-२० ला आम्ही न्यूयॉर्कला पोहोंचणार, पण प्रवास पावणे-तीनच तासांचा नाहीं. न्यूयॉर्कला आणखी चार साडेचार तास घडयाळ मागें जाणार. म्हणजे आतां अटलांटिक महासागरावरून सात तास सतत उड्डाण करावयाचें. अक्षरशः सात तास खालीं महासागर आणि वर अफाट आकाश, पण विमानाच्या कांचेतून बाहेर पाहिलें तेव्हां मात्र खालीं महासागराचें पाणी मुळींच दिसत नव्हतें. हिमालयाच्या सव्वा-पट दीडपट उंचीवरून विमान जात असल्यामुळें स्वच्छ सूर्यप्रकाशांत झळझळणारा पांढऱ्या ढगांचा क्षीराब्धीच दिसत होता. आमच्या 'धवलगिरी' विमानाचे मुख्य वैमानिक श्री. महाजन होते. दुपारचें जेवण झाल्यावर त्यांनीं आपल्या 'कॉकपिट' मध्यें बोलावलें तेव्हां थोडा वेळ तिथें गप्पा करीत बसलों. शेकडों बारीक बारीक यंत्रें, काळा आणि हिरवीं, तांबडीं, निळीं बटनें यांनीं भरलेल्या विमानाच्या त्या 'नाकां'त त्यांचे दोन तीन साहाय्यक दाटीवाटीनें बसले होते. सहाशें सातशें मैल वेगानें जात असून जेट विमान चालतें आहे असें वाटतच नाही. 'हें असं काय हो ? ' मी महाजनांना विचारलें.' फ्रिक्शन नाहीं— मागें धांवताहेत अशीं दिसणारीं झाडें, घरें आजूबाजूला नाहींत तेव्हां

असंच वाटणार ! ' ते हंसून म्हणाले. या उमद्या वैमानिकाचे आभार मानून मी परत माझ्या जागीं आलों.

तीनच्या सुमारास खालीं जमीन व शहरें दिसूं लागलीं. तांबूस पिवळी शेतजमीन, हिरवीं झाडें, रस्त्यांचे लांबच लांब आडवे उभे पट्टे, टुमदार घरांच्या दाटींत मध्येंच मोकळ्या जमिनीवर रंगीबेरंगी मोटारींचे थवे दिसत होते. कुणी म्हणालें, न्यूयॉर्कच्या उत्तरेकडे असलेलें हें बॉस्टन असेल, पण न्यूयॉर्कच्या गगनचुंबी इमारती कुठेंच दिसत नव्हत्या. दहा-पंधरा मिनिटें समुद्रावर, नदीवर घिरट्या घेऊन विमान साडेतीनला न्यूयॉर्कच्या आयडलवाईल्ड विमानतळावर उतरलें. बाहेर चांगलेंच ऊन होतें आणि अंगांत गरम कपडे असल्यामुळें चांगलेंच उकडत होतें. या अफाट विमानतळाच्या दुसऱ्या टोंकाला जाऊन तिथून तासदीड तासानें लहान विमानानें आम्ही वॉशिंग्टनला जाणार होतों. उतरल्याबरोबर विमानासमोरच आम्हां वीसबावीस जणांना थोडावेळ उभे करून अमेरिकन वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींनीं आमचे फोटो घेतले. कस्टमचे कागदपत्र झाल्यानंतर आम्ही बाहेर आलों. एका बसमध्यें आमचें सर्वांचें सामान ठेवलें होतें. छोट्या विमानतळावर त्या बसनें गेलों, आणि वॉशिंग्टनला जाणाऱ्या छोट्या विमानांत बसलों.

**अमेरिकेच्या राजधानींत आलों**

तास दीड तासांत खालीं वॉशिंग्टनची पोटोमॅक नदी, तिच्यावरले पूल, लिंकन स्मारकाची भव्य शुभ्र वास्तु, कॅपिटॉलचा घुमट, वॉशिंग्टन-स्मारक स्तंभाचा मनोरा, झाडांच्या दाटींतून जाणारे रस्त्यांचे पट्टे वगैरे दिसूं लागलें. विमानतळावरून बसनें शेरॅटन कार्लटन हॉटेलांत येऊन दाखल झालों. दोघां-दोघांना एक एक भव्य खोली दिलेली होती. पी. टी. आय. रॉयटरचे गुर्जर आणि मी एका खोलींत होतों. चोवीस तासांहून अधिक सतत विमानाचा प्रवास झाला होता. स्नान वगैरे उरकून कपडे केले, आणि हॉटेलच्या बाहेर येऊन रस्त्यावर उभे राहिलों.

संध्याकाळचे सात साडेसातच वाजले होते. जेवायला वेळ होता. वॉशिंग्टन ही अमेरिकेची राजधानी—जगांतल्या सर्वांत श्रीमंत आणि बलाढ्य देशाची राजधानी. आमच्या मुंबईत या वेळेला रस्त्यांत किती गर्दी असते, —अमेरिकेंत तर गर्दीच गर्दी दिसली पाहिजे अशी आमची कल्पना. गुर्जर आणि मी दोघेंहि एकमेकांकडे कावरे बावरे होऊन पाहात होतों. कसेंसेंच वाटत होतें. वॉशिंग्टनच्या लांब रुंद, सरळ आंखीव रस्त्यावर माणसेंच दिसत नव्हतीं. शुकशुकाट. एखाद् दुसरा पुरुष किंवा बाई इकडून तिकडे जातांना क्वचितच दिसली. मोठमोठ्या, सुंदर मोटारी मात्र कांहीं आवाज न करतां सरासरा रांगेनें जात होत्या, येत होत्या, कोपऱ्यावरचे हिरवे दिवे लाल झाले कीं स्तब्ध होऊन थबकत होत्या, हिरवे झाले कीं चालू लागत होत्या !

मोटारींच्या त्या स्तब्ध हालचालीमुळें सारी भूतचेष्टाच वाटत होती. मग एकदम आमच्या डोक्यांत प्रकाश पडला. इथें सर्वांच्याच मोटारी असल्यामुळें रस्त्यांतून चालणार कोण ? रस्त्यांत असणारीं माणसें मोटारींतच आहेत ! त्यांत आणखी आज शनिवार. अमेरिकेंत शनिवार आणि रविवार दोन्ही रजेचे दिवस. शेरॅटन कार्लटनमध्यें जेवण्याचीं निरनिराळीं दालनें आहेत. एकाला शेक्सपियरच्या नाटकांतील अजरामर विनोदी पात्र फॉल्स्टॉफ् याचें नांव दिलें आहे; आणि त्याच्या गलेलठ्ठ मूर्तीचें भव्य तैलचित्र तिथें लावलें आहे. आज रात्रींची आम्हां मंडळीची जेवणाची व्यवस्था 'फॉल्स्टॉफ रूम' मध्यें होती. तांबडे पडदे, तांबड्या मखमलीच्या खुर्च्या, तांबड्या दिव्यांचे झुंबर असा 'फॉल्स्टॉफ रूम'चा सर्व तांबडा थाट होता.

**तीन दिवसांत दोन स्फोट !**

वॉशिंग्टनमध्यें आम्ही येऊन पोहोंचलों, आणि तिथल्या वीस ते तेवीस ऑक्टोबर एकोणीसशें बासष्टच्या तीन दिवसांच्या मुक्कामांत जगाला हादरून टाकणारे दोन राजकीय स्फोट एकामागून एक झाले.

हिमालयाच्या परिसरांत चीननें भारतावर आक्रमक मुसंडी मारल्याच्या बातम्या येऊन थडकल्या; आणि क्यूबाप्रकरण भडकून जागतिक युद्धाचा प्रारंभ—वॉशिंग्टनवर रशियन अण्वस्त्रांचा वर्षाव आज होणार कीं उद्यां होणार अशी परिस्थिति निर्माण झाली. या परिस्थितीची थोडीशी कल्पना, इथें आल्यावर पत्रकारांशीं झालेल्या माझ्या कांहीं प्रश्नोत्तरांवरून येईल. तीं प्रश्नोत्तरें अशीं :

**प्र.** : तुम्ही तिथं वीस ऑक्टोबरला पोहोंचलांत, नि इथं त्याच दिवशीं चीननं मुसंडी मारून भारताशीं सरळ युद्धच सुरू केलं. तिथल्या राजकीय नेत्यांवर नि एकंदर सर्वसामान्य जनतेवर या घडामोडींचा काय परिणाम झाला तो तुम्हांला दिसलाच असेल ?

**उ.** : चांगलाच दिसला ! चीनच्या हल्ल्यामुळं आपलं काय होणार म्हणून आपल्या आसाममधले लोक हवालदिल झाले नसतील इतके वॉशिंग्टनमध्यें नुकतेच येऊन ठेपलेले आम्ही पांच लेखक आणि सतरा पत्रकार त्या चार दिवसांत हवालदिल झालों होतों !

**प्र.** : म्हणजे ?

**उ.** : म्हणजे असं कीं त्याच वेळेला २० ते २४ ऑक्टोबर या चार दिवसांत क्यूबाप्रकरण भडकलं होतं, नि रशियाच्या क्यूबाकडे जाणाऱ्या बोटींनीं अमेरिकी आरमाराकडून तपासणी करून घेण्याचं नाकारलं तर सरळ त्यांना बुडवून टाकण्याचे हुकूम अध्यक्ष केनेडींनीं सोडले होते. ही नाकेबंदी करण्याचा अमेरिकेला मुळींच हक्क नाहीं, आमचीं जहाजें अमेरिकी आरमाराचे हुकूम मुळींच मानणार नाहींत, अशी डरकाळी ख्रुश्चेव्हने फोडली होती. संध्याकाळीं ७ वाजतां केनेडीचें सर्व राष्ट्राला उद्देशून केलेलें तें भाषण आम्ही आमच्या हॉटेलांतल्या आपापल्या खोलींतल्या टेलिव्हिजन सेटवर ऐकलें; आणि भराभर टेलिव्हिजनवर बातम्या येऊं लागल्या कीं, अडतीस कीं चाळीस रशियन बोटी चाळीस तासांत क्यूबा नाकेबंदीची रेषा ओलांडतील. चोवीस तासांत

रशिया–अमेरिकेचें युद्धच सुरू होण्याची दाट शक्यता निर्माण झाली होती. क्यूबाच्या तळावरून रशियाचीं क्षेपणास्त्रें अमेरिकेच्या ज्या महत्त्वाच्या शहरांवर कांहीं क्षणांत येऊन पडतील त्यांत वॉशिंग्टन शहराला अर्थात् अग्रस्थान होतें.

**प्र.** : ओहो ! म्हणजे आसामच्या जनतेपेक्षांहि तुम्हां मंडळींवर युद्धाची छाया अधिकच गडद पडली होती !

**उ.** : होय. व्हाइट हाऊसमध्यें राजकीय नेते आणि सेनानी यांची सारखी ये-जा चालली होती, नि वातावरण युद्धाच्या अपेक्षेनें स्फोटक झालें होतें. तितक्यांत चिनी-भारतीय युद्धाच्या बातम्या येऊन थडकल्या. आमच्यापैकीं कित्येक तर आपण भारताला लगेच परत जाऊं या म्हणूं लागले. हॉटेलांत किंवा रस्त्यांत भेटणारे अमेरिकन मित्र हंसून सांगूं लागले, आतां आपणाला दोघांनाहि लढायचंय्–वड्या भाईचा–म्हणजे रशियाचा आम्ही समाचार घेतों, तुम्ही छोट्या भाईचा म्हणजे चीनचा समाचार घ्या !

**प्र.** : वॉशिंग्टनमध्यें त्या दिवसांत कुणा मोठ्या राजकीय नेत्यांची नि तुमची भेट झाली का ?

**उ.** : झाली कीं–सध्यां भारतांत आलेले ॲव्हरेल हॅरिमन यांची स्टेट डिपार्टमेंटमध्यें आम्हां मंडळींची अर्धा-पाऊण तास मुलाखत झाली. हॅरिमन हे युद्धकाळांत अध्यक्ष रुझव्हेल्ट यांचे खास सल्लागार होते. आजहि ते ॲसिस्टंट सेक्रेटरी ऑफ स्टेट असले तरी केनेडींच्या खास विश्वासांतले मुत्सद्दी समजले जातात.

**प्र.** : त्यांच्याशीं काय बोलणें झालें ?

**उ.** : क्यूबा आणि चीन या दोन विषयांखेरीज त्या दिवसांत दुसरा विषयच कुणाच्या तोंडीं नव्हता. ‘ क्यूबा प्रकरणांत रशियानें माघार घेतली नाहीं तर काय होईल ? आमच्यापैकीं कुणी तरी विचारलें. शांतपणें हंसून हॅरिमन म्हणाले, ‘ युद्ध ! प्रत्येक राष्ट्राला अशा प्रकारचा

निर्णय केव्हां ना केव्हां करावाच लागतो. आम्ही तो यावेळीं केला आहे हें केनेडींच्या कालच्या स्पष्ट हुकुमावरून तुमच्या ध्यानांत आलेंच असेल.'

**प्र.** : चीन-भारत युद्धासंबंधीं ते काय म्हणाले ?

**उ.** : आमच्यापैकी कुणी तरी म्हणाला कीं, आतां अमेरिकेची मिळेल तितकी मदत आम्हांला हवी आहे. यावर ते चटकन् म्हणाले, 'तुम्ही मागाल तें साहाय्य तावडतोब मिळेल म्हणून कालच केनेडी यांनीं सांगितलेंच आहे, आम्ही नेहमींच हवी ती मदत द्यायला तयार होतों. 'भारतावरील या चिनी आक्रमणाबद्दल तुम्हांला काय वाटतं ? असें आम्हीं विचारलें तेव्हां मिष्किल स्मित करीत ते म्हणाले, 'हा प्रश्न मी तुम्हांला विचारायला पाहिजे !'

**प्र.** : म्हणजे ?

उ. : या उत्तरांतली खोंच कुणाच्याहि लक्षांत येईल. कम्युनिस्ट चीनला अमेरिकेचा पहिल्यापासूनच विरोध आहे. 'हिंदी-चिनी भाई भाई !' म्हणून वेळीं अवेळीं नाचणाऱ्या आम्हां लोकांना चिन्यांच्या या उलटच्या काळजाच्या आक्रमणाबद्दल आतां काय वाटतं म्हणून कुणीहि विचारणारच !

**प्र.** : ॲव्हरेल हॅरिमनप्रमाणेंच आणखी कुणा बड्या अमेरिकी मुत्सद्द्यांची नि तुम्हां भारतीय पत्रकार लेखकांची भेट झाली का ?


**उ.** : झाली ना ! हॅरिमनप्रमाणेंच दुसरे एक ॲसिस्टंट सेक्रेटरी ऑफ स्टेट मि. टॅल्बट यांच्याशींहि वॉशिंग्टनमध्यें आमची मुलाखत ठरवलेली होती. स्टेट डिपार्टमेंटमधील त्यांच्या खोलींत आम्ही गेलों तेव्हां हॅरिमनच्या मानानें खूपच तरुण आणि अगदीं खेळीमेळीनें बोलणारा असा गृहस्थ आमच्याशीं हस्तांदोलन करण्याकरितां दारांत उभा असलेला आम्हांला दिसला. टॅल्बट पूर्वीं दिल्लींत होते म्हणतात. फारच तडफदार नि एकंदर जागतिक राजकारण किंवा चीन-भारत प्रश्न इत्यादींची अचूक माहिती असलेले वाटले. अमेरिकेचा दृष्टिकोन

त्यांनीं थोडक्यांत पण अगदीं रेखीव असा आमच्या प्रश्नांना उत्तरें देतांना मांडला.

प्र. : ते काय म्हणाले ?

उ. : अमेरिकन ' टाईम ' पत्राच्या ताज्या अंकांत त्यांच्या तोंडचीं भारत-चीन लढ्यासंबंधीं कांहीं वाक्यें मी नुकतीच वाचलीं तेंच आमच्याशीं बोलतांना ते म्हणाले, ' तुमच्या अलिप्ततावादाशीं किंवा नॉनअलाइनमेंटशीं आम्हांला कांहीं एक कर्तव्य नाहीं. तुमचं राजकारण तुम्हींच केलं पाहिजे. आम्ही कोण सांगणार ?' पण, ते म्हणाले, ' भारताला आम्ही मित्र-राष्ट्र समजतों. तुमच्या घराचें छप्पर फोडून चोर आंत शिरलाय, त्याला बाहेर काढण्याकरितां आमच्या मित्राच्या मदतीला आम्ही धांवणारच. आम्ही कां धांवतों नि किती मदत करतों हा प्रश्नच उद्‌भवत नाहीं. ' ' टाईम 'च्या याच अंकांत पुढं म्हटलंय, कीं चोर आतां घराच्या छपरावरून घरांतल्याच खालच्या खोलींत येऊन म्हणतोय, मी आतां तुमच्यापैकीं कुणावरहि गोळ्या झाडणार नाहीं. आतां आपण शांतता करून टाकूं या कसे !

—



# : ३ : वॉशिंगटन

**वॉशिंग्टन डी. सी.**

अमेरिकेंत एकाच नांवाचीं अनेक गांवें आहेत, तेव्हां त्या गांवापुढे त्या त्या राज्याचा उल्लेख करावा लागतो. वॉशिंग्टन राजधानीचा नेहमीं वॉशिंग्टन डी. सी. म्हणजे डिस्ट्रिक्ट कोलंबिया असा उल्लेख करावा लागतो. दिल्लीचा जसा वेगळाच राज्यप्रदेश केलेला आहे, तसाच व्हर्जिनिया राज्यांतून वॉशिंग्टनसाठीं हा डिस्ट्रिक्ट कोलंबिया वेगळा काढला आहे. अमेरिकेच्या पन्नास राज्यांपैकीं व्हर्जिनिया हें फार जुनें व मोठें राज्य आहे. कापूस, तंबाखूबद्दल हा प्रदेश जगप्रसिद्ध आहे. प्रख्यात व्हर्जिनिया तंबाखू इथलाच. अमेरिकेच्या चेस्टरफील्ड सिगारेटींचा प्रचंड कारखाना व्हर्जिनियाची राजधानी रिचमंड येथेंच आहे. अमेरिकेचा स्वातंत्र्यवीर आणि पहिला राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन व्हर्जिनियांतलाच. व्हर्जिनियानें आतांपर्यंत अमेरिकेला पांच सहा अध्यक्ष दिले आहेत असें व्हर्जिनियाचे लोक मोठ्या अभिमानानें सांगतात. १७५४ ते १७९९ पर्यंत वॉशिंग्टन ज्या घरांत राहिला तें त्याचें घर ‘ माऊंट व्हर्नॉन ’ वॉशिंग्टनपासून पंधरा सोळा मैल आहे. अमेरिकेच्या राष्ट्रपित्याचें हें घर आतां अर्थात् एक महत्त्वाचें यात्रास्थल झालें आहे. पटोमॅक् नदीच्या काठीं हिरव्यागार गवतानें आच्छादलेल्या भूमीवर हें घर आहे.

**जॉर्ज वॉशिंग्टनचें घर**

प्रातरुपाहारानंतर आमच्या शीतोष्णनियंत्रित आराम-बसमधून आम्ही माऊंट व्हर्नॉनला जावयाला निघालों. दोन तीन मैलांवर पटोमॅक नदीच्या पुलावरून पलीकडे गेल्याबरोबर व्हर्जिनियाचा आर्लिंग्टन विभाग आला. रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या झाडीचा रंग मोठा मजेदार दिसत होता. शिशिर ऋतु असल्यामुळें झाडांचीं पानें गळून पडत होतीं. अमेरिकी इंग्रजींत या ऋतूला ‘ फॉल ’ किंवा पानझड असेंच नांव आहे.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८६५१ वि: प्रवास
क्रमांक ३८६५१ नों. दि.

बरींचशीं पानें पिवळीं होऊन पडत होतीं; पण झाडावरल्या पानांत कांहीं हिरवीं आणि कांहीं तांबडीं अजूनहि दिसत होतीं. वाटेंत ' होगेट्स सीफूड रेस्टोरां 'मध्यें आम्ही दुपारचें जेवण घेतलें, आणि व्हर्नॉनला जाण्यापूर्वी अलेक्झांड्रिया गावांतील वॉशिंग्टन जिथें नेमानें जात असे तें ख्राइस्ट चर्च प्रार्थनामंदिर पाहायला थोडा वेळ थांबलों. या जुनाट, चिमुकल्या चर्चमध्यें बसायचीं बांकें, धर्मगुरूचें व्यासपीठ वगैरे सर्व कांहीं चकचकीत ठेवलें आहे. वॉशिंग्टनचा आणि रॉबर्ट लीचा ' प्यू ' किंवा बसायची राखीव जागा तिथल्या माणसानें दाखवली. या चर्च-जवळच्याच शाळेंत वॉशिंग्टन जात असे. चर्चच्या आवारांत अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धांत देह ठेवलेल्या कांहीं वीरांचीं थडगीं आहेत.

**हें काय असेल बरें ?**

अलेक्झांड्रियाहून पुढें आम्ही ' माऊंट व्हर्नॉन 'ला गेलों. वॉशिंग्टनचें दोनशें वर्षांचें हें घर आंतल्या टेबलें, खुर्च्या, पलंगासह जसेंच्या तसें व्यवस्थित ठेवलें आहे. घर तसें चिमुकलें आहे. तळमजला व वरचा मजला मिळून फार तर आठ नऊ खोल्या असतील. मागल्या बाजूला पटोमॅकचें विस्तीर्ण पात्र आहे आणि आजूबाजूला गर्द झाडी असलेल्या शेकडों एकर जमिनीवर वॉशिंग्टनची फुलबाग, स्वयंपाकघर, त्याच्या कचेरीची छोटीशी इमारत, घोडागाडीचे तबेले, माळ्याचें घर वगैरे छोटया छोटया वास्तु आहेत. वॉशिंग्टनची अठराव्या शतकांतली नक्षीकाम असलेली घोड्याची गाडी अजूनही पाहावयाला मिळते. स्वयंपाकघरांतलीं भांडीं, मांस टांगायचे आकडे, मांसाला धुरी देण्याची जागा वगैरे व्यवस्थितपणें राखून ठेवल्या आहेत. गर्द झाडीच्या रस्त्यानें एका टोकाला गेलें कीं सभोंवतीं लोखंडी कठडा असलेलें वॉशिंग्टन आणि त्याची पत्नी यांना जिथें पुरलें तें समाधिस्थळ दिसतें. घोड्याच्या पागा पाहून आम्ही परतत होतों तेव्हां दूर अंतरावर एक पांढऱ्या रंगाचें झोपडीवजा घर दिसलें. ' हें काय असेल बरें ? ' आमच्या एका मद्रासी

पत्रकारमित्रानें गंभीरपणें विचारलें. वात्रट जॉन स्टॅन्डीशनें गंभीर चेहरा करून ताबडतोब उत्तर दिलें, बहुधा वॉशिंग्टनचे संडास असावेत,— घरापासून फार दूर असल्यामुळें सकाळीं ताबडतोब पळण्याकरितां या पागेंत घोडे तयार असत !

**अमेरिकेचा अज्ञात वीर**

वॉशिंग्टनला परतण्यापूर्वी वाटेंत आर्लिंग्टन येथील लीमॅन्शन भोंवतालच्या इतस्ततः पसरलेल्या जागेंतील ' राष्ट्रीय समाधिस्थळ ' किंवा नॅशनल सिमेटरी पाहिलें—अमेरिकेच्या धारातीर्थीं देह ठेवलेल्या योद्धयांचीं आणि थोर पुरुषांचीं थडगीं इथें आहेत. दररोज संध्याकाळीं अमेरिकेच्या अज्ञात वीरांची समाधि जिथें आहे तिथें ' चेंजिग ऑफ गार्ड्स् ' किंवा पहारा बदलण्याचा मोठा गंभीर समारंभ होतो. फिरायला आलेले पुष्कळ स्त्रीपुरुष आणि मुलें तिथें गंमत बघायला आलेलीं असतात. जुन्या तऱ्हेचा तंग गणवेप घातलेला सैनिक संगीन लावलेली बंदूक खांद्यावर ताठ धरून टपक् टपक् पावलें टाकीत कमरेंत लचकल्यासारखा समाधीसमोरच्या आंखीव जागेंत इकडून तिकडे फेऱ्या घालीत असतो. संध्याकाळीं पहारा बदलण्याची वेळ झाली कीं एक अधिकारी आणि तसाच गणवेष घातलेला, संगीन लावलेली बंदूक खांद्यावर धरलेला दुसरा पहारेकरी तिथें येतो. अधिकारी हुकूम सोडतो. दुसरा पहारेकरी तशींच टपक् टपक् पावलें टाकीत पहिल्या पहारेकऱ्याबरोबर चालतो. खाड्कन् दोघे समोरासमोर उभे राहतात. सलाम्या, हुकूम झडतात, आणि दुसरा पहिल्यासारखा टपक् टपक् लचकत चालूं लागतो !

**आणीबाणींत व्हाइट हाऊस**

आमच्या शेरेटन-कार्लटन हॉटेलच्या रस्त्यावरून पुढें गेल्यावर पलीकडे पांचदहा मिनिटांच्या अंतरावरच अमेरिकेचें राष्ट्रपतिभवन किंवा ' व्हाइट हाऊस ' होतें. नांवाप्रमाणें तें पांढऱ्या रंगाचें आहे, पण फार जुन्या काळांतलें असल्यामुळें अमेरिकेच्या अध्यक्षांचें निवासस्थान

म्हणून आपण केलेल्या कल्पनांच्या मानानें फार मोठें किंवा भव्य वाटत नाहीं. फार साधें वाटतें. आजूबाजूला, पुढल्या मागल्या द्वाराशीं कडेकोट बंदोवस्तहि दिसला नाहीं. गणवेशांतले पोलीस किंवा हत्यारबंद पहारेकरीहि आमच्या दृष्टीला कुठें पडले नाहींत. क्यूबाप्रकरण पेटलें होतें आणि महायुद्धाचे ढग त्या दिवसांत आकाशांत दाट जमले होते तरीहि डोळ्यांत भरण्यासारखा सैनिकी बंदोबस्त कांहींच दिसत नव्हता. 'व्हाइट हाऊस'च्या प्रशस्त आवारांतले भव्य, जुनाट वृक्ष शांतपणें सळसळत होते, आणि सकाळीं त्या बाजूला आम्ही फिरत होतों तेव्हां रस्त्यावर लोकहि अगदीं तुरळक दिसत होते. लोकशाही राज्यांचें एक वैशिष्ट्यहि तिथल्या एका प्रकारावरून एकदम आमच्या ध्यानांत आलें. इतकी आणीबाणीची परिस्थिति असूनहि सामान्य नागरिकांचे विचार आणि उच्चार-स्वातंत्र्य अगदीं व्हाइट हाऊसच्या दारांतहि अबाधित होतें.

**चित्रें कमी, धैर्य अधिक !**

व्हाइट हाऊसच्या एका फाटकाजवळच्या फुटपाथवर नेकटाय नसलेले, गबाळचा कोट-पाटलोणींतले, दाढचा वाढलेले पांच सहा लोक हातांत घोषवाक्यांचे फलक उंच धरून इकडून तिकडे फिरत होते, तर दुसऱ्या फाटकाशीं आणखी आठदहा तिरशिंगराव उलटचा घोषणांचे फलक घेऊन शांतपणें फेऱ्या मारीत होते. त्या दिवशीं चोवीस तासांच्या आंत अमेरिकेचें सैन्य क्यूबांत उतरून क्यूबा घेऊन टाकण्याचा संभव होता. क्यूबाच्या कम्युनिस्टधार्जिण्या कॅस्ट्रोचा कांटा एकदां कायमचा काढून टाकावा, असें बहुतेक अमेरिकनांना वाटत होतें. पण त्या तप्त वातावरणांतहि 'क्यूबाला हात लावूं नका !' 'क्यूबाचें स्वातंत्र्य झिंदाबाद !' अशा घोषणांचे फलक पहिल्या गटाच्या हातीं होते; तर दुसऱ्या गटांतल्या लोकांच्या हातीं केनेडींनीं तावडतोब क्यूबावर स्वारी करावी, असें सुचविणारे 'मोअर करेज् अँड लेस् प्रोफाइल्स'

अशा घोषणांचे फलक होते. या लोकांच्या मतें, रशियानें क्यूबांतलीं क्षेपणास्त्रें काढून नेण्याचें मान्य केलें, तर क्यूबाची नाकेबंदी उठवून कॅस्ट्रोच्या राजवटीला हात लावणार नाहीं, असें जाहीर करण्यांत केनेडींनीं कमालीचा दुबळेपणा दाखविला. कसलीहि तडजोड न करतां अमेरिकेनें कॅस्ट्रोचा नि:पात करावा, असें या लोकांचें मत ! केनेडींचें 'प्रोफाइल्स इन् करेज' या नांवाचें एक फार गाजलेलें पुस्तक आहे. इतिहासांत अत्युच्च धैर्य दाखविणाऱ्या पुरुषांचीं व्यक्तिचित्रें केनेडींनीं त्यांत रेखाटलीं आहेत. म्हणून 'मुखार्धचित्रण कमी करा,' आणि 'धैर्य अधिक दाखवा !' असें हेटाळणीच्या स्वरांत हे लोक केनेडींना बजावीत होते !

**पेन्टॅगॉन आणि नॅशनल आर्ट गॅलरी**

अमेरिकेच्या लष्करी, आरमारी आणि हवाई दलाच्या प्रमुख सेनानींच्या कचेऱ्या जिथें आहेत त्या जगप्रसिद्ध 'पेन्टॅगॉन'ची इतस्तत: पसरलेली प्रचंड पांचपाखी इमारत एके दिवशीं पाहिली. एका भव्य दालनांत चित्रफलक, रंगीत चित्रांच्या कांचा वगैरेंची मांडणी करून पाहुण्यांना अमेरिकेच्या शस्त्रबळाची कल्पना देण्याची सुरेख व्यवस्था केलेली आहे. शास्त्रीय संशोधकांच्या स्मिथ्सोनियन इन्स्टिटच्यूटमध्यें आकाशांत उपग्रह सोडणाऱ्या अमेरिकेच्या प्रचंड अग्निबाणांचे नमुने पाहायला मिळाले. संहारक शस्त्रास्त्रांचे हे नमुने पाहिल्यानंतर वॉशिंग्टनमधली नॅशनल गॅलरी ऑफ आर्ट पाह्यला गेलों तेव्हां मनावरलें ओझें उचलल्यासारखें होऊन बरें वाटलें. या विख्यात गॅलरीच्या भव्य इमारतींत पंधराव्या शतकापासून तों आजतागायतच्या मोठमोठ्या चित्रकारांच्या भव्य कलाकृती पहावयाला मिळतात. अमेरिकेचे एक कोट्याधीश मेलॉर यांनीं लाखों डॉलर्स खर्च करून जमविलेला जगांतल्या कांहीं अमोल चित्रांचा संग्रह या गॅलरीला दिला आहे, इतकेंच नव्हे तर आणखी कित्येक लक्ष डॉलर्स खर्च करून तो संग्रह ठेवण्याकरितां या इमारतींत

दालनें बांधून दिलीं आहेत ! या गॅलरीचा विशेष हा कीं ज्या काळांतलीं चित्रें आहेत त्याला अनुरूप अशीं बहुतेक दालनांची रचना आणि स्वरूप आहे. एके काळीं वॉशिंग्टनमधील शिक्षणखात्याचे प्रमुख असलेले डॉ. रेमंड स्टाइट्स हे वयोवृद्ध रसिक गृहस्थ आम्हांला मार्गदर्शक म्हणून लाभले होते. प्रत्येक चित्राचा इतिहास आणि मर्म स्टाइट्स अत्यंत तन्मयतेनें समजावून सांगत होते.

**कॅपिटॉल आणि फिलिबस्टर**

अमेरिकेची लोकसभा किंवा सीनेट आणि हाऊस ऑफ् रेप्रेझेन्टेटिव्हजची कॅपिटॉल ही इमारत दाखवणारी आमची मार्गदर्शिकाही फार चुणचुणीत बाई होती. सीनेटरांच्या आणि रेप्रेझेन्टेटिव्हांच्या अनेक गमती तिनें निरनिराळीं सभागृहें दाखवितांना सांगितल्या. सभासद गृहांत उभा राहून बोलतो आहे तोंपर्यंत त्याला हवा तितका वेळ बोलण्याचा हक्क असतो, मध्येंच त्याला बाहेर जावें लागलें तर त्याचा तो हक्क जातो. एखादें विधेयक दिवसचे दिवस पुढें ढकलून त्या बैठकींत पास होऊं द्यावयाचें नसलें कीं त्याचे विरोधक ' फिलिबस्टर 'चा मार्ग स्वीकारतात. ' फिलिबस्टर ' म्हणजे आपला बोलत राहण्याचा हक्क बजावून दोन-दोन तीन-तीन दिवस बोलत राहायचें, तिथेंच बोलतां बोलतां खायचें, पाणी प्यायचें, पण खालीं बसायचें नाहीं किंवा सभागृहाबाहेर जावयाचें नाहीं. एका सीनेटरानें ' फिलिबस्टर ' चालविलें असतां त्याला मधून मधून सिगारेट ओढण्याची हुक्की येई. तेव्हां तो बोलत बोलत सभागृहाच्या दारापर्यंत जाई आणि पाय, पार्श्वभाग सभागृहांत ठेवून फक्त तोंड दरवाजाबाहेर काढी ! तिथें त्याचा सेक्रेटरी सिगारेट पेटवून उभा असे. तो त्याच्या तोंडांत सिगारेट देई. तोन तीन झुरके घेऊन सीनेटर मागें येई व भाषण पुढें चालू करी ! अनेक वर्षें सभागृहें दाखविण्याचा उद्योग केल्यामुळें या बाईला सभागृहें आणि सदस्य यांची खडान्‌खडा माहिती होती. आमचा स्टॅन्डीश म्हणाला, ही छटेल

म्हातारी दक्षिणेकडल्या राज्यांतली असावी ! आपण जसा बोलण्याच्या धाटणीवरून अमका घाटावरला, अमका कोंकण्या, अमका वऱ्हाडी, अमका खानदेशी हें ओळखतों, तसेंच अमेरिकेंतहि आहे. उत्तरेकडले म्हणजे ' यांकी ' जवडा रुंद पसरून आणि नाकांत फार बोलतात. दक्षिणे-कडल्यांचे इंग्रजी उच्चार अधिक पारंपरिक आणि जुने असतात, असें दिसतें.

## सुप्रीम कोर्टाचा साधेपणा

एके दिवशीं सकाळीं आम्ही सुप्रीम कोर्ट पाह्यला गेलों. बरोबर वेळेवर सरन्यायाधीश अर्ल वॉरन् आणि त्यांचे आठ सहकारी स्थानापन्न झाले. त्या दिवशीं नवे वकील पटावर दाखल करून घ्यावयाचे होते. सर-कारकुनानें नांव पुकारलें कीं, नवा वकील पुढें येऊन उभा राह्यचा. त्याची शिफारस करणारा एखादा जुना वकील दोन मिनिटें बोलायचा. सरन्यायाधीश हंसतमुखानें ' मिस्टर ...... यू आर वेल्कम् ......' म्हणायचे, आणि तो वकील मान लववून मागें जायचा. पंधरावीस तरी स्त्रीपुरुषांना त्या दिवशीं पटावर दाखल करून घेण्यांत आलें. नंतर थोडचा वेळाकरितां कोर्ट उठलें, आणि आम्ही बाहेर आलों. अत्युच्च अमेरिकी न्यायालयाचा कारभारहि बराच खेळीमेळीचा वाटला.

## धुण्याचें नि खाण्याचें वेड !

वॉशिंग्टनमधल्या ' ईव्हिनिंग स्टार ' पत्रानें आम्हांला मोठा खाना देऊन आपलीं प्रचंड मुद्रणयंत्रें आणि सर्व कचेऱ्या दाखविल्या. सर्व खातीं प्रचंड असूनहि अत्यंत टापटिपीचीं आणि चकचकीत, स्वच्छ वाटलीं. आपल्याकडल्या वजन करण्याच्या यंत्रासारखीं निरनिराळचा प्रकारच्या सिगारेटच्या पेटचा, चॉकोलेट, बिस्किटाच्या पुडचा, दहा सेंट, वीस सेंटचीं नाणीं टाकल्याबरोबर खाडकन् देणारीं यंत्रें ठिकठिकाणीं होतीं. थंड पाणी आणि कॉफीची व्यवस्था दिसलीच. यंत्रविभागांत सुद्धां भिंती किंवा जमीन स्वच्छ करीत असलेला कुणी ना कुणी दिसायचाच. अनक

ठिकाणीं हे प्रकार पाहून आमचे पु. ल. देशपांडे म्हणायचे “.....य लोकांना दोन गोष्टींचं वेड दिसतंय् – खाण्याचं नि धुण्याचं !”

**राजदूत बी. के. नेहरू**

अमेरिकेंतील आपले राजदूत श्री. बी. के. नेहरू यांच्याकडे आम्हां सर्वांना चहाचें आमंत्रण होतें. आपल्या वकिलातीची इमारत वृक्षच्छाया-शीतल अशा एका शांत ठिकाणीं आहे. बी. के. नेहरू मनमोकळेपणानें बऱ्याच गोष्टी बोलले, पण कांहीं महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधीं विचारलें तेव्हां हॅरिमनप्रमाणेंच हंसत हंसत मोठ्या मुत्सद्देगिरीनें ते म्हणाले, ‘तुम्ही पत्रकार नि नुकतेच भारतांतून आला आहांत; तेव्हां तुम्हीच मला ताज्या ताज्या बातम्या नि मतें सांगा !’



# : ४ : विल्यम्सबर्ग – न्यू ऑर्लियांस

## विल्यम्सबर्ग

विल्यम्सबर्ग ही व्हर्जिनिया राज्याची वसाहतकालीन राजधानी. अमेरिका ही इंग्लंडची वसाहत होती तेव्हां व्हर्जिनियाचा ब्रिटिश गव्हर्नर इथें असे. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत अमेरिका स्वतंत्र झाल्या-नंतरच्या काळांतील सध्यांची व्हर्जिनियाची राजधानी रिचमंड आहे. रिचमंड राजधानी झाल्यानंतर विल्यम्सबर्ग हें एक जुनाट, उपेक्षित गांव झालें. अलिकडल्या काळांत अमेरिकेचे प्रख्यात क्रोडोपति रॉक-फेलर यांनीं लक्षावधि डॉलर्स खर्च करून विल्यम्सबर्गचा पुनरुद्धार केला आहे. अठराव्या शतकांत वसाहतकालीन विल्यम्सबर्ग जसें होतें तसें तें पुन्हां करण्यांत आलें आहे. त्या काळांत होते तसे रस्ते, घरें, इन्स् किंवा खानपानगृहें वगैरे साफसूफ करून जशींच्या तशीं करण्यांत आलीं आहेत. जुन्या काळांतल्या 'रेड लायन् इन्', 'ब्लॅक कॅट इन्' अशांसारख्या दरवाजावरच्या दांडीवर लोंबणाऱ्या सचित्र पाट्या पुन्हां लटकल्या आहेत. कांहीं विशिष्ट वेळ सोडल्यास रस्त्यांतून मोटार नेण्याचीहि बंदी आहे. अठराव्या शतकांतला गव्हर्नरचा वाडा, चर्च, त्याच्या सल्लागार मंडळाच्या किंवा कौन्सिलच्या बैठकीच्या जागा वगैरे जुन्या इमारती आंतल्या टेबलें, खुर्च्या, झुंबर इत्यादि सर्व वस्तूंसह चकचकीत करून ठेवलें आहे; फार काय, विल्यम्सबर्ग पाहायला मुद्दाम येणाऱ्या प्रवाशांना आपण अठराव्या शतकांतच वावरतों आहोंत असें वाटावें म्हणून या जुन्या इमारतींत वावरणाऱ्या नोकरचाकरांना अठराव्या शतकांतले इंग्रज वापरीत त्याच तऱ्हेचे कपडेहि दिलेले आहेत! बंद गळ्याचे डेरेदार झगे दोन हातांनी सांवरीत फिरणाऱ्या मार्गदर्शिका स्त्रिया आणि शेंडीदार पांढऱ्या केंसांचे टोप घालून हिरव्या किंवा लाल मखमलीच्या तंग तुमानींत फिरणारे पुरुष आम्हांला तिथे दिसले!

## स्कायलाइन ड्राइव्ह

सकाळचा उपाहार संपवून साडे-नऊ दहाच्या सुमाराला खास बस-गाडीनें वॉशिंग्टनहून आम्ही विल्यम्सबर्गला जायला निघालों. दीड-दोनशें मैलांचा हा 'स्कायलाईन ड्राइव्ह' ॲपालेशियन रेंजीस् या डोंगररांगांच्या दऱ्याखोऱ्यांतून, घाटरस्त्यावरून व्हावयाचा होता. दुपारचें जेवण 'स्विफ्ट् रन् गॅप्' या डोंगरमाथ्यावरल्या वाटेंतल्या एका हॉटेलांत घेऊन संध्याकाळपर्यंत विल्यम्सबर्ग गांठावयाचें होतें. अमेरिकेचे विस्तीर्ण माळ, जाळीदार तारांच्या चौकडीचीं कित्येक फर्लांग लांब व्यवस्थित कुंपणें असलेलीं गुरें, ढोरें, घोडीं चरावयाचीं कुरणें, टुमदार घरांचीं खेडेवजा गांवें या प्रवासांत पाहावयाला मिळालीं. स्वच्छ उन्हांत न्हाऊन निघणारें निळेशार आकाश, त्यांत संथपणें फिरणारे पांढरे ढग, मैलच्या मैल सरळ धांवणारे निर्जन रस्ते, आजूबाजूच्या कुरणांत आरामांत चरणारी एखादी दुसरी तांबड्या पांढऱ्या ठिपक्यांची गाय किंवा राखी रंगाचें एखादें शिंगरूं पाहत असतां, कालच केनेडींनीं केलेल्या क्यूबा नाकेबंदीच्या घोषणेमुळें रशियाचीं क्यूबाकडे येणारीं जहाजें अमेरिकेच्या आरमाराकडून बुडविलीं जातील, आणि कोणत्याहि क्षणाला जग वेचिराख करून टाकणाऱ्या अणुयुद्धाचा भडका उडेल हें खरेंच वाटेना ! आमचा स्टॅन्डीश मध्येंच एखादें पेट्रोल स्टेशन दिसलें कीं गाडी उभी करून तिथें धांवायचा आणि वॉशिंग्टनला टेलिफोन करून ताजी बातमी विचारायचा. एकदां बातमी मिळाली कीं रशियाचें एक जहाज बंदीरेषेच्या आंत आलें आणि अमेरिकेच्या आरमारानें त्याची झडती घेतली, पण कांहीं झालें नाहीं.

पनवेलला जातांना मोटररस्त्याच्या बाजूला जसे हिरव्या पांढऱ्या कलिंगडांचे मोठमोठे ढीग विकायला ठेवलेले दिसतात, तसेच जर्द पिवळ्या-तांबड्या गोल भोपळ्यांचे ढीग अधूनमधून रस्त्याच्या कडेला

दिसत. एकदां एक मोठी थोरली मालट्रक आमच्या समोरून गेली. तिच्यांत प्लास्टिकच्या पारदर्शक पिशव्यांत भरलेलीं वचक्यांत मावणार नाहींत एवढीं मोठीं तांबूस पिवळ्या रंगाचीं नारिंगें आहेत, असें मला वाटलें. स्टॅन्डीश म्हणाला, प्लास्टिकच्या पिशव्यांत भरलेले ते कांदे आहेत ! एवढा मोठा कांदा असेल याची मला कल्पना नव्हती. इतक्यांत आमच्या ड्रायव्हरनें एकदम वस जागच्या जागीं उभी केली. आजूबाजूला कांहीं अडथळा दिसत नव्हता. रस्ता दूरपर्यंत निर्जनच दिसत होता. मात्र दूर समोर एक नारिंगी रंगाची वस उभी होती. आपली बस एकदम कां थांबवली म्हणून विचारलें, तेव्हां ड्रायव्हर म्हणाला... समोर दिसते ती शाळेंतल्या लहान मुलांची वस आहे म्हणून. शाळकरी मुलांच्या वसगाड्यांना हा ठराविक रंग असतो. समोर एखादी अशी वस उभी दिसली कीं सर्व मोटारवाल्यांनीं आपल्या गाड्या अर्धा मिनिट तरी जागच्या जागीं थांबवल्या पाहिजेत असा कायदा आहे म्हणे. अमेरिकेच्या लांबरुंद हाय-वेवरून मोटारी कमींत कमी ऐंशीं-नव्वद मैलांच्या वेगानें जात असतात. शाळेची बस उभी राहिली, कीं खालीं उतरल्यावर वच्चे लोक कुठें कसे धांवतील त्याचा नेम नसतो. म्हणून हा नियम केला आहे, आणि सर्व लोक तो साक्षेपानें पाळतात असें कळलें.

**कटकटच्या बायकांना खोड्यांत घालीत !**

संध्याकाळीं विल्यम्सबर्गला पोहोंचलों तेव्हां कसलीच वर्दळ नसलेल्या एखाद्या शांत, टुमदार खेड्यांत आल्यासारखें वाटलें. परदेशी पाहुणे किंवा प्रवासी यांना उतरण्यासाठीं प्रशस्त आणि सोयीचें असें इथें असलेलें एकच ठिकाण म्हणजे 'विल्यम्सबर्ग इन्.' स्वच्छ पांढऱ्या रंगाची ही इमारत वाहेरून जुन्या तऱ्हेची वसाहतकालीन वाटत असली तरी आंतून शीतोष्णनियंत्रित खोल्या, रेशमी चादरी, आरामशीर गाद्यागिर्द्या असलेलें अद्ययावत् अमेरिकी हॉटेल आहे. जपानचा सम्राट हिरो-

हिटो, इंग्लंडची राणी इलिझाबेथ वगैरे बडे पाहुणे विल्यम्सबर्ग पाह्यला आले तेव्हां इथेंच उतरले होते हें सांगण्यांत आलें तेव्हां आंत पाऊल टाकतांना आम्ही भलतेच गंभीर चेहेरे केले होते ! आजूबाजूला गॉल्फ खेळण्याचे हिरवे माळ, पोहण्याचे तलाव, फिरण्यासाठीं गर्द झाडीचे रस्ते वगैरे सर्व कांहीं आहे. सकाळचें चहापाणी झाल्यावर खास मार्गदर्शिकेबरोबर विल्यम्सबर्ग पाहायला पायींच बाहेर पडलों. इथल्या छोट्या छोट्या रस्त्यांवरून मोटर न्यायची नसतेच. सकाळीं ९।।–१० ची वेळ होती, पण रस्त्यावर एखादें दुसरेंच माणूस दिसत होतें. गव्हर्नरचा वाडा, चर्च वगैरे इमारती पाहत पाहत एका जुनाट पण साफसूफ ठेवलेल्या लहानश्या इमारतीकडे आलों. ही इमारत अठराव्या शतकांतल्या विल्यम्सबर्गच्या कोतवालाची किंवा अशाच कुणा तरी अधिकाऱ्याची कचेरी होती. इमारतीच्या बाहेरच्या ओट्यासारख्या उघड्या जागेंत उभे, आडवे, मध्यें भोंक असलेले, जमिनींत पुरलेले लांकडी ठोकळे दिसले. त्या काळीं एखाद्या नवऱ्यानें बायकोविरुद्ध, ती बोलून बोलून आपला जीव खाते, अशी तक्रार कोतवालाकडे येऊन केली, तर त्या बाईची मान त्या ' पिलरीं 'त किंवा खोड्यांत अडकवून ठेवली जात असे. जाणारे येणारे टवाळ हें दृश्य पाहत उभे राहात ! ' तुम्हांला काय वाटतं ? ' आमच्या चुटपुटीत मार्गदर्शिकेनें आम्हांला विचारलें, ' त्या काळांतले लोक अगदींच रानटी होते, नाहीं ? '

" छे हो, ' आमच्यापैकीं कांहीं म्हणाले, ' आजच्या काळांतहि अशी कांहीं तरी सोय पाहिजे ! '

दुपारचें जेवण ' विल्यम्सबर्ग इन् ' मध्यें घेऊन बाल्टिमोर फ्रेन्डशिप एअरपोर्टकडे जायला कांहीं वेळानें बसमधून निघालों. तिथून संध्याकाळचें विमान घेऊन एकदम खालीं दक्षिणेकडे मेक्सिकोच्या आखाताला अमेरिकेची अजस्र मिसिसिपी नदी जिथें मिळते त्या न्यू ऑर्लियांसला जायचें होतें.

**टेनेसी विल्यम्सचें न्यू ऑर्लियांस**

न्यू ऑर्लियांस पाहायची आम्हां सर्वांना फार इच्छा होती. अलिकडच्या काळांत गाजलेला अमेरिकेचा प्रख्यात नाटककार टेनेसी विल्यम्स इथलाच. तरुण लघुकथालेखक टुरुमन कपोटे याच गांवांतला. या लेखकांच्या कथानाटकांतलीं अमेरिकेच्या या दक्षिण प्रदेशांतलीं जुनीं घराणीं, त्यांचे वंशाभिमान, तिथल्या केळीं, अननस तरारून पिकणाऱ्या उष्ण हवेंत या स्त्रीपुरुषांच्या जीवनांत उसळणारीं तप्त भावनांचीं वादळें, अशा अनेक गोष्टी न्यू ऑर्लियांसकडे जातांना आम्हांला आठवत होत्या. हें शहर जुन्या काळांत फ्रेंचांनीं वसवलें. ज्या लुइसियाना राज्याची हें राजधानी आहे तें राज्य एकेकाळीं स्पेनच्या वर्चस्वाखाली होतें म्हणतात. नंतर अमेरिकेनें तें घेतलें. त्यामुळें इथें अजूनहि फ्रेंच क्वार्टर, स्पॅनिश क्वार्टर, क्रिओल या मिश्रवंशीयांचा क्रिओल क्वार्टर असे शहराचे कांहीं भाग आहेत. जुन्या नव्या ऑर्लियांसच्या मध्यावरच आमचे शेरॅटन-चार्ल्स हॉटेल होतें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ऑर्लियांसच्या जुन्या वस्तींतून फिरतांना खडखडणाऱ्या जुनाट ट्रामगाड्या, वखारीसारख्या कांहीं इमारती, जाळीदार वेलबुट्टीचे लोखंडी सज्जे असलेलीं जुनाट घरें वगैरे पाहतांना शंभर वर्षांपूर्वीच्या इमारती असलेल्या मुंबईच्या हमाम स्ट्रीट, अपॉलो स्ट्रीट वगैरे कोटांतल्या जुन्या वस्तीची आठवण होत होती. बंदराजवळच्या एका भागांत एक गजबजलेलें मार्केट पाहिलें. तिथें निरनिराळ्या भाजीपाल्याबरोबर उंसाच्या कांड्या आणि अननसहि विकावयाला ठेवलेले दिसले. तांदूळहि हवा तितका मिळतो. जवळच एक मोठी सार्वजनिक बाग होती, आणि पलीकडे पूर्वीच्या स्पॅनिश सरकारची तांबडमातीच्या रंगाची एक भली मोठी जुनाट इमारत होती. तिला कॅबिल्डो म्हणतात. दुपारच्या जेवणापूर्वी पावणेअकरा वाजतां न्यू ऑर्लियांसचे मेयर व्हिक्टर स्किरो यांनीं भेटीला बोलावलें होतें.

## आम्ही सन्मान्य नागरिक झालों !

मोठमोठे प्रशस्त रस्ते आणि इमारती असलेल्या न्यू ऑर्लियांसच्या नव्या भागांत सिटी हॉलची टोलेजंग, भव्य इमारत आहे. पावणेअकराला स्किरोंच्या खोलींत गेलों तेव्हां सर्वांशीं हस्तांदोलन करून कॉफी, कोका कोला वगैरे पेयें सर्वांना द्यावयास त्यांनीं आपल्या नोकराला सांगितलें. आम्हां वीसबावीस जणांत मुंबईच्या 'ऑनलुकर' मासिकाची उपसंपादिका ओल्गा टेलिस् ही एकच मुलगी होती. तिच्याकडे पाहात ठेंगणे, ठुसके, गमत्या स्वभावाचे मेयरसाहेब हंसत हंसत म्हणाले, 'हें काय ?——इतके पुरुष तुम्ही, नि बाई फक्त एकच बरोबर आणलीत ? पुष्कळशा सुंदर भारतीय स्त्रिया बघायला मिळतील असं आम्हांला वाटलं होतं ! ' कांहीं वेळ गप्पागोष्टी झाल्यानंतर एक लहानसा औपचारिक समारंभ झाला. भारताबद्दल आपुलकी व्यक्त करणारें लहानसें भाषण करून मखमली डबींतून दोन छोटया किल्ल्या मेयरसाहेबांनीं आम्हांला दिल्या. आम्हांला न्यू ऑर्लियांसचे सन्मान्य नागरिक करण्यांत आलें. एका किल्लीचा स्वीकार आम्हां सर्वांच्या वतीनें आमच्यांतले सर्वांत वयोवृद्ध असे अलाहाबादच्या 'नॉर्दर्न इंडिया पत्रिके'चे संपादक एच्. सी. रॉय यांनीं केला, आणि दुसरी किल्ली आमच्यांतले सर्वांत तरुण सदस्य मद्रासच्या 'नवमणि' पत्राचे मॅनेजर श्री. आर. नरसिंहन् यांनीं घेतली. उत्तराच्या आपल्या छोटया पण मार्मिक भाषणांत रॉय म्हणाले, 'ही किल्ली मी अलाहाबादच्या मेयरच्या स्वाधीन करीन. या किल्ल्या भारत-अमेरिकेचीं अंतःकरणें एकमेकांना खुलीं करोत ! '

## सॅगरेक् कॉकटेल्

दुपारीं १२ वाजतां इंटरनॅशनल हाऊसमध्यें 'न्यू ऑर्लियांस टाइम्स'चा संपादकवर्ग, इतर पत्रकार, शहराचे प्रसिद्धि अधिकारी वगैरे मंडळींनीं आम्हांला जेवायचें आमंत्रण दिलें होतें. जेवणाआधीं निरनिराळ्या प्रकारचीं मद्यें दिलीं जात होती. स्टॅन्डीशला मी हळूंच

विचारलें, ' कोणतें मद्य घ्यावें ? ' न्यू ऑर्लियांसच्या लोकांत ' सॅगरॅक् ' नांवाचा एक कॉक्टेल्चा खास प्रकार फार प्रिय आहे. तुम्ही सॅगरॅक् मागा म्हणजे खूष होतील ते ! ' स्टॅन्डीश म्हणाला. मद्यें देणाऱ्या धिप्पाड नीग्रो वेटरला सॅगरॅक् पाहिजे म्हटल्यावरोबर त्याचा चेहेरा आपुलकीच्या भावनेनें एकदम खुलला. शेजारीं उभे असलेले न्यू ऑर्लियांसचे एकदोन पत्रकार खूष होऊन उद्‌गारले, ' अरे वा, आमची सॅगरॅक् तुम्हांला माहीत आहे वाटतं ? '

**तुमचा चेहरा पाहिलेला वाटतो**


जेवतां जेवतां गप्पागोष्टींना अगदीं ऊत आला होता. माझ्यासमोर बसलेला एक पोरगेलासा अमेरिकन भारतावरील आक्रमणाच्या मागें चीनचे हेतु काय असावेत म्हणून मला विचारीत होता. दोनतीन कल्पना मी त्याला सांगितल्या. त्याला त्या एकदम पटल्या. न्यू ऑर्लियांसमधल्या टेलिव्हिजन कंपनीचा तो प्रतिनिधि होता. खिशांतून आपल्या पत्त्याचें कार्ड काढून माझ्या हातीं देत तो म्हणाला, ' आमच्या स्टुडिओंत दुपारीं ४ ला याल का ? या विषयावर तुमची तीन मिनिटांची एक मुलाखत मी घेतों. ' स्टुडिओंत ४ वाजतां ही मुलाखत ध्वनिमुद्रित झाली. रात्रीं हॉटेलमधल्या माझ्या खोलींत मी फार उशिरां आलों तेव्हां टेलिव्हिजन सेटवर ती मुलाखत मला पाहतां आली नाहीं; पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं लिफ्टमधून खालीं येत होतों तेव्हां लिफ्टमध्यें माझ्या शेजारीं उभी असलेली आमच्या हॉटेलांतली एक म्हातारी बाई माझ्या चेहऱ्याकडे निरखून पाहत म्हणाली, ' तुला पाह्यलंय् मी कुठंतरी — हां, काल रात्रीं टेलिव्हिजनवर चीन-भारतासंबंधीं तूंच बोलत होतास, नाहीं का ? '

**टुलेन युनिव्हर्सिटी आणि मिसिसिपी नदी**

न्यू ऑर्लियांसची प्रख्यात टुलेन युनिव्हर्सिटी पाहावयाला अगदीं सकाळींच जावयाचें होतें. युनिव्हर्सिटीच्या अध्यक्षांबरोबरच आमची सकाळची न्याहारी व्हावयाची होती. नंतर इतस्ततः पसरलेल्या चोपन्न इमार-

तीचा ऐसपैस युनिव्हर्सिटी कॅम्पस् पाहावयाचा होता. युनिव्हर्सिटीच्या निरनिराळ्या खात्यांच्या भव्य इमारती, युनिव्हर्सिटी कॉलेजची जुनी इमारत, विवाहित विद्यार्थ्यांसाठीं बांधलेलें आठ मजली भव्य वसतिगृह, थंडीच्या दिवसांत गरम पाण्याची व्यवस्था असलेल्या विद्यार्थ्यांच्या पोहण्याच्या तलावाची अद्यावत् वास्तु, खेळाचा अवाढव्य स्टेडियम्, विद्यार्थ्यांचें नाटयगृह वगैरे पाहतां पाहतां दुपार झाली. परत येतांना मिसिसिपीवरला तेवीस मैल लांबीचा एक पूल दूर दिसत होता. त्याचें पलीकडलें टोंक दिसणें शक्यच नव्हतें. जगांतला हा एक अत्यंत लांब पूल समजला जातो. न्यू ऑर्लियांस सोडतांना विमानांतून त्याचें चांगलें दर्शन झालें. 'लेक् फॉन्ते' नांवाच्या विस्तीर्ण सरोवराच्या कांठीं आणि आजूबाजूला न्यू ऑर्लियांसच्या नव्या वस्तीची खूप वाढ झाली आहे. इथले सुंदर प्रशस्त रस्ते, हिरवींगार मैदानें, टुमदार छोटीं छोटीं घरें, फुलाफळांच्या झाडांनीं भरलेल्या प्रशस्त बागा पाहतांना हें वेगळेंच न्यू ऑर्लियांस वाटतें. संध्याकाळीं न्यू ऑर्लियांस बंदराच्या पोर्ट कमिशनरांनीं 'गुड नेबर' या खास बोटींतून आम्हांला मिसिसिपी नदीवर फिरवून सारें बंदर दाखविलें. न्यू ऑर्लियांसहून आम्ही भरपूर सूर्यप्रकाश, वैराण वाळवंटें आणि अवाढव्य निवडुंग असलेल्या ॲरिझोना राज्यांत जाणार होतों.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.



# : ५ : ॲरिझोना – ग्रॅन्ड कॅन्यन

## ॲरिझोनांत सहारा ?

ॲरिझोनाची राजधानी फिनिक्स येथील भव्य विमानगृहांत येऊन पोहोंचलों तेव्हां तिथल्या उंचच उंच भिंतीवर खरोखरच लालपिवळ्या रंगाचें आपल्याच चितेच्या ज्वालांतून पुन्हां जन्म घेणाऱ्या फिनिक्स पक्ष्याचें प्रचंड चित्र चितारलेलें दिसलें ! फिनिक्समधल्या ' वेस्टवड हो ' हॉटेलमध्यें उतरावयाचें ठरलें होतें; पण आयत्या वेळीं अमेरिकेंत ' मोटेल ' हा जो एक हॉटेलांचा प्रकार आहे त्याचा अनुभव देण्याकरितां म्हणून ' कॅराव्हन् इन् ' या फिनिक्समधल्या प्रख्यात मोटेलमध्यें आमची व्यवस्था करण्यांत आली. मोटर आणि हॉटेल हे दोन शब्द मिळून ' मोटेल ' हा नवा शब्द अमेरिकनांनीं तयार केला आहे. मोठ्या हायवे-वरून प्रवास करतांना वाटेंत आपली मोटार ठेवण्याची आणि राहण्या-खाण्याचीहि जिथें सोय असते तें ' मोटेल '. मोटेलमध्यें हॉटेलसारख्या सर्व अद्यावत् सोयी असतातच, पण मोटेलची इमारत हॉटेलसारखी पंचवीस-तीस मजल्यांची, हजारो खोल्यांची अशी टोलेजंग नसते. वीस-पंचवीस खोल्यांच्या एकदोन मजली छोट्या छोट्या टुमदार इमारती खूपशा मोकळ्या जागेंत असतात. आमच्या कॅराव्हान् इन्च्या दाराशीं भल्या मोठ्या उंच खांबावर प्रचंड उंटावर बसलेल्या अरब शेखाचें चित्र होतें. प्रवेशद्वाराच्या दोन बाजूला दोन उभटगोल प्रचंड पात्रें होतीं, आणि त्यांच्यांतून ज्वाला उफाळत असत. पलीकडल्या रेस्टोरांचें नांव ' सहारा ' होतें. ॲरिझोना हा भरपूर सूर्यप्रकाश, अजस्र खडकाळ डोंगर, अफाट वाळवंटें आणि अचाट निवडुंग यांचा प्रदेश असल्यामुळें ' कॅराव्हान् इन् 'च्या चालकांनीं प्रवाशाला आपण पूर्वेकडल्या अरब देशांतून किंवा सहारा वाळवंटांतून फिरत नाहीं ना, असा कांहीं अद्-भुतरम्य भास निर्माण करण्याची व्यवस्था केली होती !

## हा कसला फुटबॉल ?

रात्रीं जेवणानंतर ॲरिझोना आणि टेक्सस या दोन राज्यांतल्या विद्यापीठांची फूटबॉल मॅच् पाहायला जायचें होतें. खास विमानानें टेक्ससचा फूटबॉल संघ ॲरिझोनाला आला होता. त्यांच्याबरोबर जवळ-जवळ शंभर विद्यार्थी-विद्यार्थिनी आल्या होत्या म्हणे. पंचवीस तीस विद्यार्थ्यांचा बँड वाजविणारा ताफा, पंचवीस तीस नाचणाऱ्या विद्यार्थिनी, प्राध्यापक, क्रीडाशाखेचे अधिकारी असे शंभरावर लोक होते. फिनिक्सचा फूटबॉल स्टेडियम् शहरापासून दूर डोंगरांच्यामध्यें खोदून केल्यासारखा वाटतो. विजेच्या दिव्यांच्या झगझगाटांत ४०-५० हजार प्रेक्षकांनीं तो फुलून गेला होता. हा अमेरिकन फूटबॉलचा खेळ कांहीं वेगळाच आहे. पायाखेरीज सर्व शरीरानें हा खेळ खेळतात असें दिसतें ! शिरस्त्राण, चिलखत अंगावर चढविलेल्या योद्ध्यासारखे खेळाडू सजलेले असतात.

मध्यें चेंडू ठेवून दोन्ही बाजूंचे खेळाडू खालीं वांकून एकमेकांना टक्कर देण्याच्या पवित्र्यांत उभे राहतात. आणि पंचांची शिटी वाजली कीं अक्षरशः एकमेकांवर तुटून पडतात. ज्याच्या हातांत चेंडू येईल तो चेंडू पोटाशीं धरून पुढें धांवत असतो. विरुद्ध पक्षाचे खेळाडू त्याच्यावर तुटून पडून एकच झुंबड होते. चिलखत-शिरस्त्राणाची आवश्यकता असतेच. कुणाचें डोकें फुटतें, कुणाचा पाय दुखावतो, कुणी बेशुद्ध पडतो. क्रीडांगणावर डॉक्टर तयार असतातच. क्रीडांगणांवर एक मोठें घड्याळ असतें. त्याचा कांटा गरगर चालू असतो. तो थांबला कीं दहाबारा दहा-बारा मिनिटांनीं खेळ थांबतो. या मध्यंतरांत तिकडे त्या विद्यापीठाचा आणि इकडे या विद्यापीठाचा बँड जोरजोरानें वाजूं लागतो. तंग कपडे घातलेल्या नाचणाऱ्या विद्यार्थिनी नारिंगी-पिवळ्या रंगाच्या फितींचे गुच्छ हातांत घेऊन कवायतींतल्या सारख्या तंगड्या उडवून आणि हात फिरवून प्रेक्षकांची आणि खेळाडूंची करमणूक करतात. त्याशिवाय

मुंबई-पुण्यांतल्याप्रमाणेंच कांहीं वात्रट विद्यार्थी मुखवटे लावून किंवा विदूषकाचे कपडे घालून ओरडाआरडा करीत इकडे तिकडे फिरत हैदोस घालीत असतातच. उत्तम खेळाडूला बक्षीस देण्याचा एक समारंभ मध्यंतरांत झाला. युनिव्हर्सिटीच्या प्रेसिडेन्टनें भाषण केलें. खेळाडूच्या आई-वडिलांनाहि तिथें बोलावण्यांत आलें. बक्षिसांत थोडा मिस्किलपणा होता. खेळाडूला एक उत्तम ब्लँकेट बक्षीस देण्यांत आलें !

**एक एक निवडुंग झाडाएवढा !**

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ॲरिझोना राज्यांत ठिकठिकाणीं होणारे लहानमोठे कॅक्टस् (निवडुंग), वाळवंटी किंवा ओसाडी वनस्पती, फुलें इत्यादींचें जगांतलें मोठ्यांतलें मोठें संग्रहालय म्हणून प्रसिद्ध असलेली 'पॅपगो पार्क' मधली 'डेझर्ट बोटॅनिकल गार्डन' पाहावयाला गेलों. टांचण्या टोंचून ठेवण्याच्या इवल्याशा गादीसारख्या दिसणाऱ्या 'पिन-कुशन' निवडुंगापासून तों बारा पंधरा फूट उंच आणि कवेंत मावणार नाहीं एवढ्या घेरांच्या राक्षसी 'साग्वारो' निवडुंगापर्यंत अनेक जातींचे आणि अनेक आकारांचे निवडुंग इथें पाहायला मिळतात. अंगावर कांटे आलेल्या प्रचंड भोपळ्यासारखे कांहीं होते, तर कांहीं केस पिंजारून स्तब्ध उभ्या राहिलेल्या हिरव्या अस्वलासारखे दिसत होते. ओसाडींत होणारे हे निवडुंग व इतर वनस्पति थोडा पाऊस पडतो तेव्हां पाणी पोटांत सांठवून ठेवतात म्हणे, आणि वर्षभर तें स्वत:ला पुरवतात. ओसाडींतल्या या निवडुंगांपैकीं कांहींना तांबड्या रंगांचीं माणसाच्या बोटासारखीं, तर कांहींना पांढऱ्या, पिवळ्या, जांभळ्या गवताच्या तुऱ्यासारखीं मन मोहून टाकणारीं सुंदर फुलें होतीं. ही प्रचंड बाग आणि हें संग्रहालय सरकारी नसून ॲरिझोना नागरिकांच्या खासगी वर्गणी गोळा करून चालविलेल्या संस्थेचें आहे हें ऐकून आश्चर्य वाटलें.

**रेड इंडियनांची शाळा**

ही बाग बघून परत येतांना वाटेंत एक मोठी थोरली पांढऱ्या रंगाची



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

शाळेची इमारत आणि प्रशस्त आवार दिसलें. कांहीं मुलें आवारांत खेळत होतीं; कांहीं हातांत हात धरून शिस्तीनें आंत जात होतीं. शर्ट-पॅन्ट किंवा फ्रॉक अंगावर असले तरी सिक्कीम, भूतान किंवा नेपाळ-सारख्या आमच्याकडल्या पहाडी मुलुखांतल्या मुलांइतकींच तांबूस काळ्या रंगाचीं, बसक्या चेहेऱ्यांचीं आणि बारीक डोळ्यांचीं हीं मुलें होतीं. ॲरिझोनांत रेड इंडियनांच्या पुष्कळ वसाहती आहेत. ही शाळा रेड इंडियन मुलांमुलींची होती.

दुपारीं फिनिक्समधल्या रेसकोर्सवर घोड्यांच्या शर्यती पाहण्याचें आम्हाला आमंत्रण होतें. मला वाटतें, हौशी घोडेस्वारांच्या या शर्यती होत्या. चिमुकलासाच रेसकोर्स होता, आणि शर्यतीचें अंतरहि छोटेसेंच होतें. आमच्यापैकीं मुंबईच्या 'ऑनलुकर' मधली ओल्गा टेलीस हिच्या हस्तें जिकणारांना 'कप' देण्यांत आले. तिच्या भारतीय साडीनें रेस-कोर्सवरल्या प्रेक्षकांचें लक्ष वेधून घेतलें होतें.

**ॲरिझोनांत भारतीय राजकारण !**

ॲरिझोनांतल्या 'फिनिक्स रिपब्लिक ॲन्ड गॅझेट' या बड्या वृत्त-पत्रानें आम्हांला मोठी थाटाची मेजवानी दिली. त्या मेजवानीची हकीकत प्रश्नोत्तररूपानें मीं लिहिली होती ती अशी :

**प्र.** : भारतीय राजकारणाची चर्चा तिथल्या पत्रकारांनीं तुमच्याशीं कधीं केली का ?

**उ.** : एकाच चर्चेची हकीकत सांगतों म्हणजे तुमच्या लक्षांत येईल. ॲरिझोना राज्याचें मुख्य शहर फिनिक्स येथें आम्ही होतों. तिथल्या 'रिपब्लिक ॲन्ड गॅझेट' या बड्या पत्रानें आम्हांला मोठी मेजवानी दिली. जेवणानंतर अनौपचारिक चर्चा सुरू झाली. त्या पत्राच्या त्या दिवसाच्याच सकाळच्या अंकांत मोर्‌र नांवाच्या प्रख्यात स्तंभलेखकानें नेहरूंच्या परराष्ट्रीय धोरणावर टीका करून 'नेहरूंना चीननें जीवनाचीं कांहीं प्राथमिक सत्यें शिकविलीं ! ' असा टोला मारला होता. टीका

अगदींच उथळ होती. त्यासंबंधीं बोलणें चाललें असतां पत्राचे मुख्य संपादक मि. मरे एकदम म्हणाले, 'तें सर्व राहूं द्या. मला एक गोष्ट तुमच्यापैकीं कुणीहि समजावून सांगा, कीं आतां तुमचे नेहरू आपलें अलिप्ततावादी परराष्ट्रीय धोरण आपल्या लोकांना कसें काय पटवून देतील ? '

**प्र.** : मग तुम्हीं काय उत्तर दिलें ?

**उ.** : आमच्या वतीनें 'लोकसत्ते'चे महाजनी यांनीं, आमच्यासारख्या आर्थिकदृष्टचा मागासलेल्या देशाला स्वत:च्या विकासावर सर्व लक्ष केंद्रित करणें कसें आवश्यक आहे, त्यामुळें पश्चिमी राष्ट्रें विरुद्ध रशियादि कम्युनिस्ट राष्ट्रें यांच्या शीतयुद्धांत भाग घेणें कसें शक्य नाहीं आणि योग्यहि नाहीं वगैरे वगैरे गोष्टी फार व्यवस्थितपणें सांगितल्या. त्यानंतर दिल्लीच्या 'युनायटेड प्रेस'चे मि. आल्फ्रेड यांनींहि आमच्या परराष्ट्रीय धोरणाचीं कांहीं पथ्यें त्यांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला.

**तुमचा आयसोलेशनिझम्, आमची नॉन-अलाइनमेन्ट**

**प्र.** : मग पटलें का त्यांना ?

**उ.** : अं हं ! मरे गंभीर चेहरा करून नाकाचा शेंडा मुरडीत उद्गारले, 'आपलें कांहीं समाधान झालें नाहीं, बुवा ! ' मग मी उठून म्हणालों, 'मी तुमचें समाधान करण्याचा प्रयत्न करूं का ? '

'हो हो,' ते म्हणाले.

'हें पहा,' मी म्हणालों, 'माफ करा मला, पण तुमच्या अमेरिकन इतिहासाची मला तुम्हांला थोडीशी आठवण करून द्यावी लागेल, म्हणजे सगळें कांहीं तुमच्या लक्षांत येईल. १९१४-१८ च्या पहिल्या महायुद्धांत काय किंवा १९३९–४५ च्या दुसऱ्या काय, तुम्ही बहुसंख्यांक अमेरिकन लोक युद्धांत भाग घ्यायला अतिशय नाखूष होतां. जुन्या, जरठ युरोपखंडाच्या भानगडीशीं आमच्यासारख्या नवोदित,

स्वतःच्या कर्तृत्वाच्या जोरावर भरभराटलेल्या अमेरिका खंडांतल्या लोकांना करायचंय् काय, त्यांच्या भानगडी त्यांना मिटवूं द्या अशा प्रकारचें तुमचें धोरण होतें. इंग्लंड आणि फ्रान्स लोकशाहीवादी राष्ट्रें होतीं म्हणून त्यांच्या बाजूनें कैसर किंवा हिटलरविरुद्ध एकदम धांवून जावें, असें तुम्हांला वाटत नव्हतें. तुमच्या या धोरणाला आयसोलेशनिझम् म्हणत. पहिल्या महायुद्धाच्या वेळचे तुमचे दूरदर्शी आणि ध्येयवादी अध्यक्ष विल्सन किंवा दुसऱ्याच्या वेळचे रूझवेल्ट या दोघांनाहि 'आयसोलेशनिझम्' योग्य नाहीं, जगापासून आपणाला फटकून राहतां येणार नाहीं हें तुम्हां लोकांना पटवून देण्याकरितां महत्प्रयास करावे लागले आणि स्वतःचें अर्धेंअधिक रक्त आटवावें लागलें, तेव्हां कुठें युरोपच्या मदतीला धांवायला आणि युद्धांत भाग घ्यायला तुम्ही तयार झालां. दोन्ही युद्धें जिंकायला आणि कैसर-हिटलरांचा पराजय करावयाला तुम्ही खूपच साहाय्य केलेंत याबद्दल सर्व जग तुमचें ऋण मान्य करतें. पण तुम्ही 'आयसोलेशनिस्ट' होतां हें विसरूं नका. आतां तुम्ही मला सांगा, कीं तुमच्यासारख्या अत्यंत श्रीमंत, बलाढ्य राष्ट्रालाहि कशाला इतरांच्या उठाठेवीत पडा असें वाटत होतें, मग ज्यांना नुकतेंच स्वातंत्र्य मिळालेंय आणि स्वतःचा विकास करायला ज्यांनीं सुरुवात केली आहे त्यांना दोन बलाढ्य गटांच्या रस्सीखेंची-पासून शक्य तों अलिप्त राहावसें वाटलें तर त्यांत आश्चर्य वाटण्या-सारखें किंवा न समजण्यासारखें कांहीं आहे का ? तुमच्या विल्सनपेक्षां किंवा रूझव्हेल्टपेक्षां पंडित जवाहरलाल नेहरू स्वतःच्या लोकांत दसपट तरी अधिक लोकप्रिय आहेत. तेव्हां विल्सन किंवा रूझवेल्ट जर अमेरिकन जनतेला शेवटीं आपलें म्हणणें पटवून देऊं शकले तर नेहरू आपलें धोरण आपल्या लोकांना खात्रीनें पटवून देऊं शकतील ! मला वाटतें 'आयसोलेशनिझम' पेक्षां 'नॉनअलाइनमेंट' हा शब्द चांगला आहे नि धोरणहि चांगलें आहे ! '

प्र : मग ?

उ. : मग काय ? सर्वजण हसले. कांहीं वेळ सर्वजण स्तब्ध होते. नंतर दुसऱ्या विषयाकडे चर्चेचा ओघ वळला.

**पत्रकारांसाठीं मळा**

' रिपब्लिक अँड गॅझेट 'चा फिनिक्सशहराजवळ एक पस्तीस एकरांचा मोठा थोरला मळा किंवा ' रँच ' आहे. रँचवर फुलाफळांच्या बागा, आरामगृहें, पोहोण्याचा तलाव, खेळांचीं उद्यानें सर्व कांहीं आहे. ' रिपब्लिक अँड गॅझेट ' मध्यें काम करणारांना बायकामुलांना घेऊन सुट्टीच्या दिवसांत इथें राहतां येतें. पत्रकारांसाठीं मालकांनीं केलेली ही सोय पाहून आम्ही भारतीय पत्रकार एकमेकांच्या तोंडाकडे डोळे विस्फारून पाहूं लागलों. या रँचवरल्या बागेंत फिरतांना एके ठिकाणीं मोसंब्याच्या झाडांना हिरव्या-पिवळ्या फळांचा बहर आलेला दिसला.

**ग्रॅन्ड कॅन्यन खरोखरच ग्रॅन्ड !**

फिनिक्सहून आम्ही फ्लॅगस्टाफ् या गांवीं विमानानें गेलों. तिथें रात्रीचें जेवण करून आम्ही बसनें ' ग्रॅन्ड कॅन्यन् ' ला निघालों. जंगलां-तल्या रस्त्यावरून दोन तीन तासांचा हा प्रवास होता. बसच्या दिव्यांच्या उजेडांत अधूनमधून ' डियरपाथ ' – हरिणमार्ग – अशा पाट्या दिसत. हरणांचे किंवा सांबरांचे कळप इथून केव्हां केव्हां जात असावेत तेव्हां बस काळजीपूर्वक चालविण्याकरितां या सूचना असाव्यात. ' ग्रॅन्ड कॅन्यन ' मधल्या ' एल् तोव्हार हॉटेलां 'त पोहोंचलों तेव्हां मिट्ट काळोख होता आणि रात्रीचे अकरा साडेअकरा वाजले होते. जगांतलीं दोन नैसर्गिक आश्चर्यें अमेरिकेंत आहेत. त्यापैकीं एक नायगारा हा अजस्र धबधबा, आणि दुसरें ' ग्रॅन्ड कॅन्यन् '. ग्रॅन्ड कॅन्यन म्हणजे ॲरिझोना या एका राज्यांतून उटा या दुसऱ्या राज्यापर्यंत दीडदोनशें मैल पसरलेल्या दऱ्याखोऱ्यांनीं भरलेल्या डोंगरांच्या रांगा नव्हेत; लालपिवळसर काळ्या रंगाच्या खडकांचें दीडदोनशें मैल पसरलेलें विस्तीर्ण पठार

कोटचवधि वर्षांपूर्वी कोलोरॅडो नदीच्या प्रचंड प्रवाहानें आणि इतर नैसर्गिक घडामोडींनीं मोडलें, तोडलें, खोदलें गेलें, आणि मैल मैल खोल आणि कित्येक मैल लांबरुंद अशा दऱ्या आणि खडकांचे डोंगर निर्माण झाले. एखाद्या कडचावर उभें राहून पलीकडे पाहिलें कीं क्षितिजा-पर्यंत पसरलेल्या केव्हां निळसर तर केव्हां लालपिवळसर प्रकाशानें भरलेल्या या अजस्र दऱ्या, आणि खडक कापून निसर्गानें उभीं केलेलीं हीं डोंगराएवढीं लालपिवळसर अजस्र गोपुरें नजरेच्या आवाक्यांत मावतच नाहींत. तो रंगीबेरंगी अफाटपणा आणि ती खडकाळ भव्यता अक्षरश: 'आ' वासून पाहात राहावीशी वाटते. दुर्बिणीनें पाहिलें तर दरीच्या तळाशीं एखाद्या रेड इंडियन खेडचांतल्या कांहीं झोंपडीवजा घरांची रूपरेषा आणि हिरव्या झाडांचे कांहीं पुंजके दिसतात. दुसऱ्या एखाद्या दरीच्या तळांतून वळणें घेत जाणारा कोलोरॅडो नदीच्या पाण्याचा अजस्र प्रवाह पांचसहा फूट रुंदीच्या पट्टचाएवढा दिसतो! गोपुरें असें मी मुद्दामच म्हणालों; कारण अमेरिकी भूस्तरशास्त्रज्ञांनीं या पर्वत-प्राय लालसर पिवळचा खडकांच्या पसाऱ्यांतल्या एकाला 'ब्रह्म टेंपल', एकाला 'विष्णु टेंपल', एकाला 'शिव टेंपल', एकाला 'बुद्ध टेंपल', एकाला 'कॉन्फ्युशियस टेंपल' तर दुसऱ्या एकाला 'झरतुष्ट्र टेंपल' अशींच नांवें दिलीं आहेत! अमेरिकन भूगोलांतलीं हीं अधिकृतरीत्या दिलेलीं भारतीय नांवें पाहून आम्ही आश्चर्यचकित झालों. कडचाच्या कांठावरून ग्रँड कॅन्यन पाहण्याकरितां कांहीं ठिकाणीं दुर्बिणी लावून ठेवल्या आहेत. तिथें ब्रह्म टेंपल कुठून पाहावयाचें, शिव टेंपल कुठून वगैरे वगैरे माहिती दिली आहे.

**दहा पावलें चाला आणि वळून पाहा!**

रात्रीच्या काळोखांत एल् तोव्हार हॉटेलांत आलों तेव्हां माझ्या खोलींत माझें सामान आणून ठेवणाऱ्या हॉटेलच्या म्हाताऱ्या पोर्टरला मी सहज विचारलें, 'काय रे, इथून ग्रॅन्ड कॅन्यन कितीसा दूर आहे?'

म्हातारा मोठा गमत्या होता. गंभीर चेहेरा करून तो म्हणाला, 'हें पहा साहेब, सकाळीं उठल्याबरोबर तुमची न्याहारी झाली कीं, हॉटेलच्या दारांतल्या पायऱ्या उतरा, डाव्या बाजूला वळा आणि दहा पावलेंच चाला, कीं ग्रॅन्ड कॅन्यन तुमच्या डोळ्यासमोर पसरलेला दिसेल!' खरोखरच सकाळीं उठल्याबरोबर कपडे करून खालीं आलों तों ग्रॅन्ड कॅन्यनच्या एका कडचाला लागूनच आमचें हॉटेल असल्याचें दिसून आलें. हॉटेलच्या वृक्षवेलींनीं भरलेल्या आवाराच्या कांठाशीं गेलें कीं इकडे तिकडे चोहींकडे ग्रॅन्ड कॅन्यनच पसरलेला होता.

हॉटेलच्या आवारांत समोरच उंचच उंच लालपिवळ्या दगडी भिंतींचें किल्ल्याच्या कोटासारखें किंवा गढीसारखें कांहीं तरी होतें. रेड इंडियनांच्या अनेक जमाती आहेत. त्यांपैकीं होपी इंडियनांचे हें 'होपी हाऊस' होतें. या गढीवजा ओबडधोबड घरांत रेड इंडियनांनीं विणलेल्या शाली, कापडें, मण्यांचे कमरपट्टे वगैरे वस्तू विकायला ठेवलेल्या होत्या. रोज संध्याकाळीं पांचच्या सुमाराला होपी इंडियन पुरुष आणि स्त्रिया हॉटेलसमोरच्या एका ओटचावर रंगीबेरंगी पिसांच्या टोप्या घालून आणि हातविणीचीं रंगीबेरंगी कापडें कमरेला गुंडाळून मोठमोठचा ढोलांच्या तालावर आपल्या भाषेंतल्या गाण्यांची ओरडाआरड करीत नाच करून दाखवतात. नंतर टोपी फिरवतात. तिच्यांत खुषी असेल त्यानें कांहीं सेंट टाकावे. ग्रॅन्ड कॅन्यनहून आम्ही एकदम पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्यावर असलेल्या सॅनफ्रॅन्सिस्कोला जायला निघालों.



# : ६ : सॅन्‌फ्रॅन्सिस्को – बर्क्‌ले

## फ्रिस्कोचा क्रूकेड स्ट्रीट !

सॅन्‌फ्रॅन्सिस्कोच्या विमानतळावर उतरलों तेव्हां संध्याकाळ होऊन चांगलाच काळोख झाला होता. ' सर फ्रॅन्सिस ड्रेक ' या एकवीस मजली भव्य हॉटेलांत आमची उतरायची सोय केलेली होती. रुंद, लांबलचक हाय-वेवरून आमची बस जाऊं लागली, तेव्हां फार मजेदार दृश्य दृष्टीला पडलें; अमेरिकेच्या हाय-वेवरून जाणाऱ्या मोटारींच्या सात-आठ रांगा आणि येणाऱ्या मोटारींच्या सातआठ रांगा असतात. नजर पोहोंचत नव्हती इतक्या लांबून तों डोळ्यासमोरपर्यंत समोरून संथपणें येणाऱ्या मोटारींच्या लख्ख पेटलेल्या पुढल्या दिव्यांच्या तरंगणाऱ्या माळाच्या माळा काळोखांत दिसत होत्या. इतक्या मोटारीचे इतके दिवे आम्ही एकदम कधींच पाहिलेले नव्हते. फुलें, फळें आणि हॉलीवुडच्या चित्रपटतारका यांनीं समृद्ध म्हणून प्रसिद्ध असलेल्या अमेरिकेच्या कॅलिफोर्निया या राज्याची सॅनफ्रॅन्सिस्को ही राजधानी. फ्रिस्को या छोट्या, लाडिक नांवानें अमेरिकन या शहराला ओळखतात. पांचसहाशें मैलांवर जगद्विख्यात हॉलिवुड जिथें आहे तें लॉस एंजिलीस शहर आहे. पंचेचाळीस चौरस मैल पसरलेलें हें फ्रिस्को चाळीस टेकड्यांवर वसलेलें आहे म्हणतात. त्यामुळें इथल्या कांहीं रस्त्यांची चढण इतकी उभी आहे कीं या रस्त्यांवरून टॅक्सींतून किंवा बसमधून खालीं येतांना आमच्यासारख्या नवख्या माणसांना खरोखरच भीति वाटत होती. एका रस्त्याचें नांव तर ' क्रूकेड स्ट्रीट ' असेंच आहे !

### गोल्डन गेट आणि अल्काट्राझ

एके दिवशीं सकाळीं शहर पाह्यला बाहेर पडलों असतां टेलेग्राफ हिल या सर्वांत उंच विभागांत आम्ही गेलों. तिथून फ्रिस्कोचा देखावा छान दिसतो. एका बाजूला पॅसिफिक महासागराचें क्षितिजापर्यंत पसरलेलें

उन्हांत चमचमणारें निळसर पाणी दिसत होतें, तर दुसऱ्या बाजूला फ्रिस्कोंतल्या कांहीं गगनचुंबी इमारती आणि टुमदार पांढऱ्या घरांचे पुंजके दिसत होते. फ्रिस्कोच्या रस्त्यांतून फिरत असतां एका प्रशस्त चौकांत एक भव्य दगडी इमारत पाहिली. सॅन्फ्रॅन्सिस्कोचें हें ऑपेरा हाऊस. याच इमारतींत १९४५ सालीं जगांतल्या सर्व राष्ट्रांची संघटना 'यूनो' किंवा युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन जन्माला आली. समुद्र-कांठीं 'सीलरॉक्' या ठिकाणीं 'क्लिफ् हाऊस' या दुकानाच्या गॅलरींतून पॅसिफिक महासागराचें दृश्य छान दिसतें. क्लिफ् हाऊसवरून आम्ही फ्रिस्कोचा प्रख्यात गोल्डन गेट हा पूल पाह्यला गेलों. झुलत्या तारांवर आधारलेला हा भव्य पूल आहे. मोठमोठ्या आगबोटी याच्याखालून सहज जाऊं शकतात. या पुलावरून पलीकडल्या सोसोलिटा या चित्रकार, शिल्पकार वगैरे कलावंत राहतात त्या उपनगरांत जात असतां पलीकडे पांढऱ्या, भुरकट इमारतींचा पुंजका असलेलें एक बेट दिसत होतें. अमेरिकेच्या भयंकर कैद्यांना जिथें ठेवण्यांत येतें तेंच हें आमच्या अंदमानासारखें अल्कात्राझ् बेट.

शें-सव्वाशें एकर पसरलेलें फ्रिस्कोचें प्रख्यात 'गोल्डन गेट पार्क' हें हिरवेंगार उपवन पाहत असतां त्याचा मजेदार इतिहास आमच्या ज़ॉन स्टॅन्डीशनें सांगितला. ही सर्व रेताड जमीन होती म्हणे. एक स्कॉटिश गृहस्थ १८८८ सालीं इथें येऊन स्थायिक झाला. त्याच्या एकट्याच्या चिकाटीनें आणि परिश्रमांनीं उष्ण कटिबंधांतलींहि फुलें ज्यिथल्या खास जाळीदार पुष्पगृहांत पाह्यला मिळतात असें हें प्रचंड उपवन तयार झालें. स्थानिक अधिकाऱ्यांच्या, नगरपालिकेच्या खनपटीला बसून त्या स्कॉचमननें रेताड जमिनीचें सुंदर उपवनांत रूपांतर करवून घेतलें. फ्रिस्कोचे नागरिक अजूनहि त्याचें नांव आदरानें घेतात. या उपवनाच्या एका भागांत वृक्षलतांच्या दाटीवाटींत 'जपानीज टी गार्डन' नांवाचें जपान्यांचें एक चहापानगृह आहे. जपानी बागेचें वैशिष्ट्य

म्हणजे तिच्यांत कृत्रिम आंखीवपणा नसतो. इकडे तिकडे खडक पसरलेले, त्यांच्यावर एखादा चिमुकला लांकडी पूल, त्याच्याखालून झुळुझुळु वाहणारा ओढा हें सर्व कृत्रिम असलें तरी स्वाभाविक दिसेल असें केलेलें असतें.

या वागेंत बसून आपल्या रंगीबेरंगी किमोनोंत तुरुतुरु चालणाऱ्या हंसतमुख जपानी मुलींनीं दिलेला जपानी चहा आम्हीं घेतला. इथल्या एका दालनांत मुलांचीं खेळणीं, कांचेच्या नाजुक कपबश्या, फुलदाण्या वगैरे वगैरे सुंदर सुंदर जपानी वस्तु विकायला ठेवलेल्या होत्या. कॅलिफोर्नियांत, विशेषतः सॅन्फ्रॅन्सिस्कोंत चिनी, जपानी, फिलीपिनो वगैरे पॅसिफिक महासागरालगतच्या देशांतले कितीतरी आशियाई लोक येऊन स्थायिक झाले आहेत. फ्रिस्कोमध्यें एक ' चायना टाऊन ' नांवाचा विभागच आहे. तिथलीं घरें, दुकानें वगैरे नमुनेदार चिनी पद्धतीचीं आहेत. एका रात्रीं आम्ही या चायना टाऊनमधल्या दुकानांतच चिनी जेवण घेतलें.

**फ्रिस्कोंतला न्हावी**

सॅन्फ्रॅन्सिस्कोंत चिनी, जपानी, फिलिपिनो पुष्कळच आहेत. या सर्वांचेच डोळे वारीक आणि चेहेरे बसकट असल्यामुळें कोण चिनी आणि कोण फिलीपिनो तें आमच्यासारख्याला कांहींच कळत नाहीं. एकदां चांगलीच गंमत झाली.

सॅन्फ्रॅन्सिस्कोंत एक दिवशीं दुपारीं भटकत असतां पु. ल. देशपांडे आणि मी दोघांनाहि आपले केंस फार वाढलेत; कुठें तरी कापून घेतले पाहिजेत, याची एकदम आठवण झाली. केंस कापायला दोन डॉलर्स म्हणजे जवळ जवळ दहा रुपये आणि अर्धा डॉलर टिप म्हणजे साडेवारा रुपयांत चांगली हजामत होणार याचीहि आठवण झाली ! देशपांडे गंमतीनें म्हणाले, ' तुमची मी नि माझी तुम्ही जर करूं शकलों असतों तर घसघशीत पंचवीस रुपये आपण आज वांचवले असते ! '

समोरच पहिल्या मजल्यावर एक 'बार्बर्स शॉप' दिसलें. वर चढून गेलों तों पुष्कळशा तरुण बाया कुणी केंस कुरळे करून घेताहेत, कुणी टोपलीसारखें कांहीं तरी डोक्यावर धरून केंसांना वेडेवांकडे आकार देत बसल्याहेत अशीं दृश्यें दिसलीं. सुदैवानें पुरुषांचे केंस कापणाराहि एक केशकर्तनविशारद तिथें होता. पण तो दिसत होता चिन्यासारखा ! मोठ्या प्रेमानें मला तो खुर्चीकडे घेऊन गेला, नि कापूस-कापड इत्यादींनीं चांगली गळेबंदी करून माझे केंस कापूं लागला. जगांतल्या सगळ्या न्हाव्यांप्रमाणें तो गोष्टीवेल्हाळ होताच. तो म्हणाला, 'साहेब, तुम्ही भारतांतले, नाहीं का ?' 'हो', मी म्हणालों. 'तुमच्यासारख्या भल्या लोकांवर या चिन्यांनीं काय म्हणून हल्ला केला हो ?' त्यानें विचारलें. मला जरा रागच आला त्याचा. मीं म्हणालों, 'लेका, तूं चिनी नि मला विचारतोय्स चिन्यांनीं हल्ला कां केला म्हणून ?' तो एकदम हंसला नि म्हणाला, 'साहेब, मी चिनी नाहीं. मी फिलिपिनो आहे, नि अमेरिकेचा नागरिक झालोंय् !' 'माफ कर, हं,' मी म्हणालों, 'तुम्ही सगळेच सारखे दिसतां बुवा !' 'हे चिनी लेकाचे बदमाषच !' तो म्हणाला, 'आम्हां फिलिपिनो लोकांना तें चांगलं माहीत आहे. तुम्ही त्यांना हांकलून द्याल, याबद्दल मला शंका वाटत नाहीं.' थँक्स अ लॉट', मी म्हणालों.

**हॉलोविन नाईट**

आम्ही उतरलों त्या रात्रीं 'हॉलोविन नाईट' होती. जेवण झाल्यावर रात्रीं भटकावयाला बाहेर पडलों. एका नाक्यावर दोन्ही तिन्ही रस्त्यांच्या कोपऱ्यांत लोकांचीं टोळकीं एका विशिष्ट हॉटेलाच्या दरवाजाकडे पाहत हंसत खिदळत उभीं असलेलीं दिसलीं. हॉटेलाच्या आंत व दरवाजाकडेहि बरीच ओरडाओरड चालली होती. इतक्यांत दरवाजांतून आपल्याकडल्या शिमग्यांतल्या सोंगासारखीं दोन तीन माणसें बाहेर पडलीं. त्यांच्याभोवतीं तरुण विद्यार्थ्यांची गर्दी हंसत, खिदळत, ओरडत

होती. सोंगासारखीं दिसणारीं तीं माणसें म्हणजे बायकांचे झगे घालून तोंडाला रंग फासून आणि डोक्यावर केंसांचे टोप घालून लचकत, मुरडत चालण्याचा प्रयत्न करणारे विद्यार्थीच होते! हॉलोविनच्या रात्रीं होळीच्या रात्रीसारखी अशा प्रकारची हुल्लड इथें चालते.

**कॅलिफोर्नियाचा बर्क्‌ले कॅम्पस्**

दुसऱ्या दिवशीं सकाळीं न्याहारीनंतर कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीचा प्रख्यात बर्क्‌ले कॅम्पस् पाहायला जायचें होतें. अमेरिकेचें हें एक फार मोठें व प्रख्यात विद्यापीठ आहे. फ्रिस्कोजवळच दहा-पंधरा मैलांवर बर्क्‌ले येथें जवळजवळ बारा हजार विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचें उच्च शिक्षण देणाऱ्या या विद्यापीठाचें कार्यक्षेत्र पसरलें आहे. या विद्यापीठाचे बर्क्‌ले, लॉस एंजेलीस वगैरे मिळून कॅलिफोर्नियांत प्रत्येक ठिकाणीं हजारों विद्यार्थी असलेले असे सात कॅम्पस् आहेत म्हणे. आम्ही बर्क्‌ले कॅम्पस्‌वर पोहोंचलों तेव्हां सकाळचे दहा-सव्वादहा वाजले होते. नोव्हेंबरचे थंडीचे दिवस असल्यामुळें जाड जाड स्वेटर घातलेले, आमच्या विद्यार्थ्यांच्या मानानें चांगले धिप्पाड दिसणारे शेंकडों विद्यार्थी आणि विद्यार्थिनी कांखेंत पुस्तकांचे गठ्ठे किंवा वह्या घेऊन इकडून तिकडे जातांना किंवा कॅम्पस-मध्यें शिरल्याबरोबर 'स्टुडंट्स् यूनियन'च्या भव्य इमारतीशेजारींच असलेल्या एका कारंजाच्या कांठावर बसून मुलींच्या हातांत हात घालून गुलुगुलू गोष्टी करीत बसलेले दिसले. आमच्यापैकीं कांहीं हिंदी, बिहारी वगैरे मित्रांना मुलांमुलींची ही सलगी कशीशीच वाटली. पु. ल. देशपांडे आणि मी त्यांना गंभीरपणें म्हणालों, 'अरे, हीं मुलंमुलीं अभ्यासांतल्याच कूट प्रश्नांची चर्चा करताहेत!'

**होम-कमिंग डे**

कांहीं मुलगे त्या कारंजाच्या पाण्यांत एक चेंडू टाकीत होते, आणि तिथें घिरट्या घालणारा एक भला मोठा कुत्रा पाण्यांतला चेंडू एका उडींत आपल्या तोंडांत धरून त्यांना परत आणून देत होता. हा कुत्रा

चोवीस तास त्या कारंजाच्या आवतींभोंवतींच असतो म्हणे. त्याचा मालक कुणीच नाहीं. सर्वच विद्यार्थी त्याचे धनी. कुणी पावाचे तुकडे, कुणी सॅन्डविच देतात, त्याला दररोज भरपूर खायला मिळतें. आजचा 'होम कमिंग ऑफ् ऑल कॅम्पस्' चा दिवस होता. म्हणजे या विद्यापीठाचे कॅलिफोर्नियांत ठिकठिकाणीं जे सात कॅम्पस् आहेत, तिथले अधिकारी आणि कांहीं विद्यार्थी-विद्यार्थिनी या दिवशीं बर्क्‌ले या मुख्य कॅम्पस्‌मध्यें एकत्र येतात. तिथें फिरणाऱ्या कांहीं विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या स्वेटरवर 'उक्ला' (U. C. L. A.) अशीं अक्षरें दिसत होतीं. 'उक्ला' म्हणजे युनिव्हर्सिटी कॅम्पस ऑफ लॉस एंजेलीस. दुसऱ्या दिवशीं बर्क्‌ले कॅम्पस् विरुद्ध लॉस एंजेलिस कॅम्पस् फूटबॉल मॅच होती. तेव्हां ॲरिझोनांतल्या-प्रमाणेंच आपला बॅन्डचा ताफा आणि नाचणाऱ्या मुली घेऊनच 'उक्ला' मंडळी आली होती. हां हां म्हणतां पलीकडल्या मोकळ्या जागेंत उक्ला बॅन्ड सुरू झाला आणि रांगेंत उभे राहून मुलें-मुली हातपाय उडवून नाच करूं लागली. एक मुलगा मोठमोठ्यानें आपल्या कॅम्पस्‌च्या घोषणा देत होता व इतर त्याला साथ देत होते.

**बर्क्‌लेंत आमचे विद्यार्थी**

'डेली कॅलिफोर्नियन' पत्राच्या प्रतिनिधींबरोबर आमच्यापैकीं कांहींच्या स्टूडन्ट्स् युनियनच्या एका दालनांत मुलाखती व्हावयाच्या होत्या. मी व देशपांड्यांनीं दुपारच्या जेवणाची वेळ होईपर्यंत कॅम्पस्-मध्यें इकडे तिकडे फिरायचें व मुंबईतल्या मित्रांचीं कांहीं मुलें इथें आहेत त्यांना भेटायचें ठरविलें होतें. युनियनच्या एअर कंडिशन्ड इमारतींतल्या इन्फर्मेशन सेंटरमधल्या मुलीला मी एक दोन नांवें सांगितलीं. माझे स्नेही जयसिंगराव रणदिवे यांचा मुलगा अनिल इथें इंजिनियरिंगच्या उच्च पदवीचा अभ्यास करतो आहे. दुसरे स्नेही सॉलिसिटर रेळे यांचा पुतण्या लोकसंख्येच्या प्रश्नावर डॉक्टरेट घेणार आहे. दुपारीं दीड वाजतां कॅम्पस्‌वरल्या 'गोल्डन बेअर' या रेस्टोरांमध्यें युनिव्हर्सिटीतर्फे आम्हांला

जेवण होतें. तिथेंच या मुलांनीं आम्हांला भेटावें म्हणून निरोप ठेवला. मुंबईत गणित विषयांत नांव मिळवणारी कुंदा आपटे घाईघाईनें लेक्चरला जात असलेली वाटेंतच भेटली. युनिअनच्या दालनांत चांगले प्रशस्त कोच, टेबलें वगैरे ठिकठिकाणीं विखुरलेली होतीं. पुस्तकांचा गठ्ठा जवळ घेऊन कांहीं विद्यार्थी वाचीत पडले होते, तर कांहीं [illegible] पणें चर्चा करीत होते. मेडिकल फॅकल्टी, इंजिनियरिंग फॅकल्टी वगैरे इमारती पाहत पाहत आम्ही विद्यापीठ ग्रंथालयांत गेलों. तिथें निरनिराळ्या विषयांवरलीं पुस्तकें होतीच; पण एका दालनांत कांहीं जुने दुर्मिळ ग्रंथ, ताम्रपट वगैरेहि होते. इंग्लंडच्या राणी एलिझाबेथच्या काळांतल्या सर फ्रॅन्सिस ड्रेक या धाडसी दर्यासारंगाचा 'ड्रेक्स प्लेट' नांवाचा एक ताम्रपट आम्हीं इथें पाहिला.

**फूटबॉल कॅप्टनचा गौरव**

'गोल्डन बेअर' मध्यें दुपारच्या जेवणासाठीं आलों. युनिव्हर्सिटी कॅम्पसवरल्या कांहीं इमारतींचीं रेखाचित्रें असलेल्या कागदाचे रुमाल मांडीवर ठेवण्याकरितां जेवणाच्या वेळीं दिले होते. अनायासें भारतांतून आलेल्या पाहुण्यांची भेट व्हावी म्हणून आम्हांला वाढण्याचें काम कॅम्पसवरल्या कांहीं हिंदी विद्यार्थ्यांनीं आणि अमेरिकी विद्यार्थिनींनी घेतलें होतें. जेवण संपवून बाहेर आलों तेव्हां पलीकडल्या मोकळ्या जागेंत शेंपांचशें खुर्च्या मांडलेल्या आणि मायक्रोफोनसह व्यासपीठ उभें केलेलें दिसलें. निरनिराळ्या कॅम्पसहून 'होम कमिंग डे' साठीं बर्क्लेला आलेल्या विद्यार्थ्यांची दोन वाजतां सभा होती. त्या त्या कॅम्पसचे प्राचार्य आपापल्या केंद्राच्या प्रगतीची थोडक्यांत माहिती देणार होते. खुर्च्यांवर, हिरवळीवर पाय पसरून दाटीवाटीनें विद्यार्थि-विद्यार्थिनी बसलीं होतीं. प्रत्येक प्राचार्यानें चार-पांच, चार-पांच मिनिटेंच पण अतिशय विनोदी आणि मुद्देसूद भाषण केलें. बर्क्ले कॅम्पसचे प्राचार्य शेवटीं म्हणाले, ". . . . आज आम्ही एकाच काळजींत आहोंत — उद्यां

उक्ला कॅम्पस्च्या फूटबॉल कॅप्टनला कसं हरवायचं ! .........'
उक्लाचा कॅप्टन अमेरिकेचा प्रख्यात फूटबॉल खेळाडू आहे.

**भला अमेरिकन--हॉसमान् !**

सॅन्फ्रॅन्सिस्कोपासून वीस मैलांवर असलेल्या रिचमंड या गांवांत माझे मित्र कोकाटे यांची मुलगी जयश्री एका अमेरिकन कुटुंबांत राहात होती. तिला भेटायला जायचें माझ्या मनांत होतें. पण रिचमंडपर्यंत जायचें कसें याची मी चौकशी करीत होतों. गुलाबदास ब्रोकर, जयंति दलाल वगैरे आम्ही दोघेतिघे सकाळची न्याहारी घेत हॉटेलांत बसलों होतों. रिचमंडला कसें जावें बुवा, असें मी म्हणत होतों. दलाल, ब्रोकर वगैरेशीं गप्पागोष्टी करीत एक म्हातारा अमेरिकन शेजारींच कॉफी घेत बसला होता. तो एकदम मला म्हणाला, 'अहो रिचमंडला जायची इतकी चिंता कसली करतां ? चला, मी नेतों तुम्हांला माझ्या मोटारींतून. आज शनिवारची सुट्टीच आहे. माझी मुलगी तिथेंच राहते. तुम्ही तुमच्या मित्राच्या मुलीला भेटा, मी माझ्या मुलीला भेटतों. मग आपण परत येऊं ! '

फारच चांगला म्हातारा होता तो. त्याचें नांव हॉसमान्. कुठेतरी विमा कंपनींत तो नोकरी करीत होता. पण जागतिक शांतता, युद्ध, सत्याग्रह या विषयांत त्याला फार गोडी होती. 'म्हणून तर कुणी भारतीय पाहिला, कीं त्यांच्याशीं ओळख करून घेऊन मी बोलायला पाहतों,' तो म्हणाला.

पैशासाठीं माणसामाणसांत, राष्ट्राराष्ट्रांत चाललेली स्पर्धा, शस्त्र-निर्मितीची चढाओढ, कांहीं राष्ट्रांची युद्धपिपासा या गोष्टींचा त्याला अतिशय वीट आलेला दिसला. 'तुमच्या गांधीजींचा लढाऊ शांततावाद किंवा सत्याग्रह हाच मार्ग मला योग्य वाटतो. काय हो, भगवद्गीतेंत काय सांगितलंय ?' त्यानें विचारलें.

त्याला मी कर्मयोग वगैरे वगैरे थोडक्यांत सांगितलें. 'ख्रिस्तॉफर

इशरवुड यानं गीतेचं अतिशय सुंदर इंग्रजी भाषांतर केलंय् तें तूं अवश्य वाच.' मी म्हणालों. इशरवुड हा इंग्रज कवि आणि कादंबरीकार आहे. सध्यां तो अमेरिकेंत असतो. वेदान्त सेंटरचे स्वामी प्रभवानंद यांच्याकडे तो योग आणि वेदान्त यांचा अभ्यास करतो असें मला कळलें होतें. हॉसमाननें तावडतोब पुस्तकाचें व लेखकाचें नांव आपल्या डायरींत टिपून घेतलें.

**रिचमंडमधलें श्वेनिक कुटुंब**


रिचमंड हें चिमुकलें गांव मला छान वाटलें. समुद्राजवळच्या एका छोटयाशा टेकडीवर जयश्री राहात असलेल्या श्वेनिक कुटुंबाचें, भोंवतीं व्यवस्थित बागबगीचा असलेलें टुमदार पांढरें घर होतें. आंतरराष्ट्रीय स्नेहसंवर्धनाच्या दृष्टीनें अमेरिकेंतल्या कांहीं कुटुंबांनीं भारतांतल्या मुलामुलींना एक वर्षभर आपल्या घरांत ठेवायचें, त्यांच्या राहण्याचा, खाण्यापिण्याचा, शिक्षणाचा खर्च आपल्या स्वतःच्या मुलांप्रमाणेंच करायचें मान्य केलें आहे. पुण्याची इंडिया फाउन्डेशन ही संस्था या मुलामुलींची निवड दर वर्षी करून त्यांना अमेरिकेला पाठविते. जयश्रीला श्वेनिक कुटुंबांत येऊन चार पांच महिने झाले होते. त्या दिवशीं शनिवार हा रजेचा दिवस असल्यामुळें इंजिनियर मिस्टर श्वेनिक शेजारच्याच खेडयांत असलेल्या आपल्या म्हाताऱ्या आईच्या घराची कांहीं दुरुस्ती करण्याकरितां गेले होते. मिसेस श्वेनिक घरीं होत्या. जयश्रीला भेटायला मी आलेला पाहून श्वेनिकबाईंना फार आनंद झाला. 'तिच्या आईला सांगा,' त्या मला म्हणाल्या, 'जयश्रीचें वजन इथें आल्यानंतर अकरा पौंडांनीं वाढलें आहे!'

'जरूर सांगेन,' मी हंसून म्हणालों. श्वेनिकबाईंना दोन मुली आहेत. 'जायु माझी तिसरी मुलगी!' त्या उद्गारल्या.

'तुम्हांला फक्कड चहा करून देतें,' त्या म्हणाल्या, 'इथं सर्व कॉफी पितात. तुम्हां मंडळींना चहा चांगला मिळत नाहीं हें जायूनं मला

सांगितलंय् ! ' असें म्हणून खरोखरच त्यांनीं फारच चांगला चहा, चीज, बिस्किटें वगैरे पांच मिनिटांत माझ्यापुढें आणून ठेवलीं. मी आणि हॉसमान बराच वेळ त्यांच्याशीं गप्पागोष्टी करीत बसलों. फार प्रेमळ आणि हुषार बाई वाटली. रिपब्लिकन पक्षाचे निक्सन विरुद्ध डेमोक्रॅटिक पक्षाचे ब्राऊन अशी कॅलिफोर्नियाच्या गव्हर्नरपदाची मोठी चुरशीची निवडणूक त्यावेळीं जवळ आली होती. रिचमंडमधल्या डेमोक्रॅटिक पक्षाच्या स्त्रीसंघटनेच्या अध्यक्ष श्वेर्निकबाई होत्या. हा निक्सन मोठा प्रतिगामी आहे, त्या म्हणत होत्या. शेवटीं ब्राऊनच निवडून आल्याचें कांहीं दिवसांनीं आम्हांला कळलें.

सॅन्फ्रॅन्सिस्कोहून आम्ही यूटा राज्याचें मुख्य शहर सॉल्टलेक सिटी येथें जावयाला निघालों.



# : ७ : यूटा – सॉल्टलेक सिटी

## यूटाची राजधानी सॉल्टलेक सिटी

यूटा राज्याची राजधानी सॉल्टलेक सिटी इथल्या विमानतळावर उतरलों, तेव्हां तिथल्या अनेक सुंदर सुंदर वस्तूंच्या ‘ गिफ्टशॉप ’ मध्यें गांवाच्या नांवाला साजण्यासारख्या कांहीं वस्तु विकायला ठेवलेल्या पाहून गंमत वाटली. जाड सफेत कापडाच्या चिमुकल्याशा मीठ भरलेल्या, आपण बाहेरगांवच्या मित्रांना तिळगुळाच्या पाठवतों तसल्या पिशव्या ‘ सॉल्टलेक सिटीचें मीठ ’ अशीं लेबलें लावून इथें विकायला ठेवलेल्या दिसल्या ! सॉल्टलेक सिटीचें स्मृतिचिन्ह म्हणून अनेक प्रवासी या पिशव्या विकत घेतात. दुसऱ्या दिवशीं फिरायला बाहेर पडलों तेव्हां शहराच्या एका बाजूला समुद्रासारखें पसरलेलें अफाट सॉल्टलेक दृष्टीला पडलें. विमानगृहांतल्या त्या दुकानांत गिनीच्या सोन्यापेक्षांहि आकर्षक दिसणारीं शुद्ध तांब्याचीं अतिशय सुबक नक्षीकाम केलेलीं अनेक प्रकारचीं बायकांनीं वापरायचीं कंकणेंहि होतीं. आमच्यापैकीं पुष्कळांनीं त्यांतलीं विकत घेतलीं. सॉल्टलेक सिटीजवळच अमेरिकेंतली एक फार मोठी तांब्याची खाण आहे. त्या खाणींतल्या तांब्याच्या या वस्तु होत्या. केनिकॉट कॉपर कॉर्पोरेशनची ही अजस्र तांब्याची खाण पाह्यला आम्हांला मुद्दाम नेण्यांत आलें होतें. वर वर सभोंवार चढत जाणारे बसायच्या जागांचे पट्टे आणि वरून पाहिलें असतां खालीं निमुळत्या होत गेलेल्या जागेंत खेळायचें अंगण असलेल्या एखाद्या अजस्र स्टेडियमसारखी सभोंवारच्या डोंगरी भागांत खोदलेली ही खाण दिसत होती. कित्येक वर्षें वरून तांब्याचे थर सभोंवार खोदीत खोदीत खालीं गेल्यामुळें मानवी प्रयत्नांनीं डोंगरांत खोदलेल्या एखाद्या प्रचंड दरीसारखी ती दिसत होती.

**मॉर्मनपंथीय लोक**

सॉल्टलेक सिटी हें या राज्याचें मुख्य शहर, किंबहुना हें सबंध यूटा



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

राज्यच अमेरिकेंतल्या प्रख्यात 'मॉरमॉन्' पंथाच्या लोकांनीं वसविलें आहे. ख्रिस्ती धर्माचेच हे लोक आहेत, आणि बायबल हाच त्यांचा धर्मग्रंथ आहे. इतर कोणाहि अद्यावत् गोऱ्या अमेरिकन माणसांसारखींच हीं माणसें आहेत. आपल्या महाराष्ट्रांत जसे महानुभाव किंवा नाथपंथीय असे प्रकार आहेत तसाच अमेरिकेंतल्या ख्रिस्ती धर्मीयांचाच हा एक प्रकार आहे, असें म्हणायला हरकत नाहीं. बहुतेक मॉर्मॉन या यूटा राज्यांत आणि सॉल्टलेक सिटीत आहेत. बहुतेक इथले आणि थोडेबहुत जगांत इतरत्र आहेत, ते मिळून एकंदर मॉर्मानांची संख्या पंधरा-सोळा लाखांच्या आसपास आहे म्हणतात.

**मॉर्मन टॅंपल आणि टॅबरनॅकल**

येशू ख्रिस्त आणि बायबल हे लोक मानीत असले तरी 'बुक ऑफ मॉर्मॉन्' हा त्यांचीं खास धर्मतत्त्वें सांगणारा एक ग्रंथ आहेच. आपल्या-कडल्या महानुभाव पंथीयाप्रमाणेंच या लोकांबद्दल अनेक गैरसमज होते, आणि त्यांचा छळहि खूप झाला. गैरसमजाचें एक मुख्य कारण म्हणजे ख्रिस्तीधर्म निषिद्ध अशी एक चाल प्रारंभीं प्रारंभीं या लोकांत होती म्हणतात. ती म्हणजे एका पुरुषानें अनेक बायका करण्याची. त्याचप्रमाणें या लोकांचें शंभर वर्षांहून जुनें असें सॉल्टलेक सिटीमध्यें टेंपल स्क्वेअर या भागांत जें चर्च आहे—त्याला ते टेंपलच म्हणतात—त्यांत मॉरमॉन् नसलेल्या कुणालाहि प्रवेश नाहीं.

आम्हांला ज्या टोलेजंग यूटा हॉटेलमध्यें ठेवण्यांत आलें होतें त्याच्या समोरच रस्त्याच्या पलीकडे हें भव्य, उंचच उंच, आकाशांत जाणारीं शिखरें असलेलें चर्च होतें. आम्ही राहात होतों तें अद्यावत् टोलेजंग यूटा हॉटेल या चर्चच्याच मालकीचें आहे म्हणे. चर्चच्या प्रशस्त आवारांत एक भव्य, वर्तुळाकार टॅबरनॅकल किंवा प्रार्थनामंदिर आहे. या मंदिरांतलें उंचच उंच प्रचंड चर्चऑर्गन वाजवलें जातें तेव्हां त्याचा गंभीर नाद सर्व मंदिर भरून टाकतो. शेंदोनशें पुरुष आणि शेंदोनशें स्त्रियांचा रविवारीं

सकाळीं प्रार्थनासंगीत गाणारा इथला 'कॉयर' किंवा गायकवृंद जगद्विख्यात आहे. आम्ही सॉल्टलेक सिटींत आलों त्याच्या दुसऱ्या दिवशींच रविवार होता. हें प्रार्थनासंगीत ऐकण्याकरितां आम्हांला खास आमंत्रण देण्यांत आलें होतें. शंभरसव्वाशें वर्षांपूर्वी मॉर्मॉन् पंथप्रमुख डॉ. ब्रिघम यंग आपल्या अनुयायांसह इथें आले तेव्हां त्यांनीं स्वतः या प्रार्थना-मंदिराचा नकाशा तयार करून तें बांधून घेतलें. त्याची रचना इतकी शास्त्रशुद्ध आहे कीं एका टोंकाला टांचणी टाकली तर तिचा आवाज दुसऱ्या टोंकाला ऐकूं येतो. ही नुसती अलंकारिक भाषा नव्हे; त्या दिवसाचें प्रार्थनासंगीत संपल्यावर आम्हांला हा प्रयोग करून दाखविण्यांत आला. इथल्या कॉयरचें पुष्कळ वेळां रेडिओवरून किंवा टेलिव्हिजन-वरून सबंध अमेरिकेंत ध्वनिक्षेपण होतें.

**मद्य, तंबाखू, कॉफी, चहाला मॉर्मन स्पर्श करीत नाहींत**

टॅबरनॅकलमधल्या प्रार्थनासंगीताच्या कार्यक्रमानंतर कांहीं प्रमुख मॉर्मनांबरोबर आमची चर्चा झाली. कौटुंबिक जीवनाला मॉर्मन फार महत्त्व देतात, म्हणून अनेक बायका व मुलेंबाळें हवींत अशा कांहींतरी कल्पनेनें १८९० पर्यंत कांहीं मॉर्मन बहुपत्नीकत्वाला उचलून धरीत असत, असें आमच्याशीं बोलणारे लोक म्हणाले. पण १८९० सालीं चर्चचे मॉर्मन अध्यक्ष वुड्रफ् यांनीं एक जाहीरनामा काढून बहुपत्नीकत्वाला बंदी केली. तेव्हांपासून सर्व मॉर्मन एकपत्नीत्वाच्या देशांतल्या कायद्याचें कसोशीनें पालन करतात. परस्पर साहाय्य आणि उद्योगशीलता हें एक मॉर्मनांचें वैशिष्टय आहे. आठवड्याचे कांहीं तास, मॉर्मन विद्यार्थी, वकील, डॉक्टर, उद्योगपति, व्यापारी, प्रत्येक जण मॉर्मनांच्या अनेक सहकारी उद्योगभवनांपैकीं एखाद्यांत जोडे शिवण्याचें, बाटल्या भरण्याचें, डबे पॅकबंद करण्याचें असें जमेल तें काम विनावेतन करीत असतो. या उद्योगभवनांत होणाऱ्या वस्तु अगदीं स्वस्त किंमतींत किंवा फुकट गरीब, गरजू मॉर्मन कुटुंबांना देण्यांत येतात.

## उत्साही आणि उद्योगी मॉर्मन

रविवारच्या सुट्टीच्या दिवशीं चांगल्या चांगल्या व्यवसायांतले लोक प्रवाशांना शहर किंवा प्रेक्षणीय स्थळें दाखविण्यासाठीं स्वयंसेवक म्हणून येतात. दारू किंवा तंबाखूच काय पण चहा किंवा कॉफीलाहि मॉर्मन स्पर्श करीत नाहींत. त्यांच्या यूटा हॉटेलांत आम्हांला सर्व कांहीं देण्यांत येत होतें, पण ते स्वत: स्पर्श करीत नसत. ब्रिघम यंग युनिव्हर्सिटी आम्ही पाह्यला गेलों तेव्हां विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांबरोबर आमचें दुपारचें जेवण झालें. जेवण उत्कृष्ट होतें, पण अमेरिकेंत जेवणा-बरोबर भरपूर कॉफी देण्यांत येते ती मात्र तिथें औषधालाहि नव्हती. युनिव्हर्सिटीच्या आसपास कित्येक मैल मद्य किंवा सिगारेट मिळत नाहीं म्हणतात. या मॉर्मनांचा प्रत्येक गोष्टींत उत्साह दांडगा आहे. आपल्या पथाची माहिती देणाऱ्या सुंदर सुंदर सचित्र पुस्तिका, सॉल्टलेक सिटीं-तल्या आणि एकंदर यूटा राज्यांतल्या नैसर्गिक सौंदर्याचीं आणि प्रेक्षणीय स्थळांचीं चित्रें वगैरे एका कातडी बाइंडिगच्या सुंदर पुठ्ठ्यांत घालून त्यांनीं आमच्यापैकीं प्रत्येकाच्या हातांत दिलीं. आमचीं नांवें त्यांनीं आधींच मागवून घेतलीं होतीं. प्रत्येकाचें नांव त्याच्या निळ्या पुठ्ठ्यावर सोनेरी अक्षरांत छापलेलें होतें. प्रत्येक पुठ्ठ्याचें वजन इतकें होतें कीं आमच्या विमानांतून न्यायच्या मोजक्या वजनांत हें कसें काय जाणार म्हणून आम्ही सहज म्हणालों, तेव्हां त्यांनीं आम्हां सर्वांचे पत्ते मागून घेतले आणि तुमच्या घरीं पोस्टानें पाठवून देऊं म्हणून सांगितलें. मुंबईंत घरीं आल्यावर पांच पांच डॉलरांचीं तिकिटें लावून बुकपोस्टानें पाठ-विलेले ते पुठ्ठे आम्हांला मिळाले.

## धिस इज द प्लेस !

या मॉर्मन पंथाचा इतिहास अगदीं अलिकडचा म्हणजे शेंसव्वाशें वर्षांचा आहे. आपल्या पंथाला हे लोक ‘ चर्च ऑफ जीझस ख्राईस्ट ऑफ लॅटर डे सेन्ट्स् ’ म्हणतात. या पंथाचा प्रवर्तक आणि पहिला प्रेषित प्रॉफेट

जोसेफ स्मिथ याला १८२० सालीं प्रकाशाचा एक स्तंभ दिसला, आणि आपण प्रेषित असल्याचा साक्षात्कार झाला. मॉर्मनांच्या मतें हल्लींच्या गोऱ्या अमेरिकनांचे पूर्वज इसवी सनापूर्वी कांहीं शतकें रेड इंडियनांबरोबरच अमेरिका खंडांत होते. नंतर ख्रिस्ताचा कुणी एक प्रेषित शिष्य अमेरिकेंत आला. त्यानें सोन्याच्या पत्र्यावर कोरलेल्या कांहीं धर्माज्ञाहि सांपडल्या आहेत. जोसेफ स्मिथनें हा नवा पंथ १८३० सालीं न्यूयॉर्क राज्यांत फायेत् येथें प्रवर्तित केला, तेव्हां त्याला फक्त सहा अनुयायी होते. १८४४ सालीं इलिनॉय राज्यांतल्या कार्थेज गांवीं जोसेफ आणि त्याचा भाऊ हायरम या दोघांचा मॉर्मनांना हुसकावून लावूं पाहणाऱ्या लोकांच्या जमावानें खून केला. आपला खून होणार हें भाकीत जोसेफनें आधींच केलें होतें. मॉर्मन स्त्री-पुरुष, मुलें, कुटुंबेंच्या कुटुंबें एकएका राज्यांतल्या छळाला कंटाळून एकसारखीं प्रदेशांतर करीत होतीं. अशा हजारों स्त्रीपुरुषमुलांचा एक जथा घेऊन त्यांचे दुसरे प्रेषित डॉ. ब्रिघम यंग मिठाचीं तळीं आणि ओसाड प्रदेश असलेल्या यूटा राज्याच्या सॉल्टलेक खोऱ्यांत १८४८ त येऊन पोहोंचले. यूटा राज्याचा प्रदेश मॉर्मनांच्या परिश्रमांनीं सुजल, सुफल, सस्यश्यामल झाला आहे.

**टोळधाड आणि समुद्रपक्षी**

ब्रिघम यंग यांनीं आपल्या अनुयायांसह डोंगरांतल्या खिंडी ओलांडून या खोऱ्यांत पहिलें पाऊल टाकलें, तेव्हां समोरचा विस्तीर्ण निर्मनुष्य प्रदेश पाहून ते तिथेंच थांबले, आणि म्हणाले, ‘ हीच ती जागा ! ’ (This is the place). जिथें ते थांबले त्या मोकळ्या जागेंत पर्वतराजींच्या पार्श्वभूमीवर सॉल्टलेक सिटीच्या जवळच एक भव्य दगडी स्मारक उभें केलें आहे. मोठ्या थोरल्या कमानीखालीं हात वर करून डॉ. ब्रिघम यंग उभे आहेत. थकलेलीं घोडीं, थकलेले स्त्रीपुरुष-मुलें यांचे दोन गट स्मारकाच्या दोन टोंकांना आहेत. कमानीवर ‘ This is the place ’ हीं अक्षरें कोरलीं आहेत. ब्रिघम यंग आणि त्यांचे

अनुयायी या प्रदेशांत येऊन स्थायिक होतात न होतात तोंच एक मोठा चमत्कार झाला. १८४८ च्या जून महिन्यांत मॉर्मन कुटुंबांनीं पेरलेलें धान्य चांगलें तरारून वर आलें. होतें इतक्यांत एक मोठी टोळधाड तिथें आली. ती धान्यावर बसणार इतक्यांत समुद्रावर नेहेमीं घिरट्या घालतात त्या पांढऱ्या शुभ्र हजारों पक्ष्यांचे थवे तिथें कुठून कसे आले कुणाला ठाऊक; ते आले आणि त्या टोळांना त्यांनीं नष्ट केलें ! सॉल्ट-लेक सिटींतले मॉर्मन चर्च आम्ही पाह्यला गेलों तेव्हां त्या विस्तीर्ण आवारांत शिरल्याबरोबर समोरच सुंदर कोरीव काम केलेला भव्य दगडी स्तंभ आणि त्याच्यावर पांढऱ्या समुद्रपक्ष्यांच्या थव्याचें शिल्प दिसलें. १८४८ मधल्या त्या प्रसंगाचें हें स्मारक आहे.

**बी. वाय्. यू. त आमचें स्वागत**

सॉल्टलेक सिटीपासून पंचवीस तीस मैलांवर प्रोव्हो नांवाचें छोटेसें गांव आहे. तिथें १८७८ सालीं ब्रिघम यंग युनिव्हर्सिटी स्थापन करण्यांत आली. बी. वाय. यू. या छोट्या नांवानें ती यूटा राज्यांत प्रसिद्ध आहे. ऐसपैस पसरलेल्या युनिव्हर्सिटी कॅम्पस्च्या मागल्या डोंगरावर बी. वाय. यू. हीं प्रचंड अक्षरें, आम्ही लहान लहान टुमदार, एक मजली घरें असलेल्या प्रोव्हो गांवांतून युनिव्हर्सिटीकडे जाऊं लागलों, तेव्हां आम्हांला दिसलीं. विद्यापीठाच्या निरनिराळ्या खात्यांच्या जणुं काय कालच बांधून झाल्यात इतक्या चकचकीत ठेवलेल्या इमारती पाहत आम्ही युनिव्हर्सिटीच्या छप्पर घालून बंद केलेल्या प्रचंड स्टेडियमकडे गेलों. या युनिव्हर्सिटीच्या कॅम्पस्वर सुमारें बारा साडेबारा हजार विद्यार्थिनी, विद्यार्थी आणि सहाशें प्राध्यापक आहेत. या स्टेडियममध्यें मधल्या व्यासपीठाच्या सभोंवार चढत्या पायऱ्यांच्या आसनांवर दहा हजार विद्यार्थी—विद्यार्थिनी वसूं शकतात. आम्ही स्टेडियमवर गेलों तेव्हां नॅशनल स्पीकर खास पाहुणे म्हणून इंग्लंडहून व्याख्यानाला बोलावलेले तरुण मजूरपक्षीय राजकारणी वेजवुड् बेन यांचें व्याख्यान चालू होतें.

नानारंगी लोकरी स्वेटर घालून बांकावर बसलेले आठदहा हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी शांतपणें बेन यांचें जागतिक राजकारणावरचें अस्खलित इंग्रजी वक्तृत्व ऐकत होत्या. भाषण फारच चांगलें रंगलें होतें. आम्हां पंधरावीस पाहुण्यांसाठीं व्यासपीठाजवळ जागा राखून ठेवण्यांत आली होती; पण आम्हांला पांचदहा मिनिटें उशीर झाला होता. तेव्हां आमचें स्वागत करावयाला उभे असलेल्या युनिव्हर्सिटीच्या अधिकाऱ्यांना सांगून विद्यार्थ्यांच्याच घोळक्यांत आम्ही एका बाजूला गुपचूप जाऊन बसलों. युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेन्टच सभेचे अध्यक्ष होते. त्यांनीं आम्हांला आंत येऊन बसतांना पाहिलें होतें. व्याख्यान संपल्यावर आपल्या आभाराच्या भाषणांत आम्हां भारतांतून आलेल्या पाहुण्यांचा त्यांनीं गौरवपूर्ण उल्लेख केला, तेव्हां विद्यार्थ्यांनीं टाळ्या पिटून सर्वांना आम्ही दिसावें म्हणून आमच्या जागेवर आम्हांला उभें राहणें भाग पाडलें. प्रोव्हो गांवांतून येतांना बऱ्याचशा फळबागा दिसल्या.

**काऊबॉइज् आणि काऊगर्ल्स्**

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तीस-चाळीस मैलांवर असलेल्या ब्रायटन या पायाला लांकडी फळ्या बांधून वर्फावरून घसरत फिरण्याची सोय असलेल्या सहलीच्या ठिकाणीं जायचें होतें. सकाळीं उठल्याबरोबर बाहेर पडलों. सकाळचा उपाहार हॉटेलांत न करतां वाटेंत 'काऊ-बॉइज्' आणि 'काऊगर्ल्स्' जिथें कामें करतात अशा यूटांतल्या एका 'रँच' वरच व्हायचा होता. या रॅन्चचें नांव 'माऊन्टन मीडो रॅन्च'. विस्तीर्ण पसरलेल्या माळासारख्या या रँचवर गवत सांठवून ठेवावयाचीं उंच छपराचीं खेडवळ घरें, घोडयांनीं ओढावयाचे मालगाडे वगैरे कुठें कुठें दिसत होते. खेडवळ वातावरणाचा रँच असला तरी उपाहाराची सोय असलेलें चिमुकलें लांकडी हॉटेल चांगलें अद्यावत् होतें. कॉफी, अंडीं वगैरे शहरांतल्या हॉटेलांतल्यासारखींच होतीं, पण पावाऐवजीं गरम गरम भट्टींतून काढलेल्या पानग्यासारख्या रोटया होत्या. लोण्या-

बरोबर मधहि भरपूर खायला दिला होता. ‘मेन’ ‘वुइमेन’ अशा पाट्या स्नानगृहावर असतात त्याऐवजीं इथें ‘काऊबॉइज्’ आणि ‘काऊगर्ल्स्’ अशा पाट्या होत्या! प्रातरुपाहारानंतर पुढें जायला निघालों तेव्हां वाटेंत एक ‘ब्रायडल व्हेल’ नांवाचा धबधबा लागला. लग्नप्रसंगीं पाश्चिमात्य वधू वापरते तसल्या शुभ्र झिरझिरीत ओढणी-सारखा धबधब्याचा प्रवाह दिसत होता. तेव्हां नांव अगदीं सार्थ होतें. धबधबा कोसळतो तिथें वर डोंगरावर जाण्याकरितां खालून ‘रोप-ट्रॉली’ किंवा तारावरून सरकत जाणाऱ्या खुर्च्या होत्या.

**बस ड्रायव्हर ज्यो**

दुपारचें जेवण ब्रायटनमधल्या ‘माऊन्ट मॅजेस्टिक मॅनर’ या जुन्या वाड्यासारख्या दिसणाऱ्या पण आंतून सर्व सुखसोयींनीं युक्त असलेल्या स्वित्झर्लंडमधल्या एखाद्या हॉटेलाची आठवण करून देणाऱ्या हॉटेलांत होतें. हॉटेलजवळपासच्या डोंगरावर बर्फ अगदीं तुरळक होतें. तेव्हां ‘स्कीइंग’ करण्याचा प्रश्नच नव्हता. पण तारांवरून सरकणाऱ्या खुर्च्यांत बसून आम्ही डोंगरदऱ्यांवरून खूप फिरलों. आमची प्रवासी बस चालवणारा चोवीस पंचवीस वर्षांचा तरुण ड्रायव्हर ज्यो आमच्या-बरोबरच जेवायला बसला होता. मी त्याला सहज म्हटलें, ‘ज्यो, आतां चारपांच तास हें बस चालविणें झाल्यावर संध्याकाळीं तूं काम काय करणार?’

ज्यो म्हणाला, ‘सर, मी यूटा युनिव्हर्सिटींत मास्टर ऑफ लॉच्या पदवीचा अभ्यास करतोंय्. इथून गेलों कीं ही ड्रायव्हरची टोपी बस कंपनीच्या कचेरींत काढून टाकणार, आणि युनिव्हर्सिटी लायब्ररींत अभ्यासाला जाणार. बस कंपनी आम्हां विद्यार्थ्यांना तुमच्यासारख्या प्रवाशांना इथलीं स्थळें दाखविण्याचीं कामें देते. तासाला दीडदोन डॉलर मिळतात.’

‘अरे वा—’ मी म्हणालों, ‘मास्टर ऑफ लॉज् झाल्यावर इथें


सॉल्टलेक सिटींतच वकिली करणार का तूं, ज्यो ?'

'छे छे,' तो म्हणाला, 'मी बहुतेक कॅलिफोर्नियांत जाईन.'

**ब्रायटनमध्यें कोल्हापूर सांगवड्याचे पाटील**

ब्रायटनच्या डोंगरावर फिरत असतां एक तरतरीत हिंदी तरुण एका अमेरिकन मुलीबरोबर फिरत असलेला मला आणि पु. ल. देश-पांड्यांना दिसला. त्यानें आम्हांला पाहिलें, आणि हंसरा चेहेरा करून तो आलाच आमच्याकडे. इंग्रजींत चार शब्द बोललों नाहीं, तों त्या तरुणाचें नांव पाटील व तो कोल्हापूरजवळील सांगवडें गांवचा असल्याचें कळलें. बऱ्याच गप्पागोष्टी झाल्या. सॉल्टलेक सिटीजवळ असलेल्या स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ यूटामधून डॉक्टरेट घेऊन यूटा राज्य सरकारच्या एका खात्यांत पाटील काम करीत होते. 'काय, कोल्हापूर, हिंदुस्थानांत यायचा विचार आहे कीं नाहीं ?' आम्ही विचारलें. 'आहे तर ! खात्रीनें येणार;' पाटील म्हणाले, 'शिक्षणासाठीं खर्च झालेले पैसे मिळवले कीं ताबडतोब येणार.'

यूटा स्टेट युनिव्हर्सिटींत बरेच हिंदी विद्यार्थी असल्याचें कळलें. कुळकर्णी, महाजन, पवार वगैरे कांहीं मराठी आणि कांहीं गुजराती मित्र घेऊन पाटील त्या रात्रीं आमच्या हॉटेलांत आम्हांला भेटायला आले.



# : ८ : मिनेसोटा – मिन्यापोलीस

जुळ शहर—१०,००० तळीं !

मिनेसोटा राज्याची राजधानी मिन्यापोलीस–सेंटपॉल या जुळ्या शहरावर आमचें विमान उतरण्यापूर्वी घिरट्या घालूं लागलें, तेव्हां दूरपर्यंत आजूबाजूला पाणीच पाणी–तळींच तळीं दिसूं लागलीं. मिसिसिपी नदीच्या कांठावर हें शहर वसलें आहे. मिसिसिपीला नदी म्हणण्यापेक्षां महान् नदच म्हणणें अधिक योग्य होईल. मिन्यापोलीस–सेंटपॉलला 'ट्विन् सिटीज्' किंवा जुळें शहर म्हणतात. मिसिसिपीच्या एका कांठावर मिन्यापोलीस आहे तर दुसऱ्यावर सेंटपॉल आहे. गोदावरीवरील नाशिक-पंचवटीच म्हणा ना ! दोन्ही शहरें एका प्रशस्त पुलानें जोडलीं आहेत, पण राज्यकारभाराच्या कॅपिटॉलची इमारत सेंटपॉलमध्यें आहे. या प्रदेशांत तळीं, सरोवरें खूपच दिसतात, असें बोलत आम्ही विमान-गृहाच्या दाराशीं जातों तों समोरच सुंदर भव्य अक्षरांत लिहिलेला फलक दिसला,—'Welcome to the country of ten thousand lakes!' म्हणजे या प्रदेशांत प्रचंड मिसिसिपी नदी आणि दहा हजारांवर तळीं आहेत म्हणायचीं !

गांवांतून आमची बस रॅडिसन हॉटेलकडे जात असतां रस्त्यावरल्या आणि आजूबाजूच्या बागांतल्या मोठमोठ्या वृक्षांचे नुसते खराटे उभे राहिलेले दिसत होते. सगळीं पानें गळून गेलीं होतीं. एकाहि झाडावर एकहि पान दिसत नव्हतें. मिन्यापोलीस अमेरिकेच्या मिड्वेस्ट किंवा मध्यपश्चिम भागांत आहे. या भागांत कडाक्याचा हिंवाळा सुरू झालेला दिसत होता. कांहीं ठिकाणीं गिरण्यांसारखे मोठमोठे कारखाने आणि त्यांच्या आवारांत मोठमोठ्या मनोऱ्यांसारखे उंचच उंच 'सायलो' दिसत होते. या राज्यांत पिठाच्या मोठमोठ्या गिरण्या आहेत. मोठमोठ्या सायलोमध्यें धान्य भरून ठेवतात. रस्त्यांत दिसणारे बरेचसे

लोक अमेरिकनच होते, पण चांगले उंचेपुरे, धिप्पाड, निळ्या डोळ्यांचे आणि सोनेरी केसांचे दिसत होते. रस्त्यावरल्या पाट्यांवरलीं नांवेंहि जेन्सेन, अँडरसेन अशीं नॉर्वे–स्वीडनच्या बाजूचीं दिसत होतीं. यूरोपां-तल्या सर्व देशांतून अमेरिकेंत लोक आले आहेत. मिनेसोटा राज्यांत नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्ककडल्या लोकांचा अधिक भरणा आहे.

**व्हिजिटर्स वॉक् इन !**

आम्ही मिन्यापोलीसमध्यें उतरलों त्या दिवशीं अमेरिकेची सार्वत्रिक निवडणूक होती. दुपारीं साडेतीनला मिनेसोटाचे गव्हर्नर अँन्डरसन यांची सेंट्पॉल येथील कॅपिटॉलमध्यें आमची मुलाखत ठरली होती. अमेरिकेंत मुख्य मंत्री, मंत्रिमंडळ अशा प्रकारचा संसदीय लोकशाहीचा राज्यकारभार नाहीं. तिथें अध्यक्षीय लोकशाही आहे. सीनेट या वरिष्ठ आणि हाऊस ऑफ् रेप्रेझेन्टेटिव्हज् या कनिष्ठ विधिमंडळाच्या नियंत्रणा-खालीं निरनिराळ्या खात्यांचे चिटणीस नेमून राज्यकारभार वॉशिंग्टन-मधल्या कॅपिटॉलमधून राष्ट्राध्यक्ष चालवतो, त्याचप्रमाणें आपापल्या प्रदेशांतला कारभार त्या त्या प्रदेशाचा गव्हर्नर तिथल्या कॅपिटॉलमधून चालवतो. त्यामुळें अमेरिकेंतले गव्हर्नर हे केवळ नामधारी अधिकारी नसतात. मिनेसोटाचे गव्हर्नर अँन्डरसन हे रिपब्लिकन पक्षाचे होते, आणि डेमॉक्रॅटिक पक्षाचे रोलव्हाग यांच्याविरुद्ध ते उभे होते. त्या दिवशीं गव्हर्नर म्हणून ते पुन्हां निवडून येणार कीं नाहीं तें ठरणार होतें.

कॅपिटॉलमध्यें आम्ही गेलों तेव्हां तिथें शिपाई, चपरासी, पट्टेवाले, संगीनवाले सैनिक कुठेंच दिसले नाहींत. गव्हर्नरांच्या खोलीकडे वळलों, तिथें एक लहानशी पाटी ठेवलेली दिसली. पाटीवर अक्षरें होतीं– ‘Visitors walk in’. गव्हर्नरांचा चिटणीस दारांत उभाच होता. आमचें स्वागत करून गव्हर्नर तुमची वाटच पाहाताहेत, असें म्हणून गव्हर्नर बसले होते त्या आंतल्या दालनांत त्यानें आम्हांला नेलें. तपकिरी रंगाच्या साध्या सुटांत आपल्या टेबलाशीं बसलेले उंच, तरतरीत, मध्यम

वयस्क गव्हर्नर अ‍ॅन्डरसन एखाद्या मोठ्या कंपनीच्या डायरेक्टरासारखे दिसत होते. गव्हर्नर म्हटल्यावर आम्हां मंडळींच्या डोळ्यांसमोर जो इतमाम येतो तो इथें कांहींच नव्हता. आम्ही आंत गेल्यावरोबर ते हास्य करीत पुढें आले, आणि प्रत्येकाशीं हस्तांदोलन करून तिथल्या खुर्च्या, कोच पुरत नव्हते म्हणून आणखी कांहीं खुर्च्या आणायला त्यांनीं आपल्या चिटणीसास सांगितलें. कॉफी, कोका-कोला आम्हांला काय हवें नको तें आपल्या नोकराला आणायला सांगून ते आमच्याशीं बोलूं लागले. भारतावरील चीनचें आक्रमण, काश्मीर, पाकिस्तानची राज्य-घटना, क्यूबाची नाकेबंदी, फिडेल कॅस्ट्रो इत्यादि विषयांवर आमच्याशीं ते अगदीं मोकळ्या मनानें कोटचा-प्रतिकोटचा करीत बोलले.

**अमेरिकेंतल्या निवडणुका**

परत येतांना एक मतदान केंद्र पाहावयाचें ठरलें. प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाचे चीफ रिपोर्टर माझे स्नेही श्री. गुर्जर या दौऱ्यांत माझे सोबतीच होते. त्यांनीं त्या दिवसाच्या अमेरिकेंतल्या सार्वत्रिक निवडणुकींतल्या दृश्यांचें अतिशय रेखीव वर्णन आपल्या एका लेखांत केलें आहे. त्यांतला उतारा इथें देतों :

" रेडिओ, टेलिव्हिजन व वर्तमानपत्रें यांशिवाय दुसरें एक प्रचाराचें साधन दिसलें तें म्हणजे जाहिरातींचे फलक. गांवाबाहेर मोठमोठ्या रस्त्यांवर मोक्याच्या ठिकाणीं मालांच्या जाहिरातीसाठीं जे मोठमोठाले फलक लावलेले होते त्यांत कांहीं कांहीं ठिकाणीं उमेदवाराची जाहिरात केलेली दिसत होती.

प्रत्यक्षांत प्रचार दिसत असलेलीं एवढींच हीं चिन्हें ! ना मिरवणुका, ना जाहीर सभा. अर्थात लहान लहान सभा कित्येक ठिकाणीं होत असतीलहि. परंतु घोषणा, मिरवणुका व सभा यांनीं दुमदुमलेलें गांव कांहीं या दौऱ्यांत दिसलें नाहीं. कोठेंहि पताका नाहींत, झेंडे नाहींत, चितारलेल्या भिंती नाहींत, त्यांवर चिकटविलेलीं पत्रकें नाहींत, रस्त्यांवर

लिहिलेलें नाहीं, रस्ताभर टांगलेले कापडाचे लांब लांब पट्टे नाहींत. आपल्या मानानें या निवडणुकांचा प्रचार फिका व मिळमिळीत वाटत होता.

**अमेरिकेचें मतदान कसें होतें**

"अमेरिकेंतील आमचा दौरा स्टडी मिशन इंटरनॅशनल या संस्थे-मार्फत आंखण्यांत आला होता. त्या संस्थेचे अध्यक्ष बयॉल व उपाध्यक्ष स्टॅन्डीश आमच्याबरोबर प्रवास करीत होते. सेंट पॉल शहरांतून परत येत असतां निवडणूक केंद्र पाहण्याची इच्छा आम्ही त्यांचेजवळ व्यक्त केली. आमचा बस ड्रायव्हर हा स्थानिक माणूस, परंतु तोहि एकदम गडबडला. असें केंद्र कोठें असेल हें त्यालाहि एकदम उमगेना. शाळांच्या इमारतींत मतदान केंद्र असतें. म्हणून जवळपास तो शाळा शोधूं लागला.

"थंडी असल्यामुळें सर्व इमारतींचे दरवाजे बंद होते. कामाची वेळ असल्यामुळें रस्त्यावर माणसें तुरळकच दिसत होतीं. हालचाल दिसत होती ती फक्त मोटारींची. दुपारचे चार वाजले होते, पण संध्याकाळचा अंधार पडला होता. निवडणूक केंद्र म्हणजे पोलिसांचा पहारा, थोड्या अंतरावर उमेदवारांचीं टेबलें, तेथें मतदारांचे नंबर काढून देण्यासाठीं उमेदवारांच्या कार्यकर्त्यांची धांदल, हें समीकरण येथें जमेना म्हणून केंद्र शोधून काढण्यास थोडे प्रयास पडले.

"शेवटीं एक शाळा दिसली. बाहेर चार, सहा मोटारी उभ्या होत्या. हेंच मतदान केंद्र म्हणून ड्रायव्हरनें सांगितल्यावर आम्ही बसमधून उतरलों व शाळेच्या इमारतींत प्रवेश केला. आंत आठदहा स्त्री-पुरुष मतदानासाठीं रांगेंत उभे होते, व तीनचार स्त्रिया केंद्राचें काम चालवीत होत्या.

"मतदार प्रथम एका फॉर्मवर आपली सही करतो. एका स्त्रीपाशीं प्रत्येक मतदाराचें कार्ड असतें. ती हवें तें कार्ड काढून त्यावरील व फॉर्म-

वरील सही तपासते. सही कार्डावरील सहीशीं जुळते आहे असें दिसलें, कीं ती स्त्री त्या मतदाराला शेजारच्या टेबलावरील स्त्रीकडे पाठवते. त्या ठिकाणीं मतदान करण्याच्या यंत्राचें एक छोटें 'मॉडेल' ठेवलेलें होतें. ती दुसरी स्त्री मतदाराला मत कसें द्यावयाचें तें 'मॉडेल'च्या साहाय्यानें समजावून सांगे व त्याला प्रत्यक्ष यंत्र जेथें ठेवलें होतें तिकडे रवाना करी. तेथें तिसरी स्त्री उभी होती व ती एकामागून एक मतदारांना यंत्राच्या दरवाजांतून आंत सोडीत होती.

**मतदानाचें यंत्र**

"हें मतदान करण्याचें यंत्र गोदरेजच्या कपाटाएवढें दिसलें. आंत गेल्यावर मतदार दरवाजावरील पडदा ओढून दरवाजा बंद करी. या क्रियेमुळें यंत्र सुरू होई. गव्हर्नर, सीनेटर, कॉंग्रेसमन व इतर स्थानिक अधिकारपदें या सर्वांची निवड करावयाची होती. हीं सर्व पदें व त्यासाठीं उभे राहिलेले उमेदवार यांचीं नांवें त्या यंत्रावर होतीं. मतदारानें मत देणें म्हणजे आपणास पाहिजे असेल त्या उमेदवारासाठीं ठेवलेला खिळा दाबणें. खिळा दाबला म्हणजे मतदान होत नाहीं. त्याला तें बदलावयाचें असल्यास तो खिळा पूर्ववत् करून दुसरा खिळा दाबतां येतो. अशा रीतीनें सर्व अधिकारपदांच्या उमेदवारांना मतें दिलीं व मतदाराचें समाधान झालें कीं तो पडदा उघडून बाहेर पडतो. ही पडदा उघडण्याची जी क्रिया आहे त्यानें प्रत्यक्ष मतदान नोंदविलें जात असे. जोंपर्यंत मतदार पडदा उघडीत नाहीं तोंपर्यंत त्याला आपलीं मतें पाहिजे तशीं बदलतां येतात.

"मतदानाची वेळ संपली म्हणजे केंद्रावरील प्रमुख अधिकारी त्या यंत्राला सील करतो. त्यावेळीं उमेदवारांना कशीं कशीं मतें पडलीं आहेत हें दृष्टोत्पत्तीस येतें.

"मतदान केंद्रावर काम करणाऱ्या या स्त्रिया सरकारी नोकर होत्या. आपल्याकडे उमेदवारांचे पोलिंग एजंट्स् जसे दिसतात तसे कोणीच

येथें नव्हते. केंद्रावर गर्दी झाली होती ती आमचीच. आम्ही २०-२२ जण तर मतदार व कर्मचारी यांची संख्या दहा बारा ! मतदान मात्र भरपूर झालें होतें.

" सर्वच केंद्रावर यंत्राच्या साहाय्यानें मतदान होत नाहीं. दूरदूरवर पसरलेल्या ज्या लहान लहान वस्त्या आहेत तेथें मतदान नेहमींप्रमाणें कागदावर खुणा करून होतें. आणि आश्चर्य हें कीं, अमेरिकेंत यंत्रयुग अगदीं शिगेला जरी पोहोंचलें असलें तरी या दूरवस्तीच्या मतदानपेट्या मतमोजणी-केंद्रावर येण्यास कांहीं दिवस लागतातच !

" परत येतांना शहरांत प्रचाराचा आणखी एक नमुना दिसला. हल्लीं दिव्यांच्या प्रकाशांत चमकणारे जे रंग निघाले आहेत त्या रंगांनीं वीत दीडवीत लांबीचे फलक रंगवून आकर्षक रीतीनें घराभोंवतींच्या हिरवळींत खोचलेले दिसले. फलकावर उमेदवाराचें नुसतें नांव, बाकी कांहीं नाहीं. कित्येक घरांवर असे फलक टांगलेले सुद्धा होते."

**निवडणुकीची धांदल सर्वत्र सारखीच**

आमच्या रॅडिसन हॉटेलमध्येंच पहिल्या मजल्यावरल्या दोन तीन दालनांत डेमॉक्रॅटिक पक्षाची मुख्य निवडणूक कचेरी होती. आपल्या-कडे कोणत्याहि पक्षाच्या निवडणूक कचेरींत संध्याकाळीं निवडणूक संपल्यावर मतदानाचे आंकडे येऊं लागले कीं जशी धांदल, धांवाधांव, चर्चा, टेलिफोनचें घणघणणें दिसतें तसेंच सर्व कांहीं इथें दिसत होतें. फरक इतकाच होता कीं इथली कचेरी एका अलिशान हॉटेलच्या दालनांत होती आणि अप-टु-डेट् बुटासुटांत वावरणारे गोरेपान तरुण-वृद्ध कार्यकर्ते हातांतल्या व्हिस्कीच्या ग्लासांतले अधूनमधून घोट घेत, चर्चा, बडबड, ओरडाआरड करीत होते. आणखी एक महत्त्वाचा फरक दिसत होता. तो म्हणजे वृत्तपत्रांचे बातमीदार पक्षाच्या कार्यकर्त्यांना किंवा उभ्या असलेल्या उमेदवारांना त्यांचीं मतें किंवा अंदाज विचारीत होतेच; पण त्यांच्यापैकीं कुणाला कांहीं घोषणा करायची असली कीं

लगेच टेलिव्हिजनचे कॅमेरे आणि प्रकाशझोत सरसावून घराघरांत टेलिव्हिजन सेट् लावून बसलेल्या आबालवृद्ध नागरिकांना त्या घोषणा दृश्यासह ऐकवीत होते.

रात्रीच्या जेवणानंतर आम्ही पक्षांच्या निवडणूक कचेऱ्या आणि मिन्यापोलीसमधल्या भव्य सरकारी इमारतींतल्या निवडणूक-केंद्राला भेट दिली. इथल्या सरकारी कचेऱ्या एका प्रचंड दगडी इमारतींत आहेत. तळमजल्यावरच निवडणुकीचें काम करणारे कारकून आणि टायपिस्ट मुली मिनिटा-मिनिटाला येणारे मतदानाचे तक्ते गोळा करण्यांत आणि मतांचा यंत्रावर हिशेब करण्यांत गुंतल्या होत्या. या इमारतींत वर जाण्याच्या जिन्याच्या पायथ्याशींच एक भव्य शिल्प होतें. ग्रीक शिल्पांत वरुणाचें प्रतीक दाखवितात तशा प्रकारच्या पीळदार शरिराच्या म्हाताऱ्याचें तें भव्योदात्त शिल्प होतें. मिसिसिपी नदी हें मिनेसोटा राज्याचें दैवत. तेव्हां 'फादर मिसिसिपी'चें तें शिल्प आहे म्हणतात. याच प्रदेशांतला 'हिआवाथा' वगैरे रेड इंडियन नायकावर काव्य लिहिणारा लाँगफेलो हा कवि; आणि अमेरिकेचा सर्वश्रेष्ठ विनोदी लेखक मार्क ट्वेनहि इथलाच. मिनेसोटा हें नांव मूळ रेड इंडियनांनींच दिलेलें असावें. 'हिआवाथा' काव्यांतल्या धबधब्याचें नांव 'मिनेहाहा' असें कांहींतरी आहे. मार्क ट्वेनचें निवासस्थान वगैरे आम्हांला कांहीं पाहावयाला मिळालें नाहीं. मोटारींतून जातांना कुठेंतरी एका हॉटेलाचें नांव मात्र 'मार्क ट्वेन हॉटेल' असें दिसल्याचें आठवतें.

**गव्हर्नर ॲन्डरसन म्हणतो 'थांबा!'**

आमच्या रॅडिसन हॉटेलांतल्या डेमॉक्रॅटिक पक्षाच्या कचेरींत कांहीं वेळ गप्पागोष्टी केल्यानंतर आम्ही लीमिंग्टन हॉटेलकडे आमचा मोर्चा वळवला. तिथें रिपब्लिकन पक्षाची कचेरी होती. तळमजल्यावरच्या भव्य दालनांतच ही कचेरी होती. धांदल, गडबड आमच्या हॉटेल-मधल्या डेमोक्रॅटिक कचेरींतल्यासारखीच चालू होती. इथले कार्यकर्ते

आणि पुढारी जरा अधिक श्रीमंत आणि वड्या घराण्यांतले दिसत होते. हॉटेलच्या दाराशीं मोटारी येतजात होत्या. त्यांतून झकपकीत पोशाखांतलीं तरुण, वृद्ध जोडपीं येत होतीं, उतरत होतीं, जात होतीं. इतक्यांत इतर मोटारींसारखीच एक मोटार आली आणि तिच्यांतून काळा सूट घातलेला एक मध्यमवयस्क गृहस्थ आणि त्याची पत्नी उतरून हॉटेलच्या पायऱ्या चढूं लागलीं. आम्ही दोघेचौघे तिथेंच गप्पा करीत उभे होतों. वर मान करून पाहतों तों दुपारींच आमची मुलाखत झाली होती ते गव्हर्नर अँडरसन आणि त्यांची पत्नी. आम्हांला पाहून ते थांबले आणि हंसून म्हणाले, "......मी जिंकणार कीं पडणार तें पाह्यला आलांत काय ? ..."

"छे, छे, गव्हर्नरसाहेब," आम्ही म्हणालों, "आतांच आम्ही चौकशी केली–तुमची शेंपन्नास मतांनीं सरशीच आहे. तुमचं अभिनंदन केलं पाहिजे !"

"थांबा, थांबा, घाई करूं नका," अँडरसन हंसून म्हणाले, "अजूनहि खेड्यापाड्यांतल्या मतदानाच्या पेट्या यायच्या आहेत. शेवटचा निर्णय दोन तीन दिवसांनीं कळेल !"

असें म्हणून ते आंत गेले. त्या दिवशीं रात्रीं शेवटचा तक्ता आल्यानंतर अँडरसन यांचे प्रतिपक्षी रोलव्हाग हे अट्ठावन मतांनीं पुढें होते.

**रिपब्लिकन नेत्यांची गंमत**

लीमिंग्टन हॉटेलांतल्या रिपब्लिकन पक्षाच्या कचेरींत गप्पागोष्टी करीत असतां एक गंमत झाली. छानदार कपडे केलेला, शुभ्र केंसांचा एक गमत्या म्हातारा आमच्याशीं गप्पा करीत होता. रिपब्लिकन पक्षाचा तो एक मोठा पुढारी होता असें आम्हांला नंतर कळलें. नेहरूंसंबंधीं बोलतां बोलतां तो गंमतीनें म्हणाला, "Has your Nehru learnt his lesson now ?" आम्ही सगळ्यांनीं हंसत हंसतच पण एकदम तडकावून त्याला म्हटलं, "होय, आमचे नेहरू चांगलाच धडा शिकले

असतील,—पण तुम्हां अमेरिकन लोकांना तुमचा धडा शिकायला जितकी जबरदस्त किंमत द्यावी लागली तितकी कांहीं नेहरूंना द्यावी लागलेली नाहीं ! "

म्हातारा आमच्याकडे डोळे मोठे करून पाहत एकदम उद्गारला, "म्हणजे ? "

**पर्ल हार्बरची आठवण**

"म्हणजे असं," मी म्हणालों, "प्रत्येक राष्ट्राला केव्हां ना केव्हां कांहींतरी धडा शिकावाच लागतो. गेल्या महायुद्धाच्या वेळीं तुम्ही अमेरिकन लोक इंग्लंड, फ्रान्सच्या बाजूनं एकदम युद्धांत पडायला कांकूं करीत होतां. तुमच्याशीं गोड गोड बोलणीं करतां करतां जपाननं एकदम तुमच्या पर्ल हार्बरवर हल्ला करून तुमचं अर्धेअधिक आरमार एका झट-क्यांत बुडवून टाकलं, तेव्हां तुमचे डोळे उघडले आणि एकदम लोकशाही-वादी युरोपियन राष्ट्रांच्या बाजूनें हिटलरच्या राक्षसी हुकुमशाहीविरुद्ध तुम्हीं युद्धांत उडी घेतली. खरं कीं नाहीं ? झालं तर ! चिनी कम्यु-निस्टांवर असाच नेहरूंनीं कांहीं काळ विश्वास टाकला. बारा चौदा हजार चौरस मैल आमचा प्रदेश गेल्यावर आतां ते धडा शिकले ! तुम्ही नाक वर करून विचारण्यासारखं कांहीं नाहीं त्यांत ! "

म्हातारा तसा सुस्वभावी होता. आमचा भडिमार ऐकून तो गदगदून हंसला, आणि खांद्यावर हात ठेवून म्हणाला, "छान, छान, चला आपण आपल्या दोन राष्ट्रांच्या दोस्तीचा टोस्ट घेऊं या ! "

असें म्हणून आमच्यासाठीं पेयाचे ग्लास त्यानें मागवले.

आमचा अलिप्ततावाद किंवा आमचा 'हिंदी-चिनी व हिंदी-रूसी भाई भाई' कम्युनिस्टधार्जिणेपणा अमेरिकी लोकांना,– विशेषत: राजकीय नेत्यांना आवडत नसूनहि आतां कशी तुमची खोड मोडली, असें चिनी आक्रमणानंतर म्हणण्याचा मोह सामान्य अमेरिकन माणसाला तर नाहींच पण मोठ्या मुत्सद्यांनाहि झालेला दिसला नाहीं. हा

रिपब्लिकन म्हातारा किंवा अॅरिझोनांत भेटलेला संपादक हे अपवादच म्हटले पाहिजेत. या विषयावर बोलतांना किंवा अमेरिकेचें लष्करी साहाय्य तुम्हांला ताबडतोब मिळणारच असें म्हणतांना मोठ्या संयमानें आणि सभ्यतेनेंच बहुतेक सामान्य नागरिक किंवा बडे मुत्सद्दी बोलत असत.

**मिन्यापोलीसमध्यें मराठी जेवण !**

मुंबईंत दादरला माझ्या शेजारींच राहणाऱ्या तामीळ कुटुंबांतला मुलगा कृष्णमणि ऊर्फ रामकृष्ण मिनेसोटा विद्यापीठांत केमिकल इंजिनियरिंगच्या डॉक्टोरेटसाठीं गेलीं दोन वर्षें अभ्यास करतो आहे. शाळेंत असल्यापासून तो इथल्या महाराष्ट्रीयांतच वावरतो आहे. तेव्हां मिन्यापोलीसमधल्या महाराष्ट्रीयांतलाच तो एक झाला आहे. मी मिन्यापोलीसमध्यें कधीं येणार तें त्याला माहीत असल्यामुळें रॅडिसन हॉटेलमध्यें आम्ही आलों त्या दिवशीं रात्रींच तो मला भेटायला आला. मला फार आनंद झाला. मुंबईचेच डॉ. नारायण नेरुरकर आणि त्यांची सुविद्य पत्नी सुनंदा मिन्यापोलीसमध्यें विद्यापीठांत काम करीत आहेत. त्यांचें दुसऱ्या दिवशीं रात्रीचें जेवणाचें आमंत्रण घेऊनच रामकृष्ण आला होता. डॉ. नेरुरकरांच्याच गाडींतून त्यांच्या घरीं मी गेलों. तिथें अगदीं अनपेक्षितपणें कांहीं मित्रांच्या गांठीभेटी झाल्या. जयप्रकाश नारायण यांचे कांहीं वर्षांपूर्वी चिटणीस असलेले श्री. शंकर हे दिल्लींत 'सांस्कृतिक स्वातंत्र्य समिती 'च्या कचेरींत श्री. प्रभाकर पाध्ये यांच्या-बरोबर काम करीत असत. तेव्हांपासून त्यांचा आणि माझा चांगलाच परिचय होता. ते दिल्लींत नाहींत; अमेरिकेच्या मिनेसोटा विद्यापीठांत अर्थशास्त्राच्या डॉक्टोरेटचा अभ्यास करीत आहेत; त्यांनीं इथें लग्न केलें आहे आणि त्यांची पत्नी माझे मुंबईचे स्नेही डॉ. रमाकांत राऊत यांची भाची विजया आहे, या गोष्टींचा मला कांहींच पत्ता नव्हता. डॉ. नेरुरकरांच्या दिवाणखान्यांत शंकर आणि त्यांच्या पत्नीला पाहून

मला आश्चर्याचा आणि आनंदाचा धक्काच बसला !

आणखीहि महाराष्ट्रीय मित्र तिथें जेवायला होते. डॉ. पद्माकर दीक्षित हे विद्यापीठांत अॅनाटॉमी शिकवतात. त्यांनीं सोळासतरा हजार डॉलर किंमतीचें एक टुमदार घर विद्यापीठाजवळच विकत घेतलें आहे. शंकर आणि विजया यांचा मिन्यापोलीसमध्यें वैदिक विधीनें त्यांनींच विवाह लावून दिला म्हणे ! मिन्यापोलीसमधल्या म्युच्युअल इन्श्युरन्समध्यें काम करणारे श्री. के. बी. देसाई आणि शेतजमिनीचें संशोधन करणारे श्री. हिरेकेरूर हेहि आमच्याबरोबर जेवायला होते. नेरुरकर पतिपत्नींचें प्रेमळ आदरातिथ्य, चवदार भारतीय जेवण आणि या तरुण मित्रमंडळींचा सहवास त्यामुळें मिन्यापोलीसमधली ती संध्याकाळ फार मजेंत गेली. जेवणानंतर परत फिरतांना दीक्षित यांनीं आपला छोटा बंगला दाखवला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी हॉटेलांत प्रातरुपाहार घेत बसलों होतों, इतक्यांत मला रामकृष्णाचा टेलिफोन आला——

" एक आनंदाची वातमी सांगायची आहे ! "

" काय बुवा ? " मी म्हणालों.

" अहो काल जेवतांना मिसेस हिरेकेरूर आपणाला वाढीत होत्या ना, त्यांच्या पोटांत आपण जेवण घेऊन गेल्यानंतर दुखूं लागलें—— रात्रींच त्या मिन्यापोलीस हॉस्पिटलांत बाळंत होऊन त्यांना मुलगा झाला ! "

" वा वा, छान आहे आपला पायगुण, " मी म्हणालों, " हिरेकेरूरांना माझं हार्दिक अभिनंदन ताबडतोब कळव ! "

**अमेरिकन पत्रकार आणि काश्मीर**

मिन्यापोलीसमधल्या तीन दिवसांच्या मुक्कामांत एके दिवशीं दुपारीं तिथल्या विद्यापीठाच्या ' स्कूल ऑफ् जर्न्यालिझम 'नें आम्हांला जेवण आणि भोजनोत्तर चर्चेकरितां बोलावलें होतें. त्या चर्चेचा वृत्तान्त


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्र[illegible]
अनुक्रम ३८५५७ दि: [illegible]

प्रश्नोत्तररूपानें मी एका लेखांत लिहिला होता. तीं प्रश्नोत्तरें पुढील-प्रमाणें :

**प्र** : भारतीय राजकारणाबद्दल तिथें असे बरेच गैरसमज असावेत. ते दूर करण्याचे प्रयत्न आपल्या सरकारचे तिथले प्रतिनिधि किंवा प्रचारखातें करीत नाहीं का ?

**उ.** : आपले प्रतिनिधि किंवा प्रचारखातें काय करतें, याची मला कल्पना नाहीं. पण सरकारी प्रवक्ते तोलून, मापून, जपून सर्व कांहीं बोलणार. वरिष्ठांचें मत बघून बोलायचें, नोकरी टिकवायची वगैरे बंधनामुळें, हे सरकारी प्रवक्ते अमेरिकेंतल्या वाटेल तें मनमोकळेपणानें बोलायला आणि ऐकायला तयार असलेल्या लोकांवर फारसा प्रभाव पाडूं शकत नसावे. आमच्यासारखे स्वतंत्र पत्रकार किंवा लेखक सडेतोड-पणें त्यांना चार शब्द ऐकवूं शकत होते. तें त्यांना पटत होतें आणि आवडतहि होतें.

**प्र.** : तें कसं काय ?

**उ.** : मिन्यापोलिस विद्यापीठाच्या 'स्कूल ऑफ जर्नालिझम्'नें आम्हांला दुपारच्या जेवणाकरितां आणि भोजनोत्तर चर्चेकरितां बोलाविलें होतें. विद्यापीठाचे प्राध्यापक, मिनेसोटा राज्यांतले चांगले चांगले पत्रकार, वृत्तविशारद वगैरे मेजवानीला आलेले होते. जेवणा-नंतर गप्पागोष्टींना चांगला रंग चढला होता. एका अमेरिकी पत्र-कारानें आम्हांला विचारलें, 'चीनशीं लढण्यांत तुम्हांला आतां सर्व लक्ष केंद्रित करावें लागणार आहे, तेव्हां काश्मीरबाबत पाकिस्तानशीं तुम्ही ताबडतोब तडजोड करून कां टाकीत नाहीं ?'

**प्र.** : या प्रश्नाला तुम्हीं काय उत्तर दिलें ?

**उ.** : आमच्यामध्यें बंगलोरच्या 'डेक्कन हेरल्ड' पत्राचे एक सह-संपादक मेनन या नांवाचेच होते. त्यांनीं अत्यंत मुद्देसूद आणि सडेतोड असें या प्रश्नाला उत्तर दिलें.

तुमचें नांव मेनन, तर माझें नांव निक्सन !

प्र. : ते काय म्हणाले ?

उ. : सुरुवातीला थोडीशी गंमत झाली. ते म्हणाले, ' माझें नांव मेनन आहे याबद्दल माफ करा !' तेव्हां तिथें विद्यापीठाच्या वृत्तपत्र-शिक्षणविभागाचे वयोवृद्ध अध्यक्ष बसलेले होते; ते आपले शुभ्र केंस मागें सारीत हंसून म्हणाले, 'त्याची तुम्ही मुळींच काळजी करूं नका–माझें नांव निक्सन आहे !'

प्र. : म्हणजे ?

उ. : म्हणजे असं कीं आयसेनहॉवर अमेरिकेचे अध्यक्ष होते तेव्हां उपाध्यक्ष असलेले निक्सन हे, कृष्ण मेनन ज्याप्रमाणें सर्वत्र अत्यंत अप्रिय आहेत तसेंच अमेरिकेंत अतिशय अप्रिय आहेत !

प्र. : अस्सं ?

उ. : 'तुम्ही शस्त्रास्त्रं देऊन पाकिस्तानला चढवून ठेवलं आहे,' असं ठणकावून मेनन म्हणाले, 'नेहरूंनीं सार्वमत घेऊं म्हणून दिलेलें आश्वासन आम्ही कां पाळीत नाहीं, असें पुन्हां पुन्हां विचारण्यांत येतें त्याला कांहीं अर्थ आहे का ? पंधरा वर्षांत तीन सार्वत्रिक निवडणुका भारतांत झाल्या, काश्मीरच्याहि प्रजेनें अमेरिकेचे पंचवीस कीं सव्वीस पत्रकार काश्मीरमध्यें उघडच्या डोळ्यांनीं पाहात असतां, अनिर्बंध वातावरणांत मतदान करून भारतांत कायमचें विलीन होण्याचें ठरविलें आणि आता सार्वमत आणखी कसलें घ्यायचें ? यूनोच्या ठरावानेंहि पाकिस्ताननें आपल्या आक्रमक फौजा मागें घेतल्यावर सार्वमत घेण्यांत यावें असें सांगितलें आहे. पंधरा वर्षें होऊन गेलीं, पाकिस्ताननें आपलें सैन्य काश्मीरच्या पाकव्याप्त मुलखांतून मागें घेतलें आहे काय ? आणि पुन्हां, ज्या देशांत गेल्या पंधरा वर्षांत एकहि निवडणूक झाली नाहीं, तीन पंतप्रधानांचे खून पडले, आणि आज लष्करी हुकूमशाही चालू आहे, त्यानें लोकशाही पद्धतीचें सार्वमत काश्मिरांत घेण्यांत यावें म्हणून

निर्लज्ज मागणी करावी, नि तुम्ही ती ऐकून घ्यावी याचा अर्थ काय ? '


**प्र.** : छान ! ——

**उ.** : आमच्या मेननने व्यवस्थितपणें मांडलेले मुद्दे ऐकून ते अमेरिकन पत्रकार आणि प्राध्यापक खूष झाले. 'इतकी व्यवस्थित तुमची बाजू आम्हांला इथें कुणी सांगतच नाहीं.' त्यांच्यापैकीं कांहीं म्हणाले.

## सुंदर प्रार्थनामंदिरें

मिन्यापोलीसमधलीं बरीचशीं ख्रिस्ती प्रार्थनामंदिरें फारच भव्य आणि नॉर्वे-स्वीडनमधल्या मंदिरासारखीं अगदीं अद्यावत् शिल्पपद्धतीनें बांधलेलीं आहेत. एके दिवशीं दुपारीं तीं पाहण्याचा कार्यक्रम होता. सेंट ओलाफ् कॅथॉलिक चर्च, सेंट्रल लूथरन चर्च, हेनेपिन् ॲव्हेन्यू मेथॉडिस्ट चर्च, इस्रायली लोकांचे टेंपल वगैरे मंदिरें या भेटींत आम्ही पाहिलीं. या मंदिरांचा उल्लेखनीय विशेष म्हणजे चर्चच्या प्रेरणेनें अनेक समाजसेवेच्या चळवळी चालू असतात. या चळवळींच्या केंद्रासाठीं अद्यावत् सोयीं असलेलीं प्रशस्त दालनें या मंदिरांच्या आसपास राखून ठेवलेलीं दिसलीं. एका चर्चच्या असल्या दालनांत गरिबांना फुकट वांटण्यासाठीं बायकांनीं विणलेले मोजे, स्वेटर वगैरे व्यवस्थित मांडून ठेवलेले दिसले. दुसऱ्या एका चर्चच्या रंगमंदिरासारख्या दिसणाऱ्या एका अद्यावत् दालनांत मुलामुलींचा 'कॉयर' किंवा प्रार्थनासंगीत म्हणणारा गायकवृंद संगीताची तालीम करीत असलेला दिसला.

मिन्यापोलीसमधून आयोवा या कृषिप्रधान राज्याच्या आयोवा सिटी या मुख्य शहरांत जायला आम्ही निघालों.



# : ९ : आयोवा

आयोवांत चक् आणि डॉटीच्या घरीं--

आयोवा राज्याची नवी राजधानी डेमॉयने. मिन्यापोलीसहून आम्ही निघालों तें कान्सासला जाणारें विमान आम्हांला डेमॉयनेला बदलावें लागलें. आयोवाची जुनी राजधानी आयोवा सिटी येथें आम्हांला जायचें होतें. आयोवा राज्य हें गहूं, मका इत्यादि धान्यांचें अमाप पीक देणारें एक अफाट शेतच आहे म्हणतात. उतरण्यापूर्वी आयोवा सिटीवर आमचें विमान घिरट्या घालूं लागलें तेव्हां क्षितिजापर्यंत लांबच लांब पसरलेले काळ्यापिवळ्या, तांबूसकाळ्या मातीचे लहानमोठे शेतांचे चौकोन, उंच छपरांचीं शेतजमिनीवरलीं घरें आणि मनोऱ्यासारखे उंचच उंच धान्य सांठवून ठेवण्याचे 'सायलो' जिकडे तिकडे आम्हांला दिसूं लागले. विमानतळावर आमची 'यजमान' मंडळी-कुणी सहकुटुंब तर कुणी एकटेच मोटारी घेऊन आपापल्या पाहुण्यांना घरीं घेऊन जायला तिथें येऊन वाटच पाहत उभी होती. आयोवा सिटींतल्या नागरिकांनीं 'स्टडी मिशन इंटरनॅशनल'ला आग्रह करून तुमच्या पाहुण्यांची उतरण्याची सोय इथल्या हॉटेलांत न करतां आमच्या घरीं करा अशी विनंति केली होती. दोनतीन दिवस अमेरिकन कुटुंबांत रहाण्याचा अनुभव आम्हांला मिळावा म्हणून 'स्ट. मि. इं.'नेंहि ती विनंति मोठ्या आनंदानें मान्य केली होती. दहाअकरा कुटुंबांत मिळून आम्हां वीसबावीस जणांची सोय केली होती. माझे आणि जयपूरच्या 'राष्ट्रदूत' या हिंदी पत्राचे दिनेश खरेजी यांचे यजमान मि. चार्लस् गुड् हे होते. बयॉल आणि स्टॅन्डीश यांनीं आमच्या यजमानांशीं आमची ओळख करून दिली. पस्तिशी–चाळिशींतला, चांगला उंच, धिप्पाड गुड् नांवाप्रमाणें खरोखरच फार चांगला आणि सुस्वभावी होता. आम्ही नको नको म्हणत होतों इतक्यांत दोघांच्याहि अवजड बॅगा दोन हातांत

घेऊन तो आपल्या मोटारीकडे गेला. आयोवा सिटीपासून ८–१० मैलांवर छोटचाशा आयोवा नदीच्या कांठीं एक नवी वसाहत होत आहे तिथें एक वर्षापूर्वींच तीस हजार डॉलर खर्च करून त्यानें बांधलेलें त्याचें टुमदार घर होतें. या विभागाचें नांव 'रिव्हर हाइट्स्.' नदीच्या कांठीं उंचसखल डोंगराळ भाग आहे, आणि अधल्यामधल्या टेकडचांवर लहानमोठे बंगले लोकांनीं बांधले आहेत. 'फेअर व्ह्यू नॉल' या टेकाडावर चक् गुडचा बंगला होता. वायकोला तो 'डॉटी' म्हणून हांक मारी. वायको त्याला 'चक्' म्हणे.

**गुड् कुटुंब**

अमेरिकी राहणीचें मान लक्षांत घेतां तीस हजार डॉलरमध्यें खालीं दोनतीन, वर दोनतीन प्रशस्त दालनें, बाजूला मोटार गराज आणि सर्व कांहीं शीतोष्णनियंत्रित म्हणजे फारच स्वस्तांत-तीस हजार रुपयांतच घर झालें म्हटलें पाहिजे. तुझें घर फार स्वस्तांत झालें, मी गुडला म्हटलें. तें कसें काय, त्यानें हंसून विचारलें.

'हें पहा,' मी म्हणालों, 'तुम्हीं जिथें डॉलर खर्च करतां तिथें फार फार तर आम्ही रुपया खर्च करूं शकतों, आणि आमच्या मुंबई-पुण्यांत तीस हजार रुपयांत नदीकांठच्या इतक्या सुंदर जागीं इतकें सुंदर घर मुळींच बांधतां येणार नाहीं!'

'तुमच्यासारख्या प्रोफेसरालाहि?' गुडनें विचारलें.

'तुमच्याकडे प्रोफेसरांचा पगार सर्वसाधारणपणें काय असतो?' मी चौकशी केली.

'प्रोफेसराला कमींत कमी दहा हजार डॉलर वर्षाचे' तो म्हणाला, 'लेक्चररला सात हजार.'

'म्हणजे आमच्या देशाची आर्थिक पातळी पाहतां आमच्याकडल्या प्रोफेसराला वर्षाचे दहा हजार रुपये तरी मिळायला हवेत,' मी म्हणालों, 'त्याच्या निम्मे जेमतेम मिळतात. तेव्हां घरें, मोटारींची गोष्ट प्रोफेसर

लोक करीत नाहींत ! ’

चक् गुड् आयोवा सिटींतल्या फ्रोझन फुड कंपनींत मॅनेजर म्हणून काम करतो. डॉटीचें आणि त्याचें कॉलेजमध्येंच प्रेम जमून शिकत असतांना वयाच्या बावीसतेविसाव्या वर्षींच लग्न झालें. डॉटी समाजशास्त्र करून एम्. ए. झाली. चक् प्राणिशास्त्र विषयावर प्रबंध लिहून एम्. ए. झाला. शिकत असतांना दोघेंहि काम करून पैसे मिळवीत होतीं. मासेमारीचें संशोधन करण्याकरितां एक दोन वर्ष चक् यूरोपांत हॉलंडमध्यें होता. त्यांची दहाबारा वर्षांची असलेली पहिली मुलगी मार्शा तिथेंच झाली. आणखी दोन मुलें त्यांना आहेत. मुलगा पांच वर्षांचा जेफ्, आणि अडीचतीन वर्षांची मलगी लेस्ली.

**बेबी सिटींग करणारी विद्यार्थिनी**

डॉटी माझ्याकडे तक्रार करीत होती,—शिकत असतांना मी काम करून पैसे मिळवीत होतें, आणि चक् आतां मला बाहेर काम करूं देत नाहीं !

‘ हें बघ डॉटी, ’ चक् म्हणाला, ‘ पाहुण्यांना थापा मारूं नकोस. तुला मी काम करूं देत नाहीं हें खरं आहे. पण त्याचा अर्थ बायकांनीं बाहेर कामें करून पैसे मिळवूं नयेत अशा मताचा मी आहे असं तूं पाहुण्यांना भासवूं नकोस ! आपल्या घरांत नोकर नाहीं. घरांतलं सर्व काम नि तीन मुलांचा सांभाळसंगोपन करणं हें माझ्या मतें कोणत्याहि स्त्रीला भरपूर पगार मिळवण्याइतकं भरपूर काम आहे ! ’

चक्चें म्हणणें अगदीं खरें होतें. दोनतीन दिवस मी प्रत्यक्ष डॉटी किती काम करीत होती तें पहात होतों. सकाळीं साडेपांच-सहाला अलार्म घडयाळ लावून ती उठत असे. तीन मुलांचा आणि आमचा चौघांचा ब्रेकफास्ट ती तयार करी, मुलांच्या आंघोळी, स्नानगृहें साफ करणें, खालच्या मजल्यावरल्या आम्हां पाहुण्यांच्या दोन खोल्या, मोठा हॉल, वरच्या स्वतःच्या खोल्या आणि हॉल व्यवस्थित ठेवणें, मुलांचें दूधपाणी,

रात्रींचें जेवण सर्व कांहीं तीच करी. फक्त दोनदां कांहीं तासांकरितां दोन मुली तिच्याकडे काम करायला आलेल्या मी पाहिल्या. आम्ही आलों त्या दिवशीं संध्याकाळीं आमच्यासाठीं खालच्या दोन खोल्या लावण्याकरितां आणि जेवणानंतर डॉटीला आमच्याबरोबर गप्पा करीत बसायचें होतें म्हणून उष्टया वशा वगैरे गरम पाण्यानें धुऊन ठेवण्याकरितां एक चौदापंधरा वर्षांची मुलगी दीडदोन तास आली होती. दीडदोन तासांचें तिला दीडदोन डॉलर द्यावे लागले असतील. आणखी एका रात्रीं ९ ते १२ कॉलेजांत शिकणारी एक केट् नांवाची मुलगी 'बेबी सिटिंग' करितां, म्हणजे जेफ् आणि लेस्ली यांना आईबाप सिनेमा पाहण्याकरितां गेले असतां सांभाळण्याकरितां आली होती.

**केटचें स्वावलंबन**

जेफ् आणि लेस्ली झोंपली होतीं, त्यामुळें केटला फारसें काम नव्हतेंच; पाहुण्यांना कांहीं कॉफी वगैरे पाहिजे असल्यास करून दे म्हणून केटला डॉटीनें जातां जातां बजावलें होतें. अभ्यासाचीं एकदोन पुस्तकें केट बरोबर घेऊन आलीं होतीं. मी हिंदुस्थानांतून आलों आहे, हें कळल्यावर माझ्याशीं बराच वेळ ती गप्पा करीत होती. तिच्या वडिलांची आयोवा सिटीपासून ९०–१०० मैलांवर असलेल्या गांवीं शेती होती. स्वावलंबनानें शिक्षण घेण्याकरितां केट आयोवा सिटींत आली होती. या वर्षी ती एम्. ए. ला बसणार होती. कुठें 'बेबी सिटींग' कर, कुठें एखादी शिकवणी कर, कधीं गर्दीच्या दिवशीं हॉटेलांत तात्पुरती वेट्रेस म्हणून काम कर, असें करून ती पुरेसे पैसे मिळवीत होती.

'हे गुड् कुटुंबीय फार चांगले लोक आहेत,' ती मला सांगत होती, 'मला नेहेमीं कांहीं ना कांहीं काम देतात.'

'तूं राहातेस कुठें?' मी विचारलें.

'विद्यापीठाजवळच एका कुटुंबांत पेइंग गेस्ट म्हणून राहतें मी', ती म्हणाली.

'आतां रात्रीं साडेअकरा बारा होतील चक् डॉटी परत येईपर्यंत,' मी म्हणालों, 'तूं घरीं जाणार कशी ?' सिनेमाहून आल्यानंतर ती मंडळी आपल्या मोटारींतून मला माझ्या घरीं नेऊन पोंहोंचवतात.' तिनें उत्तर दिलें.

**नोकर ठेवणें परवडत नाहीं**

अमेरिकेंत नोकर ठेवणें सर्वसामान्य माणसाला मुळींच परवडत नाहीं. कांहीं तासांपुरतें कुणाला बोलावलें तरी ताशीं दीड-दोन डॉलर द्यावे लागतात. तेव्हां बहुतेक कामें डॉटीसारख्या अमेरिकन गृहिणी स्वतः करतात यांत नवल नाहीं. अर्थात् सैपाकघर सर्व प्रकारच्या विजेच्या उपकरणांनीं सुसज्ज असतें. बरेचसे खाण्याचे पदार्थ, भाज्या, फळें, दूध, फळांचे रस उत्कृष्ट प्रकारचे हवाबंद किंवा गोठवलेले डब्यांतून मिळतात. कपबश्या विसळण्याचीं, कपडे धुण्याचीं, झाडू मारण्याचीं यंत्रें असतात, हें मात्र खरें आहे. तरी पण स्वतःच्या हातांनीं काम खूप करावें लागतें.

आयोवा सिटींतले आमचे सर्व कार्यक्रम आयोवा स्टेट युनिव्हर्सिटीच्या वृत्तपत्रव्यवसाय विभागातर्फे आंखण्यांत आले होते. त्यांची सुसज्ज बस आमच्या सेवेला सदैव तयार असे. आयोवा सिटीपासून तीस मैलांवर 'सेडार रॅपिड्स्' हें गांव आहे. तिथला कॉलिन्सचा इलेक्ट्रॉनिकचा प्रचंड कारखाना जगद्विख्यात आहे. जगांत म्हणे असें एकहि विमान नाहीं कीं ज्यांत एखादा दुसरा तरी लहानसा भाग कॉलिन्स इलेक्ट्रॉनिकचा नाहीं ! विशेषतः विमानांत बिनतारी संदेश घेणारीं जीं यंत्रें असतात त्यांतले महत्त्वाचे सूक्ष्म भाग या कारखान्यांत तयार होतात. आमची एक सबंध सकाळ हा कारखाना पहाण्यांत गेली.

**विख्यात शास्त्रज्ञ व्हॅन.ॲलन यांची भेट**

दुसऱ्या दिवशीं सकाळीं युनिव्हर्सिटीच्या संशोधन विभागाचे प्रमुख जगद्विख्यात शास्त्रज्ञ व्हॅन् ॲलेन यांच्याशीं आमची भेट ठरली होती.

पृथ्वीभोंवतालच्या वातावरणांत एक कसला तरी पट्टा आहे त्याचा व्हॅन अॅलेन यांनीं शोध लावला, म्हणून विज्ञानक्षेत्रांत तो 'व्हॅन् अॅलेन बेल्ट' या नांवानें प्रसिद्ध आहे. अमेरिका अंतराळांत जे उपग्रह सोडते त्यापैकीं कांहीं व्हॅन् अॅलेन यांच्या प्रयोगशाळेंत तयार होतात. आम्ही सकाळीं संशोधन विभागाच्या इमारतीकडे गेलों तेव्हां दरवाजापाशींच व्हॅन अॅलेन उभे होते. आमच्याशीं हंसतमुखानें हस्तांदोलन करून ते आम्हांला आपल्या प्रयोगशाळेंत घेऊन गेले. त्यांचें नांव माहीत नसतां त्यांच्याशीं जर कुणी बोलूं लागला तर त्यांचा नम्रपणा आणि साधेपणा पाहून आपण एका विख्यात शास्त्रज्ञाशीं बोलत आहोंत, हें त्याला सांगूनसुद्धां खरें वाटणार नाहीं. आम्ही त्यांना अनेक प्रश्न विचारीत होतों आणि ते मोकळेपणानें हंसत हंसत उत्तरें देत होते. लवकरच अंतराळांत पाठविण्यासाठीं त्यांच्या प्रयोगशाळेंत तयार होत असलेला एक उपग्रह ते आम्हांला दाखवीत होते. आम्ही गर्दी करून पहात होतों, आणि त्यांतले कांहीं सूक्ष्म भाग ते आम्हांला समजावून सांगत होते. माझ्याजवळच आमचा मिस्किल अमेरिकन मित्र स्टॅन्डीश उभा होता. मला हळूंच कोपरानें डिवचून तो पुटपुटला, 'कम्युनिस्ट रशियांत तुम्हाला असल्या उपग्रहाची इतकी सूक्ष्म माहिती कुणी देईल काय ?— आम्ही अमेरिकन लोक भांडवलदार—साम्राज्यवादी; तेव्हां आम्ही गरीब बापडे सर्व कांहीं सांगतों ! होय कीं नाही ? '

**आयोवा विद्यापीठांतलें नाट्यशिक्षण**

त्या दिवशीं संध्याकाळीं 'इकॉनॉमी प्रिंटिंग कंपनी' या आयोवांतल्या छपाई काम करणाऱ्या मोठ्या कंपनीचे प्रेसिडेंट मि. बायवॉटर्स यांनीं आपल्या बंगल्यावर आम्हां सर्व मंडळींना आमच्या यजमान कुटुंबांसह संध्याकाळीं मेजवानीला बोलावलें होतें. त्यांचा छोटासा सुंदर बंगला जुन्या वसाहतकालीन वास्तुकलेचा एक चांगला नमुना होता.

चक् गुडच्या घरासमोरच नदीच्या पलीकडल्या कांठावर आयोवा

विद्यापीठाच्या नाट्यविभागाचे वयोवृद्ध प्रमुख प्रोफेसर क्ले हार्शबर्गर यांचें घर होतें. मला रंगभूमि, नाटकें यांची विशेष आस्था असलेली पाहून चक् आणि डॉटीनें त्यांना आणि मिसेस हार्शबर्गर यांना एके दिवशीं दुपारीं चहाला बोलावलें. मिसेस हार्शबर्गर आयोवांतल्या महिलांच्या एका मासिकांत नियमितपणें लेख लिहितात. युनिव्हर्सिटीचा नाट्यविभाग पहाण्याची मला फार इच्छा होती. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ९ वाजतां प्रो. हार्शबर्गर यांनीं मला व नाट्याची आस्था असलेले माझे गुजराती लेखक मित्र जयंती दलाल आणि गुलाबदास ब्रोकर यांना नाट्यविभाग पाहण्यासाठीं आमंत्रण दिलें.

जीवनांत आणि नाटकांत शब्दाला,—वाणीला विशेष महत्त्व असल्या-मुळें युनिव्हर्सिटीच्या या विभागाचें नांव 'डिपार्टमेंट ऑफ स्पीच् अॅन्ड ड्रॅमॅटिक आर्ट' असें आहे. युनिव्हर्सिटीचें एक भव्य, सुंदर रंगमंदिर आहे. या मंदिरांत जुन्या ग्रीक नाटकांपासून तों शेक्सपियर, इब्सेन यांच्या नाटकांपर्यंत नव्हे तर अगदीं अलिकडल्या आन्हुई, बेकेट्, आयो-नेस्को यांच्या नवनाट्य—ननाट्यापर्यंतचीं सर्व प्रकारचीं दहापंधरा नाटकें युनिव्हर्सिटीच्या या विभागाचें विद्यार्थी दर वर्षी करून दाखवतात. या सर्व नाटकांची तिकिटें हां हां म्हणतां दोनचार महिने आधींच संपून जातात. या विभागातर्फे बी. ए., एम. ए., पीएच. डी. पर्यंतच्या पदव्या दिल्या जातात. रंगभूषा, वेषभूषा, नेपथ्य, प्रकाशयोजना, अभिनय, दिग्दर्शन, निर्मिती इत्यादि विषयांचे व्यवस्थित अभ्यासक्रम आहेत. उच्च पदवीसाठी सबंध नाटक कित्येक महिने परिश्रम करून बसवावें लागतें, आणि प्रेक्षकांबरोबरच परीक्षकांसमोर त्याचा प्रयोग करून दाखवावा लागतो. दोनतीन तास आमच्याबरोबर हिंडून हार्शबर्गर यांनीं आम्हांला निरनिराळीं खातीं दाखविली. कुठें विद्यार्थी-विद्यार्थिनी नाटकाची तालीम करीत होत्या, तर कुठें नव्या प्रकारच्या नेपथ्य-रचनेचे धडे दिले जात होते, कुठें दिग्दर्शनाच्या निरनिराळ्या प्रकारां-

संबंधीं विद्यार्थ्यांसमोर प्राध्यापक व्याख्यान देत होते, तर कुठें विद्यार्थी पडदे रंगवीत होते. रेडिओ आणि टेलिव्हिजनवर बोलण्याचे किंवा नाट्यप्रयोग करण्याचे पाठहि त्या त्या विभागांत दिलें जात होते.

**विवाहित विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठीं वसतिगृहें**

युनिव्हर्सिटीचा पत्रव्यवसाय–विभागहि आम्ही पाहिला. एक मोठा छापखाना आहे. संपादकीय कचेऱ्या आहेत. या विभागातर्फे 'आयोवा सिटी प्रेस सिटिझन्' नांवाचें दैनिक पत्र काढण्यांत येतें. तें आयोवांत अतिशय लोकप्रिय असून त्याचा खपहि मोठा आहे. बातम्यांचें संपादन, अग्रलेखलेखन वगैरे वृत्तपत्रव्यवसायाच्या सर्व बाजूंचें इथें नुसतें पुस्तकीच नव्हे तर व्यावहारिक शिक्षणहि देण्यांत येतें. विद्यार्थ्यांना रिपोर्टर म्हणून बातम्या आणाव्या लागतात, त्यांचें संपादन करावें लागतें, रात्रपाळ्या कराव्या लागतात, सर्व कांहीं प्रत्यक्ष करावें लागतें.

पुण्यासारखें किंवा ऑक्सफर्ड, केंब्रिजसारखें आयोवा सिटी हें मुख्यत्वें-करून विद्यापीठाचेंच गांव आहे. स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ आयोवाचा 'कॅम्पस्' किंवा क्षेत्र चारशें एकरांचें होतें, तें वाढत वाढत बाराशें एकरांइतकें पसरलें आहे. वार्षिक अंदाजपत्रक पांच-साडेपांच कोटि डॉलरांचें आहे. निरनिराळ्या शाखांच्या विद्यार्थ्यांची संख्या बारा हजारपर्यंत आहे. चक्च्या गाडींतून आयोवा सिटी पहात फिरत असतां युनिव्हर्सिटीच्या आसपास झोपडीवजा शेकडों चिमुकल्या घरांच्या कित्येक रांगा दिसल्या. 'हें काय ?' म्हणून मी विचारलें, तेव्हां चक म्हणाला, 'ही विद्यार्थी-विद्यार्थिनींची वसतिगृहें-आहेत.'

'आं !' मी उद्गारलों, 'मग घरांमागल्या मोकळ्या जागेंतल्या तारांवर लहान मुलांच्या चड्ड्या नि झबलीं सुकत घातलेलीं दिसताहेत तें कसं काय ?'

'अरे हो, मी सांगायला विसरलोंच,' चक् हंसून म्हणाला, 'हीं विवाहित विद्यार्थी-विद्यार्थिनींची वसतिगृहें आहेत. युद्धकाळांत लष्करी

अधिकाऱ्यांसाठीं या बराकी बांधल्या होत्या. युद्ध संपल्यानंतर थोडी डागडुजी करून त्यांचीं वसतिगृहें करण्यांत आलीं. लग्न करून अभ्यास चांगला होतो असं अलीकडे आमच्या पोरापोरींना वाटूं लागलंय्— आम्हीहि त्यांना उत्तेजन देतों!'

**पिझ्झाचें जेवण**

रविवारीं सकाळीं जेफ् आणि लेस्लीला घेऊन चक् चर्चला जायला निघाला. मार्शाला ताप आला होता म्हणून डॉटी घरींच राहणार होती. तासभर प्रार्थना, प्रवचन वगैरे चालेल,—यायचंय का, म्हणून त्यानें विचारलें तेव्हां मी त्याच्याबरोबर गेलों. पण चर्चजवळच माझा मुंबईचा विद्यार्थीमित्र श्रीधरन् पीएच्. डी. करायला आयोवा विद्यापीठांत आला आहे तो भेटला. एक तासानंतर चर्चजवळ पुन्हां भेटायचें ठरवून—श्रीधरन्-बरोबर मी आयोवा सिटींतल्या ड्यूब्यूक विभागांत तो राहत होता तिथें गेलों. त्याच्याबरोबर आणखी एक कर्नाटकी विद्यार्थी रहात होता. त्यांच्याबरोबर चहापाणी करून मी परत फिरलों. दोघांनाहि हिंदुस्थान सोडून दोनतीन महिनेच झाले होते. 'हिंदुस्थानांतून तुमच्यासारखे कुणी आलेले पाहिले कीं घराची एकदम आठवण होते, आणि एकदम हिंदुस्थानांत पळून यावंसं वाटतं.' दोघेहि एकदम म्हणाले.

दुपारचें जेवण डॉटनें आयोवा सिटींतल्या एका इटालियन हॉटेलांत घ्यायचें ठरविलें होतें. अमेरिकेंत सध्यां इटालियन 'पिझ्झा' हें तव्यावर परोठ्यासारखें परतलेलें भाज्या, मांस, मासे वगैरे मिसळलेलें विशेष खाद्य खाण्याचें वेड फार पसरलें आहे. 'पाहुण्यांना पिझ्झा खायला घातल्याशिवाय परत पाठविणं मला मुळींच बरं वाटणार नाहीं!' डॉट म्हणाली.

**शेतकरी स्मिथच्या शेतीवर**

'आयोवा राज्यांत यायचें आणि एखादी शेती पाह्यल्याशिवाय जायचें म्हणजे आग्ऱ्याला जाऊन ताजमहाल पाहिल्याशिवाय परत

फिरण्यासारखें आहे.', माझे राजस्थानी-मित्र खरेजी म्हणाले. 'खरंच, आपण एखादा तरी फार्म पाह्यलाच पाहिजे.' मी म्हणालों.

आमची इच्छा आम्ही चक्च्या कानावर घातल्याबरोबर तो एकदम म्हणाला, 'हात्तिच्या ! आज संध्याकाळींच तुम्ही फार्म पहा. आमच्या फॅक्टरीच्या कॅन्टीनची मुख्य सैंपाकीणबाई मिसेस फ्लावरी स्मिथ इथून पंधरा मैल असलेल्या आपल्या नवऱ्याच्या फार्मवरून दररोज कामाला येते. तिला आज सांगून ठेवतों. संध्याकाळीं तिच्या नवऱ्याच्या फार्मवर मी तुम्हांला घेऊन जातों.'

संध्याकाळीं स्मिथच्या फार्मवर सोडून चक् कुठेंतरी कामाला निघून गेला. दोन तासांनीं आम्हांला न्यायला तो आणि डॉट् येणार होतीं.

ऐंशी एकरांचा फार्म होता. मक्याच्या कणसांनीं भरलेले मोठमोठे मनोऱ्यासारखे दोन 'सायलो' होते. शेंदोनशें डुकरें होतीं. सायलोमध्यें गरम हवा सोडून मका सुकवतात, आणि मग त्याचें पीठ करतात म्हणे. 'माझा फार्म कसला पाहतां ?' पाईपचे झुरके घेत, आणि आपल्या जाड्याभरड्या निळ्या पँटवरली आणि चट्ट्यापट्ट्याच्या तंग शर्ट-वरली धूळ झाडीत स्मिथ म्हणाला, 'माझा फार्म फक्त ऐंशी एकरांचा आहे. आमच्याकडे कमींत कमी एकशें साठ एकरांचा फार्म पाहिजे, तर सरकारी सहाय्य मिळतें. मला शेतीची आवड म्हणून हा दुसऱ्याचा फार्म मी कसायला भाड्यानं घेतलाय्. मला शहरी जीवन मुळींच आवडत नाहीं. मला या मातींत काम करणं फार आवडतं. आमच्या मुलांना नि बायकोला शहरी चोचल्याशिवाय चैन पडत नाहीं, म्हणून आमची म्हातारी रोज पंधरा मैल फॅक्टरींतल्या कॅन्टीनमध्यें सैंपाक करायला शहरांत जाते !'

फार्मच्या एका कोपऱ्यांत जुनाटसें दिसणारें स्मिथचें घर होतें. पण आंतून तें एअर कन्डिशन्ड होतें ! दाराशीं एक जुनाट पिवळ्या रंगाचीं, आणि दोन साधारण बऱ्यापैकीं निळ्यापांढऱ्या मोटारी उभ्या होत्या.

पिवळी स्मिथची स्वत:ची फार्मवर वापरण्यासाठीं. निळी मोटार मिसेस स्मिथची-तिच्यांतून ती रोज कॅन्टीनला जाते. घरांत एका कोचावर एक वीसबावीस वर्षाचा चांगला दांडगा दिसणारा मळकट कपड्यांतला मुलगा हातपाय पोटाशीं घेऊन सुस्त झोंपला होता. स्मिथचा हा मुलगा आपली पांढरी मोटार घेऊन रोज आयोवा सिटींत एका मोठ्या गॅरेज-मध्यें मोटारी घुण्याचें काम करण्याकरितां जातो. तो दमून भागून नुकताच आला होता, आणि कोचावर पडला होता. दररोज आठ तास कामाचे त्याला सोळा डॉलर मिळतात.

**लिंडरमान फार्म आणि मध-पावाचा पाहुणचार**

तुम्हांला एक खराखुरा फार्म दाखवतों म्हणून आपल्या मोटारींत बसवून कांहीं मैलांवर असलेल्या पांचशें एकरांच्या लिंडरमान फार्मवर आम्हांला स्मिथ घेऊन गेला. या लिंडरमान मंडळींच्या फार्मवर डुकरांच्या गोठ्यांच्या रांगाच्या रांगा होत्या. दाराशीं चारपांच नव्या कोऱ्या सुंदर मोटारी उभ्या असलेला म्हाताऱ्या लिंडरमानचा एका टेकाडा-वरला प्रशस्त बंगला स्मिथनें आम्हांला दुरून दाखवला. डुकरांना खाणें घालायची संध्याकाळची वेळ झाली होती. लिंडरमानचा पंचवीस वर्षांचा धाकटा मुलगा ट्रॅक्टरसारख्या एका दाणागोटा भरलेल्या गाडींत बसून डुकरांच्या प्रत्येक गोठ्यांत गाडीच्या मागल्या तळांतून दाणा-गोट्याचा ठराविक वांटा यंत्रानें फर्रकन् सोडीत पुढें पुढें जात होता. लिंडरमानची सून—त्या मुलाची बायको—दोन हातांत दोन बादल्या घेऊन कोंबड्यांच्या खुराड्यांत पाणी घालीत फिरत होती. कुठें प्रचंड ट्रॅक्टर तर कुठें मोठमोठीं शेतीचीं अवजारें इतस्तत: धुळींत पडलेलीं दिसत होतीं. लिंडरमानचा फार्म पाहून आम्ही स्मिथच्या घरीं परत आलों. तोंपर्यंत आम्हांला नेण्याकरितां चक् आणि डॉट् तिथें आलीं होतीं.

जगांत सर्वत्र अनुभवाला येणारें जातिवंत शेतकऱ्याचें आदरातिथ्य या अमेरिकी शेतकऱ्याच्या घरींहि अनुभवाला आलेंच. कांहींतरी खाल्ल्या-

शिवाय फ्लावरी स्मिथ कुटुंब आम्हांला जाऊं देईना. सुग्रण स्मिथबाईंनीं भट्टींतून नुकतेच बाहेर काढलेले गरम गरम छोटे पाव आणि काकवी-सारखा दिसणारा आणि तसाच गोड मेपल झाडाचा 'सॉरगम' मध वाडगें भरून आमच्यासमोर टेबलावर ठेवला. नकों नको म्हणत आम्ही गरम गरम चार-चार पांच-पांच पाव आणि वाडगा-वाडगा मध सहज फस्त करून टाकला !

**फ्रोझन फुड कंपनीचे कामगार**

संध्याकाळच्या विमानानें आम्ही आयोवा सोडून शिकागोला जायला निघणार होतों. विमानतळावर जातांना वाटेंत चक्ची 'फ्रोझन फुड कंपनी' पाह्यचें ठरलें होतें. 'आमचं हें फ्रोझन फुड् प्लान्ट लहानसंच आहे. फक्त शें-दीडशें कामगार आमच्या कारखान्यांत आहेत,' चक् म्हणाला.

'ठीक आहे,' आम्ही म्हटलं, 'काल शेतकऱ्यांना भेटलों, आज तुमच्या कामगारांची गांठ घेऊं या ! '

फ्रोझन फुड प्लान्टची लहानशीच पण आंतूनबाहेरून स्वच्छ अशी इमारत आहे. चक्च्या खोलींत थोडा वेळ गप्पा केल्यानंतर चक्नें आम्हांला दोघांनाहि स्वच्छ पांढरे पायघोळ एप्रन घालायला दिले आणि गांधीटोप्यांसारख्या स्वच्छ पांढऱ्या कागदी टोप्या आमच्या डोक्यावर बसवल्या. खाद्यपदार्थांच्या कारखान्यांत फार स्वच्छता ठेवायची असते, तेव्हा सर्वांनाच हा गणवेश घालून आंत वावरावें लागतें. टोप्यांवर 'पेपरिज् फार्म' अशीं निळीं अक्षरें होतीं. चक्च्या एप्रनच्या उजव्या खिशावर 'चक्' हें नांव निळ्या अक्षरांत शिवलेलें होतें. कारखान्यांत शिरतांना वाटेंत कांहीं कामगार इकडून तिकडे जातांना भेटले ते किंवा चक्ची सेक्रेटरी मुलगी त्याला 'हॅलो चक् ! ' म्हणूनच संबोधून 'हिंदुस्थानांतले पाहुणे का ? ' म्हणून विचारीत होती. अमेरिकेंत मालकाला किंवा मॅनेजरलाहि कामगार बरोबरीच्या नात्यानें 'चक्',

' जिमी ',' पॅट् ' म्हणून संबोधतांना अनेक ठिकाणीं आढळले.

**कामगार कॅन्टीनमध्यें**

' पेपरिज फार्म ' या मूळ संस्थेनें ठिकठिकाणीं या फ्रोझन फुड् कंपन्या काढल्या आहेत. आपल्या इथें कुणी तरी गरीब विधवेनें निर्वाहाचा व्यवसाय म्हणून शंकरपाळ्यासारखीं घरगुती बिस्किटें करून घरोघर विकायला सुरुवात केली आणि पुढें हा व्यवसाय वाढतां वाढतां तिचे मुलगे बिस्किटांच्या प्रचंड कारखान्यांचे मालक झाले, असें ऐकलें होतें. ' पेपरिज फार्म 'चा तसाच इतिहास आहे. मार्गरिट रुडकिन् बाईला डॉक्टरांच्या सल्ल्यावरून आपल्या एका आजारी मुलासाठीं विशिष्ट प्रकारचा खास पाव आणि सँडविच, चॉप्स वगैरे बनवावे लागत. त्यांतून तिनें ' पेपरिज् फार्म ' ही संस्था निर्माण केली. या कारखान्यांत माणसाचा हात न लागतां सर्व कामें यंत्रानें होतात. पदार्थ तयार होऊन ते एका पट्ट्यावरून पुढें सरकत जातात, कागदांत गुंडाळले जाऊन डब्यांत पडतात, डबा पॅक होऊन डबे एकावर एक रचले जातात !

आम्हांला चक्नें कारखान्याच्या कॅन्टीनमध्यें नेलें आणि कॉफी मागविली. दोन-चार दोन-चार कामगार स्त्रीपुरुष तिथें येत जात होतेच. चक् म्हणाला, ' मी ऑफिसांत जाऊन बसतों. तुम्ही कामगारां-बरोबर थोडा वेळ मोकळेपणानें बोला नि मग ऑफिसांत या. '

आम्ही बसलों होतों त्या बांकाच्या शेजारच्याच बांकावर एक मुलगी बसली होती. तिच्या हातांत एक मोठें पाकीट होतें. एकदोन मुली आणि दोनतीन मुलगे तिची थट्टामस्करी करीत केक, कॉफी घेत होते. एक जण त्या सर्वांचा फोटो घेत होता. ' हें काय चाललं आहे ? ', म्हणून आमच्या शेजारीं बसलेल्या एका कामगाराला आम्ही विचारलें, तेव्हां तो म्हणाला, ' या मुलीच्या नोकरीचं एक वर्ष आज पुरं झालं. तेव्हां आठव-ड्याच्या पगाराचा एकपंचमांश आज कंपनीनें तिला बक्षीस म्हणून दिला. त्याबद्दल तिच्या मित्रमैत्रिणी तिच्याकडून आज केक, कॉफी

उपटताहेत ! दोन वर्षं झालीं कीं दोन पंचमांश, पांच वर्षं झालीं कीं एका आठवड्याचा सबंध पगार कंपनीकडून बक्षीस मिळतो. '

**आयोवाचा निरोप घेतला**

त्या कामगारानें पुष्कळ गोष्टी सांगितल्या. सुट्टया, विमा, पेन्शन, वैद्यकीय साहाय्य, प्रौढ शिक्षणाचे रात्रीचे वर्ग वगैरे बऱ्याच सोयी कंपनीनें केल्याचें तो आणि तिथें बसलेले दुसरे दोघेतिघे सांगत होते. ' तुमची युनियन आहे का ? ' म्हणून आम्ही विचारलें तेव्हां ' युनियन नाहीं, पण आमचा क्लब आहे, ' असें तें म्हणाले. कांहीं तक्रार असली तर आम्ही सरळ चक्कडे जातो. चक् ताबडतोब ती दूर करण्याचा प्रयत्न करतो ', ते म्हणाले. एक तरुण कामगार काम नीट करीत नसे, शेजारच्या माणसाच्याबरोबर कांहींतरी कुरापत काढून भांडत असे, तेव्हा चक् त्याच्या घरीं गेला आणि त्याच्या आईबापाशीं बोलला. घरच्या कांहीं भानगडीमुळें तो तरुण कामगार संत्रस्त होता असें त्याला आढळून आलें. त्याला एक महिना रजा देऊन बाहेरगांवीं पाठविण्याची चक्नें व्यवस्था केली. इथले कामगार एकंदरींत मजेंत काम करीत असलेले दिसले.

संध्याकाळीं बॅगा मोटारींत ठेवून चक्बरोबर आम्ही विमानतळावर जायला निघालों, तेव्हां जेफ, लेस्ली, मार्शासह वरच्या गॅलरींत उभीं राहून डॉटी आम्हांला हात हालवीत ' गुड् बाय् ' करीत होती. पण मोटार चालू होतांना वर पाहिलें तों मुलेंच उभीं होतीं-डॉटी दिसली नाहीं.

' ती आंत पळाली असेल, ' चक् हंसून म्हणाला, ' कुणी एक दिवस जरी राह्यला आलं आणि दुसऱ्या दिवशीं जायला निघालं की डॉटच्या डोळ्यांत पाणी येतं. तें लपवण्याकरतां ती अशीच आंत पळते ! '

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८६५१ वि: ग्रं:प्रवास
क्रमांक ३६५ नों. दि. २०/७/७५



# : १० : शिकागो

शिकागोचे डाकू कुठें आहेत ?

आयोवा सिटीहून दुपारीं तीन साडेतीनला निघून संध्याकाळीं सहाला आम्हीं शिकागोला पोहोंचणार होतों. पण आयोवा सिटीहून विमान सुटायलाच संध्याकाळचे सात वाजले. जेव्हां शिकागोच्या अवाढव्य विमानतळावर उतरलों तेव्हां रात्रीचे साडेनऊ वाजले होते. शिकागोचा विमानतळ अफाट वाटला. विमान जमिनीला लागल्यानंतर उतरायच्या ठिकाणीं टॅक्सीसारखें तें पंधरा वीस मिनिटें तरी जात होतें. या विमान-तळावर म्हणे दर सेकंदाला एखादें तरी विमान उतरत असतें, किंवा उड्डाण करीत असतें ! शिकागो शहरापासून विमानतळ वीसपंचवीस मैल तरी लांब असावा. शिकागोंतल्या ॲम्बॅसडर हॉटेलमध्यें आमची उतरायची व्यवस्था होती. तिथें बसनें पोहोंचेपर्यंत रात्रीचे अकरा साडेअकरा झाले असते. म्हणून विमानतळावरून तिकडे जातांना वाटेंत 'फ्रेड हार्वे' नांवाच्या एका लहानशा हॉटेलांत स्टॅन्डीशनें आम्हांला जेवायला नेलें. ॲम्बॅसडरमध्यें पोहोंचलों तेव्हां मध्यरात्र झाली होती.

सकाळीं प्रातरुपाहारानंतर विशेष कांहीं नियोजित कार्यक्रम नव्हता. तेव्हां मी, गुलाबदास ब्रोकर, जयंति दलाल वगैरे तिघेचौघे जण पायीं भटकून शिकागो पहावें म्हणून बाहेर पडलों. बँकांवर दिवसा-ढवळ्या धाडसी दरोडे घालणारे अमेरिकेचे बरेचसे इतिहासप्रसिद्ध डाकू आणि गुंड शिकागोंतलेच, –लहानपणापासून शिकागोचें नांव वृत्तपत्रांतून आम्हांला याच गोष्टीमुळें माहीत झालें होतें. तेव्हां बाहेर पडतांना स्टॅन्डीशला आम्ही थट्टेनें विचारलें, 'शिकागोच्या नाक्यानाक्यावर डाकू भेटतील, नाहीं का ?'

'आतां शिकागो खूप सुधारलंय्', स्टॅन्डीश म्हणाला, 'दरोडे पडतात,

पण इतर शहरांपेक्षां विशेष अधिक असे नाहीं ! '

**इथें विवेकानंद बोलले**

एअर इंडिया इंटरनॅशनलच्या शिकागोतल्या कचेरींत आमचें थोडें काम होतें तें करून आम्ही बाहेर पडलों आणि इकडे तिकडे पाहूं लागलों तों पलीकडच्या एका रस्त्यावर एक भव्य दगडी इमारत दिसली. तिच्या प्रवेशद्वाराशीं दोन्ही बाजूला प्रचंड दगडी सिंहाच्या आकृत्या होत्या. कुणी तरी म्हणालें, शिकागोची प्रख्यात आर्ट इन्स्टिटयूट ती हीच. आम्हांला एकदम आठवण झाली, याच जागेंत साठसत्तर वर्षांपूर्वी जागतिक सर्वधर्म परिषद झाली होती. तिथें स्वामी विवेकानंदांनीं आपलें जग जिंकणारें इतिहासप्रसिद्ध भाषण केलें. त्या भव्य इमारतींत आम्ही प्रवेश केला आणि डाव्या बाजूच्या दालनांत माहिती देणारी एक मध्यमवयस्क स्त्री बसली होती तिला कांहीं विचारण्याकरितां आम्ही पुढें गेलों. आम्ही हिंदी आहोंत हें तिनें तावडतोब ओळखलें आणि आम्ही कांहीं विचारायच्या आंत हंसत हंसत ती म्हणाली, ' स्वामी विवेकानंदांनीं तें भाषण कुठें केलं हेंच तुम्हांला पाहिजे ना ? तुम्ही उभे आहांत याच जागीं तो हॉल होता. तिथेंच ते बोलले ! त्यानंतर या इमारतींत कांहीं फेरफार झाले आहेत. '

या इन्स्टिटयूटमध्यें जुन्यानव्या मोठमोठ्या चित्रकारांच्या आणि शिल्पकारांच्या कलाकृति आहेत. पिकासो, रेन्वा वगैरेंच्या कृति पाहून आम्ही बाहेर आलों. एका नाक्यावर विचित्र आकाराची एक भव्य साठ मजली नवीन इमारत बांधली जात असलेली दिसली. मध्यें एक उंचच उंच उभा स्तंभ आणि त्याच्या भोंवतीं गोलगोल वर जाणाऱ्या पायऱ्यांचा जिना असतो तसा कांहीं तरी या प्रचंड इमारतीचा आकार होता. वरचे पंचेचाळीस मजले राहण्याच्या जागा आणि खालचे मोकळे पंधरा मजले राहणाऱ्यांच्या मोटारी ठेवण्याकरितां, अशी व्यवस्था होती. इमारतीचें नांव ' मरीना. '

## काळेगोरे एकत्र--इन्टेग्रेटेड अपार्टमेंट्स्

शिकागो मला फार सुंदर शहर वाटलें. लिंकन पार्कसारख्या विस्तीर्ण बागा, मोठमोठे वृक्षाच्छादित रस्ते, मधूनच कांहीं पुलांखालून जाणारी एक लहानशी नदी, पण या सर्वांहून मन मोहून टाकणारी गोष्ट म्हणजे शिकागोला लागून बावीस मैल इतस्तत: पसरलेल्या लांबरुंद किनाऱ्याचें क्षितिजापर्यंत पसरलेलें समुद्रासारखें निळ्या पाण्याचें मिशिगन सरोवर.

शिकागो शहराची सर्वांगीण सुधारणा करण्याकरितां तिथल्या नगरपालिकेनें एक खास समिति नेमली आहे. गेल्या कित्येक वर्षांत या समितीनें अनेक योजना पार पाडल्या. या समितीची अध्यक्ष एक वृत्तपत्रांत काम करणारी वयोवृद्ध स्त्री आहे. शहरांतल्या गलिच्छ वस्त्या, नीग्रो नागरिकांच्या गैरसोयी वगैरे विषयांवर या स्तंभलेखिकेनें सखोल अभ्यास करून आपल्या लेखांतून कित्येक दिवस सतत झोड उठविली होती. शेवटीं नगरपालिकेनें तिच्याच अध्यक्षतेखालीं उपरोक्त समिति नेमली. एके दिवशीं सकाळीं या बाई स्वत: आमच्याबरोबर फिरून त्यांच्या समितीनें केलेलें कार्य दाखविणार होत्या. गलिच्छ वस्त्यांचें उच्चाटन करून निग्रो आणि गरीब गोरी कुटुंबें यांच्याकरितां उभ्या केलेल्या कांहीं चौदा मजली इमारती बाईंनीं आम्हांला दाखवल्या. तिथलीं भाडीं आणि सोयी पाहून आम्हां सर्वांच्या तोंडाला पाणी सुटलें. वर जायला लिफ्ट वगैरे सोयी होत्याच, पण प्रत्येक मजल्यावर तिथें राहणाऱ्यांच्या सोयीसाठीं एका खोलींत कपडे धुण्याचीं आणि कपडे सुकविण्याची विजेचीं यंत्रें बसवलेलीं होतीं. उत्पन्नाच्या वीस टक्के भाडें द्यावें लागतें, असें आम्हांला समजलें. तीन ते पांच खोल्यांच्या जागा होत्या. ३६ ते १२५ डॉलर्सपर्यंत भाडें होतें. अमेरिकेचें राहणीचें आणि पगाराचें मान लक्षांत घेतां डॉलर म्हणजे एक रुपया समजावयास हरकत नाहीं. ३६ ते १२५ रुपयांना तीन ते पांच खोल्यांचे सर्व सोयींनीं युक्त असे ब्लॉक स्वस्तच म्हटलें पाहिजेत. कांहीं ब्लॉकमध्यें ‘ बाय

लेव्हल ' खोल्या होत्या, म्हणजे आपल्याकडे पोटमाळा असतो त्याप्रमाणें आंत मध्येंच वरच्या बाजूला आणखी एकदोन खोल्या. शिकागोंतल्या अशा प्रकारच्या बऱ्याच इमारतींना ' इंटेग्रेटेड अपार्टमेंट्स् ' म्हणतात. म्हणजे काळागोरा हा भेद किंवा ' सेग्रेगेशन ' जिथें नाहीं अशा. क्लॅरेन्स डॅरो नांवाचा अन्यायाविरुद्ध नेहमी झगडणारा अमेरिकेचा एक प्रख्यात वकील होऊन गेला. त्याचें नांव—क्लॅरेन्स डॅरो अपार्टमेन्टस्—या जागांना दिलें आहे.

**इथें अणुयुगाला प्रारंभ झाला !**

अमेरिकेचा प्रख्यात वयोवृद्ध आणि तपोवृद्ध कवि कार्ल सॅन्डबर्ग याचें नांव दिलेली ' कार्ल सॅन्डबर्ग व्हिलेज ' नांवाची एक नवी वसाहत शिकागोंत आकाराला येत आहे. मध्यमवर्गीय कुटुंबांसाठीं ती आहे. या वसाहतींची रचना मोठी मजेदार आहे. या वसाहतींत कांहीं इमारती अधूनमधून तीसचाळीस मजल्यांच्या ' स्कायस्क्रेपर ' किंवा आकाश कोरणाऱ्या आहेत. पण बऱ्याचशा इमारती मजल्या दोन मजल्यांच्या बैठ्या आहेत. सगळ्याच इमारती आकाशचुंबी केल्या तर उजेड वारा अडतो आणि कोंदटपणा येतो, म्हणून असें केलें आहे म्हणतात. या वसाहतींत छोटीं छोटीं उद्यानें, वृक्षाच्छादित रस्ते, खेळण्यासाठीं मोकळ्या जागा वगैरे सोयी होणार आहेतच. इथले कांहीं चार खोल्यांचें, पांच खोल्यांचें ' फ्लॅट ', स्वयंपाक घरें, खुर्च्या, झोपायच्या खोल्या, भिंती-वरलीं चित्रें वगैरे व्यवस्थित कलापूर्ण रीतीनें लावून प्रदर्शनाकरितां उघडे ठेवलें होतें. मिटक्या मारीत ती सुंदर रचना पाहत आम्ही किती तरी वेळ उभे होतों.

शिकागो विद्यापीठाजवळून जात असतां तिथल्या एका टेनिस कोर्टा-जवळच्या लहानशा इमारतीच्या दोन खांबांना लावलेल्या एका पाटीकडे स्टॅन्डीशनें आमचें लक्ष वेधलें. पाटीवर लिहिलें होतें—' २ डिसेंबर १९४२ या दिवशीं अणयुगाला इथें प्रारंभ झाला. ' ही लहानशी इमारत

म्हणजे प्रख्यात अणुशास्त्रज्ञ एन्रिको फर्मी यांची प्रयोगशाळाच. अणुस्फोटाची 'चेन रिॲक्शन' कशी होते वगैरे रहस्यांचा फर्मीला युद्धकाळांतल्या त्या २ डिसेंबरला तिथें काम करीत असतां शोध लागला.

**शिकागोंतला वेदान्त सेंटर**

शिकागोंत एक 'वेदान्त सेंटर' आहे आणि कुणी स्वामी विश्वानंद नांवाचे स्वामी तिथें असतात, असें आम्हांला कळलें होतें. एके दिवशीं दुपारीं स्वामी विश्वानंदांना ब्रोकर, मी आणि दलाल यांनीं टेलिफोन करून आम्हांला 'सेंटर' पाहायला यायचें आहे म्हणून सांगितलें. 'आज संध्याकाळीं नको, उद्यां सकाळीं या', असें ते म्हणूं लागले. आम्ही त्या रात्रींच शिकागो सोडणार होतों. तेव्हां 'तुम्ही कामांत असलांत तर आम्ही तुम्हांला भेटून त्रास देणार नाहीं, पण तिथल्या कुणातरी माणसाला आम्हांला सेंटर दाखवायला सांगा म्हणजे झालें', अशी विनंती करून आम्ही संध्याकाळीं ४४, एल्म्स स्ट्रीट या पत्त्यावर सेंटर पाहायला गेलोंच. दारावरची घंटा वाजवली तेव्हां सत्तरीच्या आसपासचे, सुटलेल्या स्थूल शरीराचे, बोजड तुळतुळीत चेहेऱ्याचे, भगव्या धोतर-सदऱ्यांतले स्वामी विश्वानंदच दार उघडायला आले. आम्ही मुंबईचे मराठी-गुजराती आहोंत हें कळल्यावर त्यांना आनंद झालेला दिसला. आपण गुजरातीच आहोंत, पूर्वी मुंबईजवळ सांताक्रूझला राहात होतों, नामदार खेर, नामदार जयकर वगैरे आपले चांगले स्नेही होते वगैरे गोष्टी ते सांगूं लागले. सेंटर म्हणजे एक लहानसें प्रार्थना मंदिरासारखें दिसणारें दालन आणि एक दोन खोल्या होत्या. दालनांत कांहीं पुस्तकांचीं कपाटें दिसलीं. पाहण्यासारखें फार कांहीं नव्हतेंच. त्या दिवशीं संध्याकाळीं स्वामीजींना काय काम होतें कुणास ठाऊक, आधीं आम्हांला येऊंच नका म्हणत होते आणि नंतर गेलों तेव्हां बोलतां बोलतां मधून मधून एकसारखा 'रामभरोसे,' 'रामभरोसे' असा गजर करीत, आम्हाला जवळ जवळ 'जा एकदांचे इथून' म्हणून बाहेर ढकलीत

होते ! बाहेर आल्यावर आम्ही सेंटरच्या दाराशीं एक पाटी पाहिली. तिच्यावर लिहिलें होतें, Sun-Services,11–30 A. M. म्हणजे रोज सकाळीं ११–३० वाजतां सेंटरमध्यें सूर्योपासना होते असें दिसतें.

**' सनटाईम्स–डेली न्यूज ' आणि यशवंतराव चव्हाण**

शिकागोंतलें प्रख्यात दैनिक 'सन-टाईम्स ॲन्ड डेली न्यूज' या पत्राचे मालक फील्ड आणि संपादकवर्ग यांनीं एके दिवशीं दुपारीं आम्हांला थाटाची मेजवानी दिली. शिकागोंतल्या नदीच्या काठीं या पत्राची साडेतीन कोटी डॉलर किंमतीची प्रचंड इमारत आहे. या पत्राचा खप पांच लक्षावर आहे. फील्ड यांच्या मालकीचे मोठमोठे डिपार्टमेन्टल स्टोअर्स आहेत. कांहीं दिवसांपूर्वीं त्यांनीं हें पत्र विकत घेतलें. जेवणापूर्वीं गप्पागोष्टी चालू असतां पत्राच्या कचेरींत भारताचे संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांची नेमणूक झाल्याची वातमी आली. ती सर्व हकीगत मी एका मुलाखतींत पुढीलप्रमाणें सांगितली होती :

**प्र.** : आपल्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांना मेननच्या जागीं भारत सरकारचे संरक्षणमंत्री केल्याचें जाहीर झालें तेव्हां अमेरिकी लोकमतावर त्याचा काय परिणाम झाला ?

**उ.** : मेनन एकदांचे गेले याचा अमेरिकेंतल्या मोटारहांक्यापासून तो परराष्ट्रमंत्र्यांपर्यंत चांगलाच परिणाम झाला, हें मी सांगितलंच आहे. चव्हाण हें नांव तसें पाहिलें तर सामान्य अमेरिकी नागरिकालाच काय, पण चांगल्या पत्रकारांनाहि अपरिचित होतें.

**प्र.** : तुम्हां मंडळींना ही बातमी अमेरिकेंत कधीं आणि कशी कळली ?

**उ.** : तेंच सांगतों म्हणजे तुमच्या प्रश्नाला बरोबर उत्तर मिळेल. मला वाटतं आम्हीं त्या दिवशीं शिकागो या अमेरिकेंतल्या प्रख्यात शहरांत होतों. त्या दिवशीं दुपारीं दीड वाजतां तिथल्या 'शिकागो सन्' आणि 'शिकागो डेली न्यूज' या बड्या दैनिकांच्या संपादकांनीं आम्हांला त्यांच्या कचेरींत दुपारच्या जेवणाकरितां आमंत्रण दिलें होतें.

शिकागोमधल्या नदीच्या कांठी जवळ जवळ साडेतीन कोटी डॉलर किमतीच्या नव्या कोऱ्या इमारतींत या पत्रांचा छापखाना आणि कचेरी आहे. जवळ जवळ एक कोटी डॉलर किमतीची, ऐशीं ते नव्वद पृष्ठांच्या रोजच्या अंकाच्या ताशीं ऐशीं नव्वद हजार प्रती छापून, पुडकीं बांधून बाहेर उभ्या असलेल्या लॉऱ्यांत नेऊन टाकणारीं अजस्त्र यंत्रें आहेत.

प्र. तिथें जेवायला गेलां असतां यशवंतरावांच्या नेमणुकीची तुम्हांला बातमी मिळाली कीं काय ?

उ. : होय. 'शिकागो सनटाईम्स' आणि 'डेली न्यूज'चे संपादक, व्यवस्थापक वगैरे आमचे यजमान उत्तमोत्तम कॉकटेल पेयांचा जेवणापूर्वी आम्हांला आग्रह करीत होते, पाहुणे-यजमानांच्या अनेक विषयांवरल्या चर्चा अगदीं रंगांत आल्या होत्या. लहान लहान गट करून आम्हीं गप्पा करण्यांत रंगून गेलों होतों; इतक्यांत संपादकीय कचेरींतून कुणी तरी भारतांतून आलेल्या वृत्तांच्या तारा घेऊन तिथें आला. चव्हाणांच्या फोटोसह ती बातमी छापलेलें वृत्तपत्रांचें, मला वाटतें एक पृष्ठच त्यानें आणलें होतें. मेननच्या जागीं महाराष्ट्रराज्याचें मुख्यमंत्री कुणी तरी चव्हाण यांना भारताचे संरक्षणमंत्री करण्यांत आलें आहे, अशी बातमी होती.

प्र. : कुणी तरी चव्हाण ?

उ. : हो, चव्हाणांचें नांव तसें अमेरिकेंत फारसें कुणालाच माहीत नव्हतें. पण चव्हाण संरक्षणमंत्री झाल्याचें कळल्याबरोबर महाजनी, मी, पी. टी. आय. रॉयटरचे गुर्जर–पु. ल. देशपांडे त्या दिवशीं शिकागोंत नव्हते,–आम्हां मराठ्यांच्या छात्या एकदम वर आल्या. आमच्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण संरक्षणमंत्री झाले ही केवढी महत्त्वाची घटना आहे हें तिथल्या सर्व अमेरिकी संपादक उपसंपादकांना आम्ही समजावून सांगूं लागलों. आम्ही आपोआपच त्या विषयावरले अधिकारी पुरुष झालों ! महाराष्ट्राचा इतिहास, महाराष्ट्राची लढाऊ

परंपरा, महाराष्ट्राची वीरगाथा अमेरिकन मित्रांच्या कोटाच्या बाह्या पकडून आम्ही त्यांना सुनावूं लागलों. त्यांनाहि दुसऱ्या दिवशीं चव्हाणांची माहिती आपल्या पत्रांत देण्याकरितां तें सर्व हवेंच होतें. मेननची हकालपट्टी झाल्यामुळें तेहि सर्व खूष होते. यशवंतरावांची स्तुति ऐकायला ते चांगलेच तयार होते.

**प्र.** : नवे संरक्षणमंत्री म्हणून चव्हाणांविषयीं तिथल्या वृत्तपत्रांत विशेष कांहीं आलें होतें का ?

**उ.** : तशी थोडीबहुत माहिती कुठं कुठं आली होती. एका वृत्तपत्रांत त्यांच्यावर थोडीशी प्रतिकूल टीका आल्याचेंहि कळलें. तें पत्र मला वाचायला मिळालं नाहीं; पण त्या गांवाहून आलेल्या एका गृहस्थानं मला सांगितलं.

**प्र.** : कोणतं पत्र ? काय टीका आली होती ?

**उ.** : टेनेसीमधील एका वृत्तपत्रांत यशवंतराव चव्हाण हे एके काळीं मानवेंद्र रॉय या जुन्या कम्युनिस्टांचे अनुयायी होते आणि आजहि ते मेनन गटांतलेच असावेत अशी कांहीं तरी प्रतिकूल टीका असल्याचें तें गृहस्थ सांगत होते.

**असें म्युझियम कुठें असेल का ?**

शिकागोंतलें 'म्युझियम् ऑफ् सायन्स अॅन्ड इन्डस्ट्री' हें अचाट वस्तुसंग्रहालय खरें म्हटलें तर शाळकरी मुलांसाठीं आणि विद्यार्थ्यांसाठीं आहे. पण राणी एलिझाबेथनें कांहीं दिवसांपूर्वीं अमेरिकेला भेट दिली तेव्हां शिकागोच्या मुक्कामांत, 'मी लहानपणापासून ऐकतें आहे तें शिकागोचें म्युझियम मला आधीं पाह्यचें आहे !' असें उद्‌गार तिनें काढल्याचें आम्हांला म्युझियममधलीं निरनिराळीं दालनें दाखवीत असलेली पांढऱ्या केसांची वयोवृद्ध मार्गदर्शिका सांगत होती. चांगल्या चांगल्या प्रौढांना एका एका दालनांतून हालूंच नये, असें वाटायला लावणारीं, एकाहून एक डोळे दिपवून टाकणारीं दालनें या

म्युझियममध्यें आहेत. कित्येक दिवस पुन्हां पुन्हां येऊन हें म्युझियम पाहिले पाहिजे. आम्हाला वेळ नसल्यामुळें कांहीं महत्त्वाचीं दालनें आम्ही तीनचार तासांत पाहून घेतलीं. या म्युझियमला 'व्हिजिटर्स पार्टिसिपेशन म्युझियम' असें नांव आहे. इतर प्रदर्शनांत आणि संग्रहालयांत पाह्यला येणारांनीं 'इथें हात लावूं नये', 'तिथें बोट ठेवूं नये' अशी सक्त ताकीद जिथें तिथें दिलेली असते. इथें या उलट प्रकार आहे. म्युझियम पाह्यला येणाऱ्या मुलांनीं इथलीं यंत्रें, इथल्या वस्तू, इथल्या नमुन्यांना हात लावावा, तीं चालवून पहावीं, तिथल्या खास मार्गदर्शकाचें साहाय्य घ्यावें, तिथलें बटन दाबून टेपरेकॉर्डवरून विशिष्ट नमुन्याची माहिती ऐकावी असें इथें मुद्दाम बजावण्यांत आलें आहे!

एका दालनांत 'टेलिव्हिजन' कसें चालतें तें दाखवलें आहे. कितीतरी गोरी मुलें, नीग्रो मुलेंमुलीं तिथें यंत्रांशीं खटपट करीत स्वतःचें चित्र कोपऱ्यांतल्या टेलिव्हिजन सेटवर पाहात असलेलीं आम्हीं पाहिलीं. एका दालनांत मोटारचें सर्व भाग उघडून ठेवलेले होते. मुलें माहिती विचारीत होती, चालवून पाहात होतीं, मार्गदर्शक त्यांना सूचना देत होता.

एका दालनांत सबंध कोळशाच्या खाणीचा एक भाग उभा केलेला होता. खडबड, खडबड करीत खालीं जाणाऱ्या पिंजऱ्यांतून मुली आणि मास्तर-मास्तरणी खालीं खाणींत जात होत्या, हातांत कुदळ घेऊन कोळसा खणून कसा काढावयाचा तें पहात होत्या, मुलेंमुलीं आरडाओरड करीत पिंजऱ्यांतून वर येत होतीं.

**बाहुल्यांचें राज्य**

हॉलिवुडमधल्या एका नटीला निरनिराळ्या प्रकारच्या बाहुल्यांचा संग्रह करण्याची हौस होती. तिनें गोळा केलेल्या शेंकडों लहानमोठ्या निरनिराळ्या प्रकारच्या सुंदर बाहुल्या या संग्रहालयाला देऊन टाकल्या आहेत. त्या दालनांत गेलें कीं पऱ्यांच्या नंदनवनांत गेल्यासारखें वाटतें.

चिमुकले रंगीबेरंगी राजवाडे, किल्ले, गड करून त्यांच्यांत ठिकठिकाणीं मोठ्या कलापूर्ण रीतीनें या बाहुल्या ठेवल्या आहेत.

एका दालनांत गोठ्यासारखा गोठा होता आणि तिथें असलेल्या पुष्ट गाईचें दूध विजेच्या यंत्रानें कसें काढावयाचें ते तिथला माणूस मुलांना दाखवीत होता. दुसऱ्या एका ठिकाणीं कोंबडीच्या अंड्याच्या निरनिराळ्या अवस्था आणि शेवटीं तर अंडें फोडून कापसाच्या गोळ्यासारखें चिमुकलें पिल्लूं बाहेर पडत असलेलें दिसत होतें.

रसायन, विद्युत्, अणुसंशोधन इत्यादि शास्त्रें आणि मोटर, आगगाडी, विमानें इत्यादि बनवणारे उद्योगधंदे यांचीं वेगवेगळीं अनेक दालनें इथें आहेत. जर्मनांची एक जुनी पाणबुडीहि इथें पाह्यला मिळते. १९१० सालीं शिकागोचे रस्ते कसे दिसत होते, तें दाखविण्याकरितां एके ठिकाणीं जुने गॅसचे दिवे, त्यावेळची खडबडीत फोर्ड गाडी इत्यादींसह शिकागोची एक गल्ली हुबेहूब उभी केली आहे.

**नाईट क्लब आणि दीड चिंधींतल्या स्त्रिया**

त्या दिवशीं रात्रीं शिकागोंतले कांहीं गाजलेले ' स्ट्रिप्-टीझ् ' नाइट क्लब पाह्यला आम्ही पांच सहाजण गेलों. मिन्यापोलीसमधल्या असल्या कांहीं हॉटेलांना ' फ्रॉलिक्स ', ' गे नाइन्टीज् ' अशीं नांवें होतीं. मुंबईतल्या मोठमोठ्या ' ताजमहाल ', ' ॲम्बॅसडर, ' ' ॲस्टोरिया ' वगैरे हॉटेलांतल्या ' दि अदर रूम ', ' लिटल हट् ', ' व्हेनिस ', वगैरे विभागांत नृत्य, गीत, वादनाचे जे ' काबारे ' म्हणून प्रकार चालतात त्यांच्याहून फारसा वेगळा प्रकार शिकागो किंवा मिन्यापोलीससारख्या अमेरिकी शहरांतल्या या नाईट क्लबांतला नाहीं. कुणी कुणाला हंसण्याचें फारसें कारण आहे, असें मला वाटत नाहीं. आमच्या मुंबईच्या हॉटेलांतल्या यूरोप-अमेरिकेंतल्या किंवा इजिप्त-इराणमधल्या अंगप्रत्यंग पिळवटून नाचणाऱ्या मुली, तीन चतुर्थांश, चार पंचमांश, किंवा अर्धनग्न असतात, तर इथल्या नग्नप्राय असतात असें म्हणतां येईल.

मुंबईतल्या नर्तिकांच्या अंगावर छातीभोंवतीं तीनचार बोटें रुंदीची रेशमी जरतारी चिंधी, आणि कमरेभोंवती चारपांच बोटांची चिंधी असते, तर शिकागोंतल्या तिच्या बहिणीच्या अंगावर छातीभोंवती ती दोनतीन बोटांचीच असते इतकेंच !

'स्ट्रिप्–टीझ' चें वर्णन 'स्वयंवस्त्रहरण' असें करतां येईल. नर्तिका संगीताच्या तालावर ठुमकत रंगमंचावर येते. तेव्हां तिचें सर्वांग सुंदर झग्यानें आवृत असतें इतकेंच नव्हें तर वर आणखी सुंदर झुळझुळीत शाल लपेटलेली असते. नाचतां नाचतां हळूहळू शाल, झगा असें एकेक वस्त्र टाकून देत शेवटीं फक्त उंच टाचेचे बूट आणि उपरोल्लेखित दोन चिंध्या एवढ्या किमान कपड्यांत नाचत राहाते.

शिकागोंतल्या क्लबमध्यें नृत्याप्सरा रंगभूमीवर येण्यापूर्वी एका नीग्रो तरुणाचा टॅप डान्स होता. फार सुरेख नाच तो करीत होता. अधून मधून कांहीं कोटया करून तो लोकांना हंसवीत होता. शेवटीं तो म्हणाला, 'तुम्ही आतां मला कंटाळलेले दिसतां–तुम्ही दीड चिंधींतल्या–बॅंडेज ॲन्ड हाफमधल्या मुलींचे नाच बघायला अधीर झाला आहांत!'

**ही अमेरिका नव्हे हं !**


शिकागोंतल्या त्या क्लबांत आम्ही बसलों होतों तिथें माझ्या शेजारींच एक कामगारासारखा दिसणारा जाड्याभरड्या कपड्यांतला अमेरिकन तरुण ग्लास फस्त करीत बसला होता. 'तुम्ही भारतांतून आलां आहांत का ?' त्यानें आम्हांला विचारलें.

आम्ही 'हो' म्हटलें, तेव्हां पुन्हां पुन्हां विनवणीच्या स्वरांत तो आम्हांला सांगूं लागला, 'This is not America ! ही अमेरिका नव्हे बरं–स्वदेशीं गेल्यावर अमेरिका ही अशी आहे म्हणून कृपा करून सांगूं नका !'

'छे छे, मुळींच नाहीं,' आम्ही त्याला पुन्हां पुन्हां सांगत होतों, 'आम्ही अमेरिकेचीं मोठमोठीं विद्यापीठें पाहिलीं आहेत; बड्या बड्या वृत्त-

पत्रांच्या कचेऱ्या पाहिल्या आहेत, विद्वानांना, मुत्सद्यांना भेटलों आहोंत, अमेरिकेचे मोठमोठे लेखक वाचले आहेत, हे नाचतमाशे म्हणजेच अमेरिका नव्हे हें आम्हांला माहीत आहे. आमच्या मुंबई-कलकत्त्यांतहि हे असले प्रकार चालतातच.'

त्याला बियर जरा जास्त झाली होती. 'मित्र हो, ही अमेरिका नव्हे बरं!' असें तो पुन्हां पुन्हां चढत्या आवाजांत आम्हांला विनवून सांगूं लागला, तेव्हां 'हो हो, ही अमेरिका नव्हे!' असें त्याच्या पाठीवर हात फिरवून सांगत आम्ही क्लबाच्या बाहेर पडलों.


SEP

# : ११ : न्यूयॉर्क – हारवर्ड–येल

न्यूयॉर्कला आलों,

न्यूयॉर्कच्या आयडलवाइल्ड विमानतळावर आलों तेव्हां रात्रीचे साडेसात वाजले होते. हिंवाळ्याच्या दिवसांत इथें संध्याकाळीं पांचलाच काळोख पडूं लागतो. त्यामुळें साडेसातला चांगलीच रात्र झाल्यासारखें वाटत होतें. मॅडिसन ॲव्हेन्यूवरल्या हॉटेल रूझवेल्टमध्यें आम्ही राहणार होतों. रूझवेल्टमध्यें जेवण घेऊन बाहेर लाऊंजमध्यें येऊन बसतों तो माझी मुलगी सीमा आणि अविनाश भागवत दोघेंहि तिथें येऊन पोहोंचली. आमचे स्नेही श्री. पांडुरंगपंत भागवत यांचा अविनाश हा मुलगा. न्यूयॉर्कपासून साठसत्तर मैलांवर असलेल्या न्यू हेवन येथील प्रख्यात येल् विद्यापीठांत गेली दोन वर्षें अर्थशास्त्राच्या पीएच्. डी.चा अभ्यास करतो आहे. सीमाशीं त्याचें लग्न ठरलें आहे. न्यू हेवनपासून आणखीं शेंदीडशें मैलांवर असलेल्या बॉस्टनमध्यें तीनचार महिन्यांपूर्वीच संशोधन-शिष्यवृत्ति मिळाल्यामुळें सीमा आली आहे. एक महिन्यापूर्वीं आम्ही न्यूयॉर्कलाच उतरलों. तेव्हां मला भेटण्याकरितां दोघेंहि आयडलवाइल्ड विमानतळावर आलीं होतीं; पण तिथून तास-दीड तासांतच आम्ही वॉशिंग्टनला गेलों—न्यूयॉर्क पाहिलेंच नाहीं. आतां मात्र न्यूयॉर्कमध्यें चार दिवस राह्यचें आहे. पहिलें दोन दिवस न्यूयॉर्क पाहाण्याचा आंखलेला कार्यक्रम आहे. उरलेल्या दोन दिवसांत सीमा—अविनाशबरोबर बॉस्टनमधील हार्वर्ड विद्यापीठ आणि न्यू हेवनमधील येल् विद्यापीठ पाहाण्याचा माझा विचार आहे. नंतर सरळ न्यूयॉर्क ते मुंबई !

**जगांतली सर्वोच्च इमारत**

न्यूयॉर्कसारखें जगांतलें एक मोठ्यांत मोठें शहर दोन दिवसांत पाह्यचें, म्हणजे न्यूयॉर्क पाहिलें का म्हणून कुणी विचारलें तर ‘हो’

म्हणायला मिळावें इतकेंच ! लंडनप्रमाणेंच न्यूयॉर्कसंबंधीं लहानपणापासून कथा-कादंबऱ्यांतून पुष्कळसें वाचलें होतें, आणि चित्रांतून, चित्रपटांतून पुष्कळसें पाहिलेंहि होतें. तेव्हां न्यूयॉर्कमधून फिरतांना बरेंचसें ओळखीचेंच वाटत होतें. न्यूयॉर्कला जाणाऱ्या प्रवाश्यानें पाहिल्याच पाहिजेत अशा दोनतीन गोष्टी म्हणजे जगांतली उंच इमारत—एकशें दोन मजल्यांची एम्पायर स्टेट बिल्डिंग, न्यूयॉर्क बंदराच्या तोंडाशींच असलेल्या बेटावरला 'स्टॅच्यू ऑफ लिबर्टी' किंवा 'स्वातंत्र्यदेवीचा पुतळा,' रात्रीं जिथें शंभर दिवाळयांचा झगझगाट झालेला असतो तो 'टाईम्स स्क्वेअर' हा चौक आणि कथा-कादंबऱ्यांतून वाचलेलें ग्रीनिच् व्हिलेज, ब्रॉडवे इत्यादि न्यूयॉर्कचे भाग. एम्पायर स्टेट बिल्डिंगच्या एकशें दोन मजल्यांच्या छपरावरच्या कांचेच्या गच्चीवरून सबंध न्यूयॉर्कचें, एका बाजूचीं ईस्ट रिव्हर, दुसऱ्या बाजूची हड्सन् रिव्हर, मॅनहॅटनवरल्या गगनभेदी इमारतींचा पुंजका, सेंट्रल पार्क, ब्रुकलीन, क्वीन्स इत्यादि न्यूयॉर्कचे दूरदूरचे भाग इत्यादींचें दर्शन होतेंच, पण न्यूयॉर्क राज्याच्या जवळच्याच न्यू जर्सी, कॉनेक्टिकट्, मॅसाचुसेट्स, पेन्सिल्व्हॅनिया, या राज्यांच्या कांहीं भागांचेंहि अंधुक दर्शक होतें. या इमारतीची उंची १४७२ फूट आहे; पण एकशें दुसरा मजला १२५० फुटांवर आहे. शहाऐंशीवा मजला १०५० फुटांवर आहे. पण इथल्या अनेक एलेव्हेटर्सपैकीं एक्स्प्रेस एलेव्हेटर अवघ्या एका मिनिटांत तुम्हांला तळमजल्यावरून एकशें दुसऱ्या मजल्यावर घेऊन जातो. आम्ही गेलों त्या लिफ्टनें किंवा अमेरिकन भाषेंत बोलायचें म्हणजे एलव्हेटरनें आम्हांला तळमजल्यावरून एकदम शहाऐंशीव्या मजल्यावर नेलें. तिथें एक काचेची गॅलरी आहे. तिच्यांतून थोडा वेळ न्यूयॉर्कचे रस्ते आणि त्यावरून जाणारे मुंगीएवढे दिसणारे लोक पाहून दुसऱ्या लिफ्टनें आम्ही आणखी सोळा मजले वर म्हणजे एकशें दुसऱ्या मजल्याच्या गच्चीवर गेलों.

## ग्रीनिच व्हिलेज आणि बिटनिकांची बिळें

स्टॅच्यु ऑफ् लिबर्टी-स्वातंत्र्यदेवीचा तो अजस्त्र पुतळा पाहाण्या-करितां एका लहानशा फेरीबोटींतून समुद्र ओलांडून पुतळ्याच्या चिमुकल्या लिबर्टी आयलंड बेटावर जावें लागतें. या स्वातंत्र्यदेवीचा जळती मशाल मुठींत धरून वर उचललेला हात बेचाळीस फूट लांबीचा आणि बारा फूट जाड आहे, आणि प्रत्येक डोळ्याची रुंदी अडीच फूट आहे, यावरून हा पुतळा केवढा अजस्त्र आहे याची कल्पना येईल. ब्रिटनचें जूं झुगारून देऊन अमेरिका स्वतंत्र झाली तेव्हां फ्रेंच जनतेनें हा तांबें आणि ब्रॉन्झ धातूचा १५२ फूट उंचीचा पुतळा पॅरिसमध्यें घडवून नवोदित अमेरिका या राष्ट्राला नजर केला. त्याच्या पोटांतून वर डोक्यापर्यंत जायला लोखंडी जिना आहे, किंवा एका लहानशा एलेव्हेटरनेंहि वर जातां येतें. पुतळा पाहून बसनें परत येतांना, वाटेंत ब्रुकलीन हा न्यूयॉर्कचा भाग, फ्रँक लॉइड् राईट् या जगद्विख्यात अमेरिकी शिल्पकारानें बांधलेली आर्ट म्युझियमची, –नवशिल्पाची चुणुक दाखविणारी, गिरक्या घेत वर जाणारी–इमारत, ग्रीनिच् व्हिलेज वगैरे पाहिलें. ग्रीनिच व्हिलेज हा पॅरिसच्या लॅटीन क्वार्टर्ससारखा भाग आहे. इथें सर्व प्रकारचे कलंदर कलावंत, नवचित्रकार, नवशिल्पकार, गायक, वादक, नृत्यकार वगैरे मुख्यत्वें करून राहातात. कांहीं 'बीट्निक्' लेखकहि इथल्या जुनाट घरांच्या माळ्यांवर, पोटमाळ्यांवर अधून मधून आपली बिळें करतात. ग्रीनिच् व्हिलेजमधून बस जात असतां कांहीं घरांकडे बोट दाखवून मी स्टॅन्डीशला म्हटलें, 'हीं तबेल्यासारखीं दिसणारीं घरें कसलीं बुवा?'

तो म्हणाला, 'तुझा तर्क अगदीं बरोबर आहे. पन्नाससाठ वर्षांपूर्वी न्यूयॉर्कमध्यें घोड्याच्या ट्रामगाड्या होत्या. त्या काळांतले हे तबेलेच आहेत. अलिकडल्या काळांत कांहीं बीट्नीक कलावंतांनीं या तबेल्यांचे स्टुडिओ केले आहेत!'

**बॉवरी किंवा न्यूयॉर्कचा मवालीपुरा**

लिबर्टी स्टॅच्यू पाहायला जायच्या आधीं न्यूयॉर्कच्या 'बॉवरीं'त किंवा मवालीपुऱ्यांत आम्ही थोडा वेळ भटकून आलों. जुनाट घरासमोरच्या फूटपाथवर किंवा दारूच्या गुत्त्यासमोर उगाच इकडेतिकडे रेंगाळत असलेले मळकट कपडयांतले, डोक्यावर कापडी टोपी घट्ट ओढलेले, गळयाभोंवतीं मळके रंगीत रुमाल गुंडाळलेले, दाढीचे वाढलेले खुंट अधूनमधून चांचपीत असलेले बरेचसे मध्यमवयस्क किंवा म्हातारे-कोतारे या भागांत दृष्टीला पडले. हेच ते अमेरिकेंतले 'बम्स' असावेत.

'यांना काम मिळत नाहीं?—हे बेकार आहेत का?' आम्ही स्टॅन्डीशला विचारलें.

'काम न मिळायला काय झालं ?', तो म्हणाला, 'या कलंदरांना काम करायला नको. तुम्ही त्यांना खायला देऊं केलंत तर तें घेणार नाहींत. त्यांची उपासमार होत नाहीं. सॅल्व्हेशन आर्मी किंवा तत्सम संस्थेंत असल्या बेकारांना फुकट खायला देतात. यांच्या जवळ गेलांत तर डॉलर दोन डॉलर द्या म्हणून ते पैसे मागतील. कारण त्यांना दारू कुठें फुकट मिळत नाहीं. म्हणून त्यांना पैसे हवे असतात!'

वाटेंत एक जुनाटसें हॉटेल स्टॅन्डीशनें आम्हाला दाखवलें. न्यूयॉर्कमधले लोक अलिकडे त्याला 'कॅस्ट्रोज् चिकन् हाऊस' म्हणतात म्हणे! अमेरिकेशीं शत्रुत्व करणारा क्यूबा देशाचा राष्ट्रप्रमुख कॅस्ट्रो, यूनोमध्यें आपली बाजू मांडण्याकरितां न्यूयॉर्कमध्यें आला होता तेव्हां न्यूयॉर्कमधल्या एखाद्या मोठ्या हॉटेलांत न राहतां या हॉटेलांत राहिला होता. तो आणि त्याच्याबरोबरचे इतर लोक हॉटेलांतलें अन्न न खातां स्वतः बाजारांतून कोंबडया आणीत असत आणि स्वतः शिजवून या हॉटेलांत खात असत, न जाणो अमेरिकेंतले लोक आपल्यावर विषप्रयोग करतील या भीतीनें! म्हणून या हॉटेलाला अमेरिकन लोक थट्टेनें 'कॅस्ट्रोज् चिकन् हाऊस' म्हणतात!

**लुसलुशीत बाहुली**

पु. ल. देशपांड्यांना रंगभूमीवर वापरण्याकरितां एक बाहुली हवी होती म्हणून पु. ल., मी., सीमा आणि अविनाश जगांतल्या उत्कृष्ट बाहुल्या तुम्हांला पाह्यला मिळतील म्हणून पु. ल.ना कुणी तरी सांगितलें होतें त्या न्यूयॉर्कमधल्या श्वार्टझ् कंपनींत गेलों. लहान मूल म्हणून झबलें-टोपरें घातलेली कचकड्याची बाहुली आपल्याकडे रंगभूमीवर आणतात, पण कचकड्याच्या कडकपणामुळें तिचा खोटेपणा लक्षांत येऊन तो प्रवेश आपल्याकडे बरेच वेळां हास्यास्पद होतो. श्वार्टझ्-मधली अशाप्रकारची बाहुली अशी कांहीं विशिष्ट पदार्थाची केलेली असते कीं हाडामांसाच्या मुलाला जसं आपण सांभाळून धरतों आणि सांभाळून जमिनीवर ठेवतों तसेंच या बाहुलीलाहि सांभाळून घ्यावें लागतें. नटीला किंवा नटाला खऱ्या मुलासारखीच या मृदुमांसल बाहुलीला धरावी लागेल; तेव्हां अभिनय चुकीचा किंवा हास्यास्पद होण्याचा प्रश्नच नाहीं. श्वार्टझ्च्या दोन मजल्यावरल्या भव्य दालनांतल्या लहान मोठ्या बाहुल्या, इतर खेळणीं आणि खऱ्या जिराफाएवढे जिराफ, कुत्रें, मांजरे वगैरे प्राणी पाहतां पाहतां मोठ्यांना दुकाना-बाहेर पडावेसें वाटत नाहीं, तर लहान मुलांच्या मनाची स्थिति काय होत असेल याची कल्पनाच केलेली बरी ! इथल्या बाहुल्यांचा एक विशेष म्हणजे त्यांच्यांत ठोकळ्यांसारखा सारखेपणा मुळींच नव्हता. एखाद्या बागेंत आपण सुंदर, गुटगुटींत, गुलाबी गालांची मुलें खेळतांना पाहतों तेव्हां तीं सर्वच सुंदर आणि गुटगुटींत दिसतात, पण एकहि दुसऱ्यासारखें नसतें. प्रत्येकाचा चेहेरा, केंस, कपडे निराळे-तसें या बाहुल्यांचें होतें.

**आमच्या हॉटेलांत एल्सवर्थ बंकर**

न्यूयॉर्कमधील ईस्ट नदीच्या कांठीं उभी असलेली यूनोची एकुण-चाळीस मजली इमारत अगदीं हुबेहूब काड्यांच्या उभ्या पेटीसारखी दिसते. या एकुणचाळीस मजल्यांवर यूनोच्या निरनिराळ्या खात्यांच्या

कचेऱ्या आहेत. जगांतल्या ऐंशींनव्वद राष्ट्रांचे प्रतिनिधी जिथें असतात त्या यूनोच्या आमसभेचें दालन किंवा सुरक्षा समितीच्या बैठकी होतात तें दालन वगैरे दालनें आजूबाजूला लागून असलेल्या वैठ्या इमारतींत आहेत. निरनिराळ्या देशांतल्या मुली मार्गदर्शिका म्हणून काम करतात. आम्हांला एक स्वीडिश मुलगी मार्गदर्शन करीत होती, आणि उत्तम इंग्रजींत सर्व कांहीं समजावून सांगत होती.,

कांहीं वर्षांपूर्वीं भारतांत अमेरिकेचे राजदूत असलेले अमेरिकेचे एक वयोवृद्ध नि तपोवृद्ध मुत्सद्दी मि. एल्सवर्थ बंकर हे अगदीं आकस्मिकपणें मला आणि कानपूरच्या 'जागरण' पत्राचे श्री. नरेंद्र मोहन यांना एकदां भेटले.

न्यूयॉर्कमधल्या आमच्या रूझवेल्ट हॉटेलच्या ग्रिलरूममधून दुपारचें जेवण घेऊन आम्ही बाहेर पडलों नि सिगारेटी फुंकीत लाऊंजकडे वळलों तों एक शुभ्र रुपेरी केंस व्यवस्थितपणें विंचरलेले, काळा परीटघडीचा सूट घातलेले, उंच, किडकिडीत वृद्ध गृहस्थ आमच्यासारखेच जेवणानंतर बाहेर येऊन शांतपणें चिरूट ओढीत एकटेच लाऊंजमध्यें उभे असलेले दिसले. 'एल्सवर्थ बंकरसारखे दिसतात हे गृहस्थ,' मोहन म्हणाला. 'मलाहि तसंच वाटतं,' मी म्हणालों. मोहन तरुण नि भलताच उत्साही! 'जातो नि विचारतों त्यांना,—आहे काय त्यांत?' असें म्हणून तो एकदम त्यांच्याजवळ जाऊन म्हणाला, 'माफ करा. मला वाटतं आपण मि. एल्सवर्थ बंकर? होय ना?'

'होय', बंकर हंसून म्हणाले, 'तुम्ही मंडळी भारताच्या यूनो शिष्टमंडळाचे सभासद आहांत कीं काय?'

यूनोची एकुणचाळीस मजली भव्य इमारत आमच्या हॉटेलपासून दहा मिनिटांच्याच अंतरावर होती, आणि अनेक यूनो शिष्टमंडळाचे सदस्य या हॉटेलांत उतरतात— म्हणून बंकर यांनीं हा प्रश्न विचारला असावा.

'नाहीं', आम्हीं म्हणालों, 'आम्हीं भारताहून आलेले पत्रकार लेखक आहोंत !'

'छान छान,' ते म्हणाले. एकदम गंभीर चेहेरा करून वर पाहत ते स्वत:शींच उद्गारले,' तुम्हां लोकांवर चीनचं हें भलतंच संकट आलंय्. तें लवकरच दूर होईल अशी आशा आहे.'

'अमेरिकेनं आम्हांला सर्व प्रकारचा सल्ला नि मदत द्यायला पाहिजे यावेळीं.' मोहन म्हणाला.

'सल्ला ?' ते हंसून म्हणाले, 'तें माहीत नाहीं, बुवा ! पण मदत मात्र मिळणारच.'

एल्सवर्थ बंकर सध्यां तसे कोणत्या अधिकारावर नाहींत, पण हॉलंड नि इंडोनेशिया यांच्यामध्यें पश्चिम इरियन बेटाबद्दल तेढ उत्पन्न होऊन युद्धच होण्याची वेळ कांहीं महिन्यांपूर्वी आली होती, तेव्हां एल्सवर्थ बंकर यांनींच मोठ्या कौशल्यानें मध्यस्थी करून दोन्ही राष्ट्रांना समाधानकारक अशी तडजोड सुचविली. नुकतेंच मी वृत्तपत्रांत वाचलें कीं, भारतांत काम केलेल्या अमेरिकेच्या सर्व राजदूतांची एक समिति बंकर यांनीं पुढाकार स्थापन घेऊन केली आहे. ही समिती भारताला या संकटकालांत कशी नि किती प्रकारांनीं मदत करतां येईल याचा विचार करीत आहे. भारताच्या अमेरिकेंतल्या हितचिंतकांपैकीं बंकर एक प्रमुख हितचिंतक आहेत.

**नीग्रो बूटपॉलिशवाला आणि गांधीजी**

अमेरिकेंतल्या कांहीं सामान्य माणसांशीं बोलण्याचालण्याची संधि तुम्हांला या धांवत्या झंझावाती दौऱ्यांत मिळाली का, हा प्रश्न अनेक लोक मला विचारतात. त्या प्रश्नाचें उत्तर एका मुलाखतींत मी थोडेसें दिलें होतें. तें पुढीलप्रमाणें :

**उ.** : सामान्य माणसें या ना त्या कारणानें भेटतातच; आणि भेटल्यानंतर बोलतातच; अमेरिकेंत तसा एकंदरींत शिष्टपणा कमीच

आहे. त्यामुळें मोठीं माणसें काय किंवा सामान्य माणसें काय, परक्याशीं स्वत:हून बोलायला मागें पुढें पाहात नाहींत.

**प्र.** : गांधीजींविषयीं तुमच्याशीं कुणी बोलले का ?

**उ.** : हो, एक दोनदां गांधीजींसंबंधीं गोष्टी निघाल्या. न्यूयॉर्क-मधल्या हॉटेलांत एक म्हातारा नीग्रो सकाळीं किंवा संध्याकाळीं तीन-चार तास बूटपॉलीश करण्याच्या कामावर असे. बुटांना पॉलिश करतां करतां एकदां पु. ल. देशपांड्यांना तो म्हणाला, ' काय हो, गांधी असते तर चीनशीं लढा म्हणून तुम्हांला त्यांनीं सांगितलं असतं का ? '

**प्र.** : मग तुम्ही मंडळी काय म्हणालांत ?

**उ.** : काय म्हणणार ? आम्ही म्हटलं, गांधीजी अहिंसावादी असले तरी आक्रमणाला परतविण्याकरितां शस्त्र वापरायला त्यांचा विरोध नव्हता. गांधीजींची अहिंसा ही शूरांची अहिंसा होती; भेकडांची नव्हती. तेव्हां जुलूम जबरदस्तीपुढें मान टाकण्यापेक्षां शस्त्रानं लढलेलं बरं, असंच ते म्हणत. काश्मीरवर पाकिस्तानी टोळीवाले तुटून पडले तेव्हां काश्मीरला आमचे सैन्य पाठवायला नेहरूंना गांधीजींनीं ताबडतोब अनुज्ञा दिली.

**प्र.** : त्यावर तो म्हातारा नीग्रो काय म्हणाला ?

**उ.** : त्यानं गांधीजींचं लिखाण वाचलेलं होतं. त्याला तें पटायला वेळ लागला नाहीं. नीग्रोंच्या समस्या सोडवायला गांधीजींचे मार्गच उपयोगी पडतील असं त्याला वाटत होतं.

**प्र.** : चांगलाच सुशिक्षित असला पाहिजे तो बूटपॉलिशवाला ?

**उ.** : होय, त्याच्या बोलण्यावरून त्याचं वाचन चांगलंच होतं असं आम्हांला दिसलं. हें सर्व वाचन तूं केव्हां करतोस, म्हणून आम्ही त्याला विचारलं.

**प्र.** : मग तो काय म्हणाला ?

**उ.** : तो म्हणाला, ' या चारपांच तासांच्या बूटपॉलिशच्या कामा-

वर मिळणारे पैसे मला चरितार्थाला अगदीं पुरेसे होतात. बाकी दिवस भर सारा वेळ निरनिराळ्या ग्रंथांचें वाचन करण्यांतच मी घालवतों. '

**अमेरिकन टॅक्सी ड्रायव्हर भारताच्या बाजूनें लढणार ?**

**प्र.** : अमेरिकेंतल्या सामान्य माणसाला या चिनी-भारतीय लढ्या बद्दल काय वाटतं याची कांहीं कल्पना तुम्हांला करतां आली का ?

**उ.** : चांगलीच करतां आली. हॉटेलच्या लाऊंजमध्यें किंवा इतरत्र कुठेंहि आमच्याशीं गप्पा करणारा सर्वसामान्य अमेरिकन माणूस एकच प्रश्न विचारायचा, चीनची आणि कम्युनिस्टांची वेळीं अवेळीं तरफदारी करणारा नि शक्य तेव्हां अमेरिकेची नालस्ती करणारा कृष्ण मेनन नेहरूंना कां हांकलून द्यावा लागला, नि अजूनहि यूनोंत चीनला जागा मिळावी म्हणून खटाटोप करणाऱ्या तुम्हां लोकांवर चीननें असा निर्दय हल्ला चढवला तरी कसा ? विचारणारांना भारताबद्दल सहानुभूति असे, नि आतां अमेरिकेची मदत नेहरू तांतडीनें मागत आहेत या गोष्टीमुळें आंतून आनंदाच्या गुदगुल्या होत असलेल्याहि दिसत असत. सर्वसामान्य अमेरिकनांचा एक अनुभव सांगण्यासारखा आहे.

**प्र.** : तो कोणता ?

**उ.** : एकदां न्यूयॉर्कमध्यें टॅक्सींतून कुठं तरी जात असतां, भरभक्कम गर्दन असलेल्या अमेरिकन टॅक्सी ड्रायव्हरनें माझ्याकडे वळून एकदम विचारलें, ' You are from India, sir ?'

' Yes ', मी म्हणालों, ' why ? ' तो एकदम म्हणाला,' I am willing to come to India, and fight the Chinese bastards !'

' कां रे बाबा, तूं चिन्यांवर इतका एकदम कां भडकलास ? ' मी हंसून त्याला विचारलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम 38६५१ दि: १४

'याचं कारण,' तो म्हणाला, 'कोरियांत मी त्यांच्याशीं लढलोंय्–त्या रांडलेकांशीं कसं लढायचं तें मला माहीत आहे!'

'अस्सं होय?' मी म्हणालों, 'मी तुझा फार आभारी अहें!'

**न्यूयॉर्कमध्यें पार्शाचें सिलोनी हॉटेल!**

एके दिवशीं संध्याकाळीं न्यूयॉर्कमधील नीग्रोवस्तीचा हार्लेम हा विभाग, कोलंबिया विद्यापीठाची वाजू, अनेक देशांचे विद्यार्थी राहतात तें इंटरनॅशनल हाऊस वगैरे पाहून झाल्यानंतर रूझव्हेल्ट हॉटेलमध्यें न जेवतां सीलोन हाऊस नांवाच्या न्यूयॉर्कमधल्या एका लहानशा हॉटेल-मध्यें हिंदी पद्धतीची कोंबडी, पुलाव वगैरे खाण्याकरितां पु. ल. देशपांडे, मी, सीमा, अविनाश, आणखीं एकदोन मित्र मिळून गेलों. चिमुकलें-सेंच हॉटेल होतें. मंद उजेडांत एक दोन टेबलांशीं एखादें दुसरें गिऱ्हाईक खातपीत वसलेलें दिसलें. भिंतीवर अजंठ्याच्या चित्रांसारखीं कांहीं चित्रें रंगविलेलीं होतीं. साड्या नेसलेल्या दोन मुली खाणेंपिणें आणून देण्याचें सेविकेचें किंवा वेट्रेसचें काम करीत होत्या. त्यापैकीं एक बरीचशी काळी आणि लठ्ठ असलेली सिलोनी असावी, असें आम्हांला वाटलें. पु. ल. नीं तिला तूं सिलोनी का, म्हणून विचारलें तेव्हां ती म्हणाली, 'मी मुंबईची गुजराती आहे—इथें न्यूयॉर्कमधल्या विद्यापीठांत गेलीं दोन वर्षें शिकतें आहे!' तितक्यांत बूटसूट घातलेला, पार्शी चेहेरे-पट्टीचा, साधारणपणें पन्नाशीच्या वयाचा एक गृहस्थ तिथून जाऊं लागला. त्याच्याशीं 'हे आमचे मालक,' म्हणून त्या मुलीनें आमची ओळख करून दिली. 'आपण सिलोनच्या कुठल्या भागांतले?' म्हणून आम्ही विचारलें तेव्हां तो म्हणाला, 'मी मुंबईचा आहे आणि पार्शी आहे!—सिलोनी माणसानंच हें हॉटेल काढलें होतें, पण कांहीं वर्षांपूर्वीं मी त्याच्याकडून विकत घेतलें. म्हणजे नांवाखेरीज या हॉटेलांत सिलोनी कांहींच नव्हतें! 'केम वावाजी' म्हणून त्याच्यावरोवर अस्सल पार्शी गुजरातींत पु. ल.नीं वोलायला सुरुवात केली तेव्हां तो खूष झाला.

**पांच तासांत चार राज्यें दिसलीं !**

रविवार १८ नोव्हेंबर १९६२ च्या रात्रीं साडेनऊच्या विमानानें आम्ही मुंबईला जाण्यासाठीं न्यूयॉर्क सोडणार होतों. शुक्रवारीं संध्याकाळीं ५ च्या गाडीनें सीमा आणि आविनाशबरोबर मी बॉस्टनला जायला निघालों. न्यूयॉर्कपासून बॉस्टन कांहींतरी दोनशें सव्वादोनशें मैल आहे. न्यू हेवन साठसत्तर मैल आहे. येतांना न्यू हेवनला थांबून न्यूयॉर्कला रविवारीं दुपारीं यायचें ठरलें. सबंध अमेरिका एक महिना फिरलों, त्यांत आगगाडीचा असा हा एवढाच प्रवास. आमच्या रूझव्हेल्ट हॉटल-च्या खालूनच न्यूयॉर्क ग्रॅन्ड सेंट्रल स्टेशनला जायचा भुयारी रस्ता होता. आविनाश म्हणाला, ‘आपल्याकडल्या एम्. एस. एम्. गाडी-सारखीच या न्यूयॉर्क-बॉस्टन गाडीची इकडले लोक थट्टा करतात. खरोखरच पांचची गाडी पांच वाजून वीस मिनिटांनीं सुटली! चालतांना खडखडाटहि बराच होत होता. पण पांच तासांत म्हणजे रात्रीं पावणे-दहाला बॉस्टनला पोहोंचली. गाडींत गादीच्या बांकांचा एकच वर्ग होता, आणि पांच तासांच्या प्रवासांत अमेरिकेंतल्या चार राज्यांतून गेलों. न्यूयॉर्क ही न्यूयॉर्क राज्याची राजधानी. तिथून निघाल्यावर दीड पावणे-दोन तासांनीं कॉनेक्टिकट् राज्याचें मुख्य शहर न्यू हेवन् आलें. त्यानंतर ऱ्होड् आयलंड राज्याचें प्रॉव्हिडन्स आणि शेवटीं मॅसाच्युसेट्स् राज्याचें बॉस्टन.

**हार्वर्ड आणि एम. आय. टी. नुसतीं पाहिलीं !**

बॉस्टन स्टेशनांतून टॅक्सी घेऊन सरळ पार्क ड्राइव्हवरल्या सीमाच्या अपार्टमेंटमध्यें गेलों. सीमानें केलेली भात-भाजी खाऊन आम्ही तिघेंहि तिथून पंधरावीस मिनिटांवर असलेल्या मुंबईच्या टाटा कॅन्सर रिसर्चचे डॉ. सहस्रबुद्धे यांच्या बिनी स्ट्रीटवरल्या प्रशस्त जागेंत गेलों. सीमाकडे एक सैंपाकघर व राहण्यासाठीं एकच खोली असल्यामुळें डॉ. सहस्रबुद्धे यांनीं आम्हांला त्यांच्याकडे बोलावलें होतें. रात्रीं बारा

एक वाजेपर्यंत कॉफी, गप्पा झाल्यानंतर झोंपलों. सकाळीं डॉ. सहस्र-बुद्धयांच्या घरीं चहा घेऊन स्नान, प्रातरुपाहार वगैरे करण्याकरितां सीमाच्या जागेंत परत आलों.

अविनाशचा एक मित्र विजय गुपचूप इथल्या हार्वर्ड विद्यापीठाच्या शेजारींच असलेल्या प्रख्यात एम्. आय. टी. (मॅसाच्युसेट्स् इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी) मध्यें इंजिनियरिंगची पीएच्. डी. करतो आहे; तो आपली मोटार घेऊन आम्हांला बॉस्टन दाखवण्याकरितां सकाळींच सीमाकडे येणार होता. आम्ही स्नान वगैरे उरकून तयार झालों, इतक्यांत विजय आलाच. सीमा काम करते ती चिल्ड्रेन्स हॉस्पिटल मेडिकल सेंटर ही कर्करोग संशोधनाची प्रख्यात संस्था बॉस्टनमध्यें विनी स्ट्रीट-वर आहे. तिचे प्रमुख हार्वर्डचे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संशोधक डॉ. सिडने फार्बर हे आहेत. बॉस्टनमधून जाणाऱ्या चार्लस् नदीच्या पलीकडल्या बाजूला केंब्रिज गांव आहे. अमेरिकेचें हार्वर्ड विद्यापीठ आणि एम्. आय. टी. ही संस्था केंब्रिजमध्यें आहेत. आज शनिवार असल्यामुळें–शनिवार रविवार दोन्ही दिवस अमेरिकेंत सुट्टी असते–हार्वर्डच्या आवारांत शुकशुकाट होता. क्वचित् एखादा दुसरा विद्यार्थी इकडे तिकडे जातांना दिसत होता. आयव्ही वेलींच्या हिरव्या पानांचे थरावर थर सांचलेल्या हार्वर्डच्या जुनाट इमारती कौतुकानें पाहत पाहत फॉग् म्युझियमकडे आम्ही आलों. तियलीं चित्रें, शिल्पें पाहून, मुंबईचें डॉ. व सौ. परांजपे इथें हल्लीं काम करीत आहेत, त्यांच्या टुमदार बंगल्यावर गेलों. तिथें कॉफी-चिवडयाचा कार्यक्रम झाल्यानंतर विजयनें आम्हांला आपल्या एम्. आय. टी. त नेलें. चार्लस् नदीच्या अगदीं कांठाशींच एम्. आय. टी. आहे. जगांतलें हें फार मोठें इंजिनियरिंगचें विद्यापीठ समजलें जातें. कांचेचीं प्रचंड तावदानें असलेल्या एका दालनांत वाटेल तो हिशेब क्षणार्धांत करून देणारें जगातलें मोठयांत मोठें यंत्र पाहिलें. इथलें प्राध्यापक गंमतीनें केव्हां केव्हां आपल्या विद्यार्थ्यांना सांगतात, ' कुठल्या

मुलीशीं लग्न करावं असा प्रश्न तुम्हांला पडला तर तो या यंत्रांत टाका-ताबडतोब तुम्हांला उत्तर मिळेल ! ' एम्. आय. टी. च्या एका वैशिष्टयाचें मला विशेष कौतुक वाटलें. मोठमोठ्या आधुनिक चित्रकारांच्या कांहीं निवडक चित्रांचे या इंजिनियरिंगच्या महान् विद्यापीठांत एक व्यवस्थित संग्रहालय आहे. इतकेंच नव्हे तर वाङमयाच्या आणि संगीताच्या अभ्यासाच्याहि इथें उत्कृष्ट सोयी आहेत.

**शास्त्रज्ञाला धनुष्यें जमविण्याचा नाद**

दुपारीं बॉस्टनला परत आलों. एका हॉटेलांत जेवण घेतलें आणि डॉ. फार्बरांना भेटायला गेलों. पांढरा शुभ्र एप्रन घातलेलें, उंच, धिप्पाड, रुपेरी केंसांचे डॉ. फार्बर फार सुस्वभावी आणि प्रेमळ वाटले. सीमा आणि आविनाशकडे मिस्किलपणें पाहत ते मला म्हणाले, ' या दोघांना इथें लग्न करण्याची तुमची परवानगी आहे का—आमचा इथला एअर-कंडिशन्ड कॉन्फरन्स हॉल लग्न-समारंभाला फारच छान आहे ! '

' सीमाचे इथले पालक तुम्हीच आहांत, ' मी म्हणालों, ' तुम्ही लग्न लावून देऊं शकतां ! ' डॉ. फार्बरांच्या खोलीच्या एका कोंपऱ्यांत मध्ययुगीन इंग्रज योद्धे वापरीत तशा प्रकारचें एक मोठें थोरलें ' क्रॉसबो ' जुनाट धनुष्य दिसलें.

' हें काय बुवा ? ' मी उद्गारलों, ' शास्त्रज्ञाच्या खोलींत हें धनुष्य इथें कशाला ? '

डॉ. फार्बर हंसून म्हणाले, ' मला या प्रकारचीं जुनीं धनुष्यें गोळा करण्याचा नाद आहे. '

आपल्या पुस्तकांच्या कपाटांतून वेगवेगळ्या प्रकारच्या धनुष्यांची माहिती देणारा एक जाडजूड, जुना ग्रंथ काढून त्यांतलीं कांहीं चित्रें त्यांनीं मला दाखवलीं. संगीताचीहि त्यांना विशेष आवड असलेली दिसली.

**डॉ. कार्डिनेलीच्या घरीं साताऱ्याचीं चित्रें**

संध्याकाळीं बॉस्टनचें प्रख्यात म्युझियम ऑफ आर्टस् पाहिलें. भारताचें

प्रख्यात कलाकोविद डॉ. आनंद कुमारस्वामी या संग्रहालयाचे कित्येक वर्षें क्युरेटर होते. तेव्हां ही संस्था पाह्यची मला अतिशय जिज्ञासा होतीच. रात्रीं डॉक्टर आणि मिसेस कार्डिनेली यांच्याकडे जेवण घेऊन नंतर साडेदहाच्या गाडीनें आविनाशबरोबर न्यू हेवनला जायचें होतें. हें तरुण इटालियन जोडपें डॉ. फार्बरांच्या संस्थेंत संशोधन कार्य करीत आहे. सीमा त्यांच्याच हाताखालीं काम करते आहे. मी अमेरिकेंत येणार हें कळलें तेव्हांपासून डॉ. कार्डिनेलींनीं जवणाचें आमंत्रण देऊन ठेवलें होतें. मिसेस कार्डिनेलींनीं सीमाला विचारून मला आवडेल अशी थोडीशी आमच्या पद्धतीची कोंबडी केली होती. त्याशिवाय स्पांघेटी, इटालियन शेवया वगैरे पदार्थ होतेच. जेवणानंतर डॉ. कार्डिनेलींनी आपल्या घरांतलीं कांहीं सुंदर चित्रें मला दाखवलीं. भिंतीवरल्या कांहीं चित्रांत ओळखीची झाडें, पानें, किल्ल्यांचे अवशेष आपण पाहतों आहोंत असें एकसारखें मला वाटत होतें. कुणाचीं हीं चित्रें म्हणून कार्डिनेलींना मी विचारलें, तेव्हां ते हंसून म्हणाले, ‘ओळखीचीं वाटतात ना ? माझे सासरे इटालियन सैन्यांत कर्नल होते. गेल्या महायुद्धांत ते युद्धकैदी म्हणून तुमच्या भारतांतच कुठल्यातरी तुरुंगांत होते. त्यांना चित्रें काढण्याचा फार नाद होता. तिथें त्यांनी काढलेलीं हीं चित्रें आहेत !’ गेल्या महायुद्धाच्या काळांत इटालियन युद्धकैदी साताऱ्याजवळच्या कुठल्यातरी कॅम्पमध्यें ठेवले होते, असें अंधुकपणें मला कांहींतरी आठवलें. संगीताचाहि कार्डिनेलींना फार नाद असल्याचें दिसलें. संगीताच्या उत्तमोत्तम ध्वनिमुद्रिकांचा मोठा थोरला संग्रह त्यांच्याकडे होता. दहा वाजतां मी आणि अविनाश न्यू हेवनला जाण्याकरितां बॉस्टन स्टेशनवर जायला निघालों.

**न्यू हेवन आणि येल् विद्यापीठ**

शनिवारीं रात्रीं साडेदहाची गाडी नसते, हें आम्ही विसरलों होतों. स्टेशनांत आल्यावर कळलें कीं, बारा सव्वाबाराशिवाय गाडी नाहीं.

बॉस्टनच्या जुनाट स्टेशनांत चिटपांखरूंहि त्या रात्रीच्या वेळीं नव्हतें. सर्वत्र शुकशुकाट होता. एअर कन्डिशन्ड असल्यामुळें थंडी मात्र वाजत नव्हती. एका बांकड्यावर आम्ही गप्पा करीत बसलों. पलीकडल्या बांकावर कुठूनतरी मळकट कपड्यांतले दोन म्हातारे झोकांड्या खात आले आणि बसले. त्यांच्यापैकीं एक थोड्याच वेळांत तोंड उघडें टाकून घोरूं लागला. दुसरा म्हातारा त्याला हालवून पुन्हां पुन्हां सांगत होता, 'जिम ऊठ-ऊठ—आपल्याला घरीं जायचंय.' जिम् त्याला दाद देत नव्हता. शेवटीं एकदां तो धडपडत उठला, आणि दोघेहि म्हातारे एकमेकांना सांवरींत बाहेर निघून गेले. स्टेशनांत पुन्हां शुकशुकाट झाला.

न्यू हेवनला आम्ही रात्रीं एकला पोहोंचणार होतों ते रात्रीं तीनच्या सुमारास पोहोंचलों. माझे एक जुने विद्यार्थी आणि अविनाशचे मित्र श्री. जोशी पत्नीमुलांसह न्यू हेवनमध्यें राहतात. त्यांच्याकडे राहयला त्यांनीं मला बोलावलें होतें. स्टेशनांतून टेलिफोन करून आम्हांला पहांटेचे तीन वाजणार म्हणून आविनाशनें त्यांना सांगितलेंच होतें. तीन ते आठपर्यंत झोंप घेऊन न्यू हेवन गांव आणि अविनाशचें येल् विद्यापीट पहायला बाहेर पडलों. इंग्लंडची ऑक्सफर्ड आणि केंब्रिज तशी अमेरिकेची हार्वर्ड आणि येल. दुपारीं साडेअकराच्या गाडीनें न्यू हेवनहून निघून न्यूयॉर्कच्या रूझव्हेल्ट हॉटेलमध्यें जेवणाकरितां मला पोहोंचावयाचें होतें. त्याच रात्रीं साडेनऊच्या एअर इंडिया विमानानें आम्हीं मुंबईला जायला निघणार होतों. तेव्हां घाईघाईनें न्यू हेवन आणि येल् अडीच तीन तासांत पाहून घ्यायचें होतें. न्यू हेवन, बॉस्टन, वगैरे अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरल्या या गांवातलें वातावरण बरेंचसें इंग्लंडच्यासारखें वाटतें. इंग्लंडहून अमेरिकेंत वसाहती करायला आलेले सध्यांच्या अमेरिकनांचे पूर्वज या किनाऱ्यावरच पहिल्यांदा उतरले. तेव्हां विद्यापीठाच्या जुन्या इमारती, गांवांतलीं जुनीं प्रार्थना-

मंदिरें, रस्ते वगैरेवर इंग्लंडमधल्या तत्कालीन वास्तुकलेची बरीचशी छाप दिसते. या प्रदेशाला न्यू इंग्लंड हेंच नांव आहे. आणि इथल्या बऱ्या-चशा गांवांतहि इंग्लंडमधल्या गांवांचीं बॉस्टनजवळच्या केंब्रिजसारखीं नांवें आहेत. न्यू हेवन गांवांत फिरतांना आणि येल् विद्यापीठाच्या भव्य दगडी इमारती पहातांना ही गोष्ट मला पुन्हां पुन्हां जाणवत होती. योगायोगानें त्या दिवसाची न्यू हेवनमधली हवाहि इंग्लंडसारखीच ढगाळ, कुंद, पावसाळी झाली होती, आणि इंग्लंडमध्यें बारा महिने पडतो तसा पाऊसहि त्रिरिचिरी पडत होता ! इंग्लंडमधल्या खेडयांत 'व्हिलेज ग्रीन' असतें तशी एक मोकळी हिरवीगार बखळहि न्यू हेवन मध्यें टॅक्सी ड्रायव्हरनें मला एके ठिकाणीं दाखवली. म्हातारा टॅक्सी ड्रायव्हर मोठा गमत्या होता. युनिव्हर्सिटीच्या इमारती गैरे पाहून आम्ही अविनाशच्या होस्टेलकडे येत होतों तेव्हां तो हळूंच अविनाशला म्हणाला, 'सर, पाहुण्यांना तुम्ही तुमच्या विद्यापीठाचा येल्व्हेल दाखवला नाहीं !'

येल् विद्यापीठाला अगदीं अद्यावत् शिल्पकलेचा नमुना असलेला एक भव्य स्टेडियम कुणीतरी बांधून दिला आहे. त्याचा आकार बाहेरून एखाद्या प्रचंड व्हेलमाशासारखा दिसतो. विद्यार्थ्यांनीं या इमारतीला 'येल्व्हेल्' असें थट्टेनें नांव दिलें आहे. येल्मधल्या आविनाशच्या खोली-वरून स्टेशनकडे जात असतां वाटेंत माझे मित्र तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे चिरंजीव, मुलगी, सून आणि जांवई न्यू हेवनमध्येंच राहतात, त्यांच्याकडे थोडा वेळ थांबून पुढें गेलों. दीडच्या सुमारास न्यूयॉर्कला पोहोंचलों.

**आकाशांतून पाहिलें पाताळ !**

आज न्यूयॉर्कमध्येंहि हवा फारच थंड, ढगाळ होती. संध्याकाळीं पांचला मिट्ट काळोख पडला. कांहीं वेळानें भुरभुर भुरभुर पांढऱ्या शुभ्र बर्फाच्या पाकळ्या आकाशांतून पडत असलेल्या हॉटेलच्या खिडकींतून

न्यूयॉर्कच्या रस्त्यांकडे मी पहात बसलों असतां दिसल्या. नऊ वाजतां न्यूयॉर्कच्या विमानतळावर बसमधून उतरलों तेव्हां ओव्हरकोटावरून कांहीं पावसाचे थेंब आणि कांहीं पांढरेशुभ्र हिमकण झटकून टाकावे लागले. साडेनऊला एअर इंडियाच्या ‘ नंदादेवी ’ विमानानें काळोखानें भरलेल्या आकाशांत झेंप घेतली आणि वर चढतांना तें एका बाजूला वळलें तेव्हां न्यूयॉर्कच्या झगझगणाऱ्या लाख लाख दिव्यांची आरती एकदम कुणीतरी वर उचलून ओवाळल्यासारखी दिसली. दुसऱ्या दिवशीं लंडनला प्रातरुपाहार, पॅरिसमध्यें दुपारचें जेवण, नंतर जिनेव्हा, कैरो आणि तिसऱ्या दिवशीं पहांटे साडेपांच वाजतां मुंबई.

आकाशांतून झंजावात येतो त्याप्रमाणेंच मुंबईहून न्यूयॉर्क काय, किंवा अवाढव्य अमेरिका खंडांत काय, ताशीं ६००–७०० मैल वेगानें जाणाऱ्या जेट विमानांतून हिमालयाच्या सव्वापट दीडपट उंचीवरून म्हणजे अडतीस-चाळीस हजार फूट उंचीवरून आकाशांतून इकडून तिकडे आम्ही जात होतों; आणि पाहात होतों अमेरिका खंडांतले निरनिराळे प्रदेश ! अमेरिकेला आपले लोक कित्येक वर्षांपासून पाताळ-लोक म्हणतात. आपल्याकडे दिवस असतो तेव्हां तिथें रात्र असते, नि इथें उजेड असतो तेव्हां तिथें काळोख असतो. म्हणून या उडत्या प्रवासाला मी एकदां म्हणालों होतों, ‘ आकाशांतून पाहिलें पाताळ ! ’ मात्र या पाताळांतले खडक कोरतात आकाश !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३८६५१ वि. भू-प्रवास
क्रमांक ३६५ नोंद दि. २८.५.६५
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

REFBK-0014276

REFBK-0014276